# यहेज्केल संदेष्टाचे पुस्तक
# यहेज्केल संदेष्टानं पुस्तक
## वळख

यहेज्केल पुस्तकमा इस्राएलनं पतन अनी त्यानी स्थापना कशी व्हयनी यानाबारामा भविष्यवाणीन हाई एक पुस्तक शे. भविष्य वक्ता यहज्केल यानाबारामा जे काय सांगामा येस ते हाई पुस्तकमा सांगेल शे. त्यानी भविष्यवाणीनी सेवा हाई जवयपास २२ वरीस चालनी, ७ इ.स.वी ५८६ मा यरूशलेमनं पतन व्हवाना पहीले अनी १५ वरीस नंतर आपला दर्शनना उत्तर सांगाना पहीले, यहज्केलले बऱ्याच गोष्टी सांगानी गरज व्हती ज्या इस्राएलनासंगे घडेल व्हत्यात. अध्याय ५ मा एक उदाहरण दखामा येस जठे त्याले आपली दाढी करानी अनी केसना ३ भाग ५:१ कराले सांगामा येयल व्हतं. जठे आशे दखाडामा येयल व्हतं की यरूशलेमन काय व्हयी.

यहज्केलना पुस्तकना तीन भाग पडेल शेतस. इस्राएलना न्याय, आसपासना राष्ट्रसना न्याय, अनी इस्राएलनी परत स्थापना. हया बठा खंडमा एक मुख्य विषय हाई शे की कोणत्या गोष्टी आमले परमेश्वरले वळखाले मदत करी. यहज्केलनी ६० पेक्षा जास्त वाक्य लिखेल शेतस. तवय त्यासले समजी की मी परमेश्वर शे, मंग परमेश्वर न्याय करत राहो का परत स्थापना करत राहो, आमले त्याना बारामा अनी त्याले आमनापाईन काय पाहीजे हाई शिकता ई.

रूपरेषा

१. अध्याय १ पाईन ते २४ पावोत इस्राएलवर परमेश्वरना न्यायना वर्णन शे.
२. अध्याय २५ पाईन ते ३२ पावोत परमेश्वर आसपासना राष्ट्रसना न्याय करस.
३. अध्याय ३३ पाईन ते ४८ यहज्कले इस्राएलनी परत

### संदेष्टाले दिव्यदृष्टी

1 मी खबार नदीना काठले धरी आणेल लोकेसमा राहात व्हतु, तवय तिसवा
वरीसना चौथा महीनाना पाचवा दिनले आशे व्हयनं की आकाशा दुभागीसनं माले
परमेश्वरनी दिव्यदृष्टी दखायनी.
2 हाई यहोयाखीन राजानं बंदीवासनं पाचवा वरीस व्हता; त्या महीनाना पाचवा
दिनले,

3 खास्दयासना देशमां खबार नदीना काठले बुजीना पोर्‍या यहेज्केल याजक
याले परमेश्वरनं वचन स्पष्टतीन प्राप्त व्हयनं; तठे परमेश्वरना सामर्थ्य त्यानावर वनं.
4 मी दख ते उत्तरकडतीन तुफानना वारा सुटना, तवय एक मोठा ढग ई राहिना
शे, त्यानामां गुंडाळेल एक आगना गोया व्हता; त्याना आजुबाजूले मोठा ढग पसरेल
राहीसनं आगना मजारतीन पितयनामायक तेज झळकत व्हता.
5 त्याना मजारना भागमां चार जनावरसना आकृतीनामायक काहीतरी दखायनं;
दखावाले त्या माणुसना आकृतीनामायक व्हतात.
6 त्या परतेकले चार तोंड व्हतात अनी परतेकले चार पखं व्हतात.
7 त्यासना पाय ताठ उभा व्हतात अनी त्यासना पायसना तळवा वासरूना पायना
तळवानामायक दिसी राहिंतं अनं पितयनामायक त्याना उजाळा झळकी राहिंता.
8 त्यासना चारी बाजुले पंखसना खाल त्यासले माणसेसना हात व्हतात; त्या
चारीसले तोंड अनी पंख व्हतात. त्या आशे व्हतात.
9 त्यासना पंख एक दुसराले लागीसनं व्हतात; त्या चालतांना वयेत नही, तर
त्या परतेक पाहीजे त्या आपला तोंडना दिशाकडे सरळ समोर जाये.
10 त्या चारीसना तोंडपैकी एक तोंड माणुसना व्हता; त्या चारीसना उजवी
बाजुले एक तोंडना सिंह व्हता, त्या चारीसना डावा बाजुले एक तोंड बैलनं व्हतं;
अनी त्या चारीसना एक तोंड गरूडनामायक व्हतं; असा त्यासना तोंड व्हतात.
11 वरनी बाजुले त्यासना तोंड अनी त्यासना पंख येगळा व्हतात, परतेकना दोन
पखसनाजोडे दुसरानं एक एक पंखले लागेल व्हतं अनी परतेकना दोन पंखसघाई
त्यासना शरीर झाकायेल व्हतात.
12 त्या परतेक पाहिजे त्या आपला तोंडना दिशाकडे सरळ समोर जायेत; आत्मा
लयी जाई तिकडे जायेत; चालतांना वळेत नही;
13 त्या प्राणीसनं रूप सांगं तर आगना इंगळनामायक, मशालनामायक दखायी
राहींनतात; आग त्या प्राण्यासमां खेळी राहींनता; तो धगधगीत व्हईसनं त्यानामाईन
ईजा निघी राहींनतात.
14 त्या प्राणी विजनामायक इकडे तिकडे पयेत;
15 मी त्या जनावरसकडे दख तवय त्यासनाजोडे त्यासना चारी तोंडना बाजुले
जमीनवर एक एक चाक व्हतं.
16 त्या चाके अनी त्यासना घाट हया सोनानं मणीसनामायक दखाई राहींनात;
त्या चारीसना आकार एकच व्हता. त्यासना आकार अनी घाट जशे काय चाकमां
चाक आशे व्हतात.

17 त्या चालेत तवय त्या चार दिशासपैकी पाहिजे त्या दिशाले नीट सरळ चालेत;
चालतांना वळेत नही.
18 चाकेसना घेरा दखात तवय त्या भलता उचा अनी भयानक व्हत्यात; त्या
चारीसना घेरासना आजुबाजूले सगळीकडे डोया व्हतात.
19 त्या जनावर चालेत तवय चाकेबी त्यासनासंगे चालेत अनी त्या जमीन
सोडीसनं त्या वर चढेत तवय चाकेबी चढेत.
20 जिकडे आत्मा लयी जाई तिकडे त्यासना गतीना रोखतीन त्या जायेत;
त्यानासंगे चाकेबी उचलायेत; कारण त्या जनावरसना आत्मा चाकसमां व्हतात;
21 त्या चालनात म्हणजे त्याबी चालेत; त्या थांबनात मनजे त्याबी थांबेत;
त्या जमीन सोडीसनं वर चढनात मनजे त्यासनासंगे चाके बी चढेत; कारण त्या
जनावरसना आत्मा चाकमां व्हता.
22 त्या जनावरासना माथावर काजवासनीमायक काही तरी व्हतं; त्या दिपवनारा
अनी भयानक दवनामायक दखायनात; त्या त्यासना डोकावरतीन पसरेल व्हतात;
23 त्या चांदव्यासनाखाल त्यासना पख नीट पसरीसनं येरा येरले लागेल व्हतात;
हाई बाजुले अनी ती बाजुले शरीर झाकाई जायी आशे परतेकले दोन दोन पख
व्हतात.
24 त्या चालत व्हतात तवय माले त्यासना पखसना आवाज आयकु व्हंनं;
तो महाजलाशयना आवाजनामायक, सर्वसमर्थनना वाणीनामायक व्हता; लष्करना
गजबजीनासारखा तो मोठा व्हता; त्या उभा राहेत तवय आपला पख खाल सोडेत.
25 त्यासना डोकावरना चांदव्यासमाईन वाणी व्हये; त्या उभा राहेत तवय आपला
पख खाल सोडेत.
26 त्यासना डोकावर ज्या चांदवा व्हतात त्यासनावर नीलमणीना
सिंहासननामायक काही तरी दखाई राहींनतं; अनी त्या सिंहासनवर माणुस
शे आशे भास व्हये.
27 त्यासमा सगळीकडे तृणमणीना तेजनामायक आगना भास माले व्हयनं; त्याना
कंबरपाईन वर अनी त्याना कंबरपाईन खाल आगना भास माले व्हयनं अनी त्याना
आजुबाजूले प्रकाश चमकी राहींनता.
28 पाऊसना दिनमां ढगमां दखास तशे धनुष्यनंपरमानं त्याना आजुबाजूले प्रभा
फाकायेल माले दखायन्यात; परमेश्वरनं शक्तीनं हाई दर्शन व्हतं; मी ते दखीसनं
उपडा पडनू अनी कोणीतरी बोलानी वाणी मना कानवर ऊनी.

# 2

1 तो माले बोलना, मानवपुत्रा, तु तुना पायवर उभा राहाय, मनजे मी तुनासंगे

बोलसू,
2 तो मनासंगे बोली राहींनता तवय आत्मानी मनामां परवेश करीसनं माले मना
पायवर उभं करं तवय त्यानं बोलनं माले आयकू व्हनं;
3 तो माले बोलना, हे मानवपुत्रा, मी तुले इस्राएल वंशकडे, मनासंगे झगडा
करणारा राष्ट्रसकडे धाडसं त्यासनी अनी त्यासना वाडवडीलसनी आजपावोत मना
ईरोधमां वागेल शेतस.
4 हया त्यासना वंशज उध्दट अनी कठीण हृदयना शेतस; मी तुले त्यासनाकडे
धाडी राहीनू; प्रभू परमेश्वर आशे सांगस हाई त्यासले सांग.
5 त्या तुना आयकोत किंवा नहीं आयकोत, निदान त्यासनाकडे कोणीतरी संदेष्टा
जायेल व्हता हाई त्यासले समजी; त्या तर बोली चालीसनं फितुरी व्हयी जायेल
शेतस.
6 हे मानवपुत्रा, तुना आजुबाजूले काटाझुडपा अनी काटा राहीनात तरी, तु
इचुसमा राहाशी तरी त्यासले भिऊ नको, त्यासना शब्दसले भ्यावनं नही, ती फितुरी
जायी राहींनी शे, तरी त्यासना शब्दले भिवानं नही; त्यासना चर्येले भिवानं नही;
7 त्या आयकोत किंवा नही आयकोत; तु मना वचन त्यासले सांग; त्या तर
भलता भांडखोर शेतस;
8 हे मानवपुत्रा, मी सांगस ते आयक, त्या फितुरी जातपरमानं तु फितुरनामायक
होऊ नको; तुनं उघाड अनी मी देस ते खाय;
9 मी दख तवय मनाकडे एक हात पुढे वना, अनी दख, त्या हातमां ग्रंथना पट
व्हता;
10 तो त्यानी मनासमोर पसारं; त्यानावर पाठपोट लिखेल व्हतं अनी त्यामा
विलाप, शोक अनी दुख हयानाबारामां लिखेल व्हतं.

# 3

1 तो माले बोलना, मानवपुत्रा, तुनासमोर जे व्हनं शे ते खाय; हाऊ पुस्तक खाय
अनी जायीसनं इस्राएलना घराणानासंगे बोल,
2 तवय मी आपला तोंड उघाडं अनी त्यानी माले ते पट सेवन कराले लावं.
3 तो माले बोलना, मानवपुत्रा, जो पुस्तक मी तुले देस तो पोटमां जाऊ देय,
त्यानीघाई आपली आतडी भर, मी ते खाद् तवय ते माले तोंडमां मधनासारखा गोड
लागना.
4 मंग तो माले बोलना, मानवपुत्रा, जाय, इस्राएलना घराणाकडे जाय अनी
त्यासनाजोडे मना वचन बोल.

5 कारण बाबर ओठना अनी जड जीभना लोकेसकडे नही तर इस्राएलना
घराणाकडे मी तुले धाडसं.
6 ज्यासनी बोली तुले समजसं नही आशे बाबर ओठना अनी जड जीभना बराच
राष्ट्र शेतस, त्यासकडे मी तुले धाडसं नही, त्यासकडे मी तुले धाडतू तर खरच त्या
तुना आयकतात.
7 पण इस्राएल घराणं तुनं आयकावूत नहीं; कारण त्या मना सुध्दा आयकावुत
नही; कारण इस्राएलना बठा घराणा कठीण कपायनां अनी कठीण ह्रदयना शे.
8 दख, मी त्यासनी मुद्रासारखी तुनी मुद्रा वज्रपाय करसं, त्यासना
कपायनासारखा तुनं कपाय कठीण करसं.
9 मी तुनं डोकं गारगोटींपेक्षा वज्रप्राय कठीण करस; त्यासले तु भ्यावानं नहीं;
त्यासना कटाक्षाघाई कापानं नहीं.
10 आजुन तो बोलना, मानवपुत्रा, ज्या सर्वा वचन मी तुले सांगस त्या आपल
हृदयमां साठाडं, तीं कानघाई आयक.
11 जाय, धरीसनं लयी जायेल तुना लोकेसना वंशसकडे जायीसनं त्यासनासंगे
बोल; त्यासले सांग की प्रभु परमेश्वर असं सांगस, मंग त्या तुना आयकोत किंवा
नहीं आयकोत.
12 तवय माले आत्मानी उचली धरं अनी मनामांगेतीन त्याना स्थानमाईन,
परमेश्वरना वैभवना धन्यवाद असो, असं जोरमां शब्द व्हयेल मी आयकं.
13 अनी त्या जनावरसना पख येरायेरले लागेत त्यासना आवाज अनी त्यासना
बाजुले ज्या चाक व्हतात त्यासना आवाज, असं जोरमां प्रचंड वेगमां मी शब्द
आयकं.
14 मंग आत्मानी माले उचली धरं; मी मना मनतीन संतापतीन क्लेश पावनू तवय
परमेश्वरनं वरहदस्त जोरमां मनावर वना.
15 मंग धरीसनं लयी जायेल लोके जठे राहेत तठे त्यासनाकडे खबार नदीना
काठले तेल-अबीब हाई नगरमां मी वनू अनी त्या बठेल व्हतात तठे मी बसनू;
भ्यायी भ्यायीसनं सात दिन मी त्यासनामां बसी राहीनू.

## इस्राएल घराणावर पहारेकरी
## *(यहेज्केल 33:1-9)*

16 मंग त्या सात दिन व्हवावर परमेश्वरनं वचन माले प्राप्त व्हयनं ते आशे;
17 मानवपुत्रा, मी तुले इस्राएलना घराणावर पहारेकरी नेमेल शे, म्हनीसनं तु मनं
तोंडनं वचन आयकीसनं मनाकडतीन त्यासले बजाडीसनं सांग,

18 तु नक्की मरशी आशे मी पातक्यासले बोलनू तवय तु जर त्यासले बजाडं
नही अनी पातक्यासनी आपला कुमार्ग सोडीसनं जगाले पाहिजे म्हनीसनं तु त्यासले
बजाडीसनं सांग नही, तर तो पातकी आपली दुष्टाईमुये मरी; पण त्याना रंगतना झाडा
मी तुनापाईन लिसू.
19 तु त्या पातक्याले बजाडं तरीबी त्यानी आपली दुष्टाई अनी कुमार्ग सोडं
नहीत, तर तो आपली दुष्टाईमुये मरी, अनी तु आपला जीव वाचाडं असं व्हयी.
20 तसच धार्मिक आपली धार्मिकता सोडीसनं अधर्म कराले लागना अनी मी
त्यानासमोर अडखुळा ठेवा तर तो मरी; तु त्याले बजाडं नही व्हयीते तो आपला
पातकमुये मरी, अनी त्यानी करेल धार्मिकता जमेस धरता येवावू नही, पण त्याना
रंगतना झाडा मी तुनापाईन लिसू
21 पाप कराले नही पाहिजे असं तु त्या धार्मिकले बजाडं, अनी त्यानी पाप करं
नही, तर त्यानी बोध लेवाशिवाय तो जगी अनी तु आपला जीव वाचाडं असं व्हयी.

### यहज्केल बोलामां असमर्थ

22 तवय तठे परमेश्वरनं सामर्थ्य मनावर व्हनं अनी तो माले बोलना, ऊठ,
खोरामां जाय, तठे मी तुनासंगे बोलसू.
23 मंग मी ऊठीसनं खोरामां गयू तवय खबार नदीनाजोडे मी दख व्हतं तसं
परमेश्वरनं तेज तठेबी मनासमोर उभं व्हतं, तवय मी उपडा पडनू.
24 मंग आत्मानी मनामां परवेश करीसनं माले मना पायवर उभं करं; त्यानी
मनासंगे भाषण करीसनं सांग, "जाय, तु सोताले घरमां कोंढी लेय."
25 हे मानवपुत्रा, दख, तुले बंधनमां बांधी ठेवतीन, अनी तुले बाहेर त्या लोकेसमां
जाता येवावू नही;
26 तुनी जीभ तुनी टाळुले चिटकी असं मी करसूं, मनजे तु मुका व्हशी; अनी
तु त्यासना निषेधकर्ता व्हवावू नही; कारण ते भांडखोर घराणं शे.
27 तरीबी मी तुनासंगे बोलसू तवय मी तुनं तोंड उघाडसू, मंग तु त्यासले सांग
की, प्रभू परमेश्वर सांगस, ज्याले आयकानं व्हयी तो आयको, ज्याले आयकानं नही
व्हयी, तो नही आयको, त्या तर भांडखोर घराणं शे.

# 4

### यरूशलेमले घेरानी भविष्यवाणी

1 हे मानवपुत्रा, एक ईट लिसनं तुनासमोर मांड; तिनावर यरूशेलम नगरना चित्र
काढ.

2 त्याले वेढा पडेल शे; त्यानासमोर बुरूज रचीसनं मोरचा बांधेल शेतस;
त्यानासमोर तळ पडेल शे; टक्कर दिसनं भित पाडानं यंत्र त्याना आजुबाजूले शेतस,
असं चित्र काढ.
3 मंग तु एक लोखंडी कढई लेय, ती तुनामां अनी त्या नगरमां जशी काय लोखंडी
भित म्हनीसनं ठेव; तु आपला तोंड तिनाकडे कर; तिले वेढाना स्थीतीमां लय; तु
तिले वेढा घालनारा व्हय, हाई इस्राएल घराणाले चिन्ह व्हयी.
4 आजुन तु आपली डावी कुशीवर झोप अनी इस्राएल घराणानं अधर्म त्या
कुशीवर ठेव; जेवढा दिन तु त्या कुशीवर झोपी राहाशी तेवढा दिन त्यासना अधर्म
भार वाही राहाय.
5 कारण त्यासना अधर्मना वरीस एवढा दिन मी तुना हिशोबमां मोजेल शेतस;
तिनशे नव्वद दिन तुले इस्राएलना घराणानं भार वाहावानं शे.
6 मंग त्या दिन सरावर तु उजवी कुशीवर झोप अनी चाळीस दिन यहुदा घराणानं
अधर्मना भार वाहाय; परतेक वरीसनाबद्दल तुना हिशोबमां मी एक दिन धरेल शे.
7 तु आपला तोंड अनी उघडा हात यरूशेलमना वेढाना चित्रकडे रोखीसनं धरं
अनी त्यानाईरोधमां संदेश देय.
8 दख, मी तुले बंधनघाई बांधसं, मनजे तु आपला वेढाना दिन सरस तोपावोत
हाई कुशीकडतीन ती कुशीकडे वळानं नही.
9 तु गहू, जव, पावटे, मसुर, बाजरी अनी काठया गहु लिसनं एक भांडामां
टाक; अनी आपलाकरता त्यानी भाकर बनाडं; तु आपला कुशीवर झोपशी त्या
दिनना संख्याना मानतीन तीनशे नव्वद दिन तुले ती खावानी शे.
10 तु जे अन्न खाशी ते वजनतीन रोजनं ईस शेकेल राहीसनं ते तु मजार मजारमां
खाय;
11 अनी दोन ग्लास पाणी पेय; ते तु दिनमां एकदाव पेय.
12 जवना भाकर परमानं ती भाकर करीसनं खाय; ती लोकेसनासमोर मानवी
विष्ठघाई भुज.
13 परमेश्वर बोलना, यापरमानं मी इस्राएल वंशसना ज्या राष्ट्रमां हाकली दिसू
तठे त्या आपली अमंगळ भाकर खातीन.
14 तवय मी बोलनू, अहा! प्रभू परमेश्वरा! दख, मी कवयच ईटाळनू नही; मी
दाखलपनपाईन आजपावोत कधीच त्याना मरेल नाहिते जनावरले फाडीसनं मारेल
जनावरनं मांस खाद नही; अमंगळ मांस मना तोंडले लागनं नही.
15 मंग तो माले बोलना, दख, मानवी विष्ठेना जागवर गायनं शेण वापरानी मी
तुले परवानगी देस; त्याना गोवर्‍यासघाई आपली भाकर भुज.

16 आजुन तो माले बोलना, मानवपुत्रा, दख, मी यरूशेलममां भाकरीसना आधार
तोडसू मनजे लोके कष्टी व्हयीसनं भाकरी तोलीसनं खातीन; अनी भ्याईसनं पानी
मापमास पितीन.
17 कारण भाकर अनी पानी यासनी तुट पडी, लोके येरायेरकडे दखीसनं
भयचकीत व्हतीन अनी अधर्ममां क्षय पावतीन.

# 5

## मुंडन करीसनं त्यानाकडतीन यरूशलेमनं विनाशनं दर्शन

1 हे मानवपुत्रा, तु एक धारदर तलवार लेय; ती न्हावीना वस्तरानामायक
वापरीसनं आपला डोकावर अनी दाढीवर चालाडं; मंग तराजू लेय अनी केसना
वजन करीसनं त्यासनी वाटणी करं.
2 नगरना वेढाना दिन सरनात मनजे हया केससना एक तृतीयांश नगरनां मजारमां
आगघाई जाळी टाक; एक तृतीयांश केस लिसनं त्यानावर चारीमेर तलवार चालाडं
अनी उरेल तृतीयांश वारावर उडाव; हाई परकारं मी तलवार उपसीसनं त्या लोकेसनी
पाठ पुरावसू.
3 त्यासमासला थोडासा केस लिसनं आपला कपडासना पदरले बांध.
4 त्यामाईन आजुन थोडा लिसनं आगमां टाकीसनं जाळं, मनजे त्यामाईन आग
निघीसनं इस्राएलना सर्वा घराणाले व्यापी.

5 प्रभु परमेश्वर सांगस, दखा, हे यरूशेलम; ज्या दुसरा राष्ट्रसमां स्थापेल शे अनी
हयाना आजुबाजूले देश बसाडेल शेतस.
6 तरी त्यानी दुष्ट आचरण करीसनं मना निर्णयले दुसरा राष्ट्रसपेक्षा जास्त ईरोध
करं, त्यानी आजुबाजूना परदेशपेक्षा मना नियमना ईरोध जास्त करं; कारण त्यासनी
मना निर्णयना अव्हेर करा अनी मना नियमपरमानं त्या चालनात नही.
7 यामुये प्रभु परमेश्वर सांगस, ज्यामुये तुमी आपला आजुबाजूना राष्ट्रसपेक्षा जास्त
बंडाळी करी अनी मना नियमपरमानं चालनात नही, मना निर्णय पाळात नही अनी
आसपास राष्ट्र शेतस त्यासना निर्णयपरमानंसुध्दा वागनात नही.
8 यामुये प्रभु परमेश्वर सांगस, दखा, मी, मीच तुनाईरोधमां व्हसू अनी राष्ट्रसदेखत
तुना न्यायशासन करसू.
9 तुना सर्वा अमंगळ कृत्यासमुये, आजपावोत मी करं नही अनी परत त्यापरमानं
करावू नही, अस मी तुनामां करसू.

10 तुनामां बाप आपला पोऱ्याना मास खायी अनी पोऱ्या आपला बापना मास
खायी; अनी तुनामां न्यायशासन करी अनी तुना बठा उरेल लोके दिशा दिशाले
पसारी टाकसू.
11 प्रभु परमेश्वर सांगस, मनी जीवनी शपथ, तु मना पवित्रस्थान आपला सर्वा
तिरस्करणीय वस्तुसनी अनी अमंगळ कर्म करीसनं भ्रष्ट करं, म्हनीसनं खात्रीतीन
मी तुनावरतीन कृपा काढी लिसू, दया करावू नही.
12 तुना वस्तीना तिसरा हिस्सा महामारीघाई मरी अनी तुनामां लोके उपासमारीमां
नाश पावतीन; तिसरा हिस्सा तुना आजुबाजूले तलवारघाई पडतीन; अनी तिसरा
हिस्सा दिशा दिशाले विखरी टाकसू; मी तलवारघाई त्यासनी पाठ फिरावसू.
13 "अशी मना रागनी पुर्तता व्हयी अनी त्यानावरना मना क्रोधना तृप्ती व्हयीसनं
मन समाधान व्हयी, मी त्यानावरना मना क्रोधना शेवट करं मनजे त्या समजतीन की
मी परमेश्वर हाई आवेशतीन बोलेल शे.
14 आजुन तुना आजुबाजूना राष्ट्रसमां मी तुले उजाड करसू, अपशब्दसना विषय
करसू, अनी येनारा जाणारा हाई दखतीन.
15 "मी क्रोधतीन, संतापतीन अनी तीव्र निषेधवाणीघाई तुनं न्यायशासन करसू
तवय तुना आजुबाजूना राष्ट्रसले तु अपशब्द, निंदा, ताकीद अनी विस्मय यासना
विषय व्हशी; मी परमेश्वर हाई बोलनू शे.
16 मी तुमना नाश कराकरता उपासमारीनं नाशकारक तीक्ष्ण बाण सोडसू, तवय
तुमनावर मी दुष्काळनं कहर करसू अनी तुमन्या भाकरीसना आधार तोडसू;
17 मी तुमनावर दुष्काळ अनी हिंस्र पशु धाडसू; त्या तुमले निसंतान करतीन;
मरी अनी रक्तपात हाई तुमनावर येतीन; मी तुमनावर तलवार आणसू; मी परमेश्वर
हाई बोलनू शे.

# 6

### इस्राएलना पर्वतनाबारामां भविष्य

1 मंग परमेश्वरनं वचन माले प्राप्त व्हयनं की,
2 मानवपुत्रा, तु आपला तोंड इस्त्राएलना पर्वतकडे करीसनं त्यासले लायीसनं
संदेश देय.
3 असं सांग, इस्त्राएलना पर्वतसवन, प्रभु परमेश्वरनं वचन आयका, प्रभु परमेश्वर
पर्वत, टेकडया, नाला अनी खोरा यासले म्हणसं, दखा, मी, मीच तुमनावर तलवार
आणीसनं तुमना उच्चस्थानना नायनाट करसू.

4 तुमन्या वेदया वसाड व्हततीन, तुमन्या सुर्यमूर्त्या फोडी टाकतीन; तुमना मरी
जायेल लोके तुमन्या मुर्तीसनासमोर पडतीन अस करसू.
5 मी इस्राएल लोकेसना प्रेतं त्यासन्या मुर्तीससमोर टाकसु, तुमन्या वेदयासनी
आजुबाजूले तुमना हाडं पसरतीन.
6 तुमना बठा वस्तीस्थानमासला नगरसना नाश व्हतीन अनी उच्चस्थान उजाड
व्हतीन. तुमन्या मुर्त्या भंगीसनं नष्ट व्हतीन, तुमन्या सुर्यमुर्ती तोडी टाकतीन; हाई
परकारं तुमना हातना कामसना नाश करतीन.
7 तुमनामां वध व्हयेल पडतीन तवय तुमले समजी की मी परमेश्वर शे.
8 "तरीबी तुमीनं हाई देशमाईन तो देशमां इकडे तिकडे वशात तवय राष्ट्रसमां
तुमनामाईन काही तलवारपाईन वाचीसनं राहातीन, आशे ज्या उरेल राहातीन त्यासले
मी राखी ठेवसू.
9 तुमनामाईन ज्या राही जायेल शेतस ज्यासले राष्ट्रमां धरीसनं लयी जातीन तठे
त्या मनी आठवन करतीन; तवय मनापाईन दुर व्हयेल त्यासनं दुराचारी हृदय अनी
त्यासनी मुर्तीकडे लायेल त्यासना दुराचारी डोया हाई मी वठणीमां लयीसू.
10 तवय त्या समजतीन की मी परमेश्वर शे, मी त्यासवर हाई अरीष्ट लयीसू हाई
मी निरर्थक सांग नही.
11 प्रभु परमेश्वर सांगस, "आपला हातपाय आपटीसनं सांग, इस्राएल घराणानां
सर्वा अमंगळ दुष्कर्मसले धिक्कार असो; त्या तलवार, दुष्काळ अनी मरी यासघाई
मरतीन.
12 जो दुर राही तो मरीघाई मरी, जो जोडे राही तो तलवारघाई मरी, यामाईनबी
जो कोणी वाची तो दुष्काळमां मरी.
13 परतेक उंच टेकडीवर, बठा डोंगरसना माथावर, परतेक हिरवा झाडनाखाल,
परतेक दाट पानसना एला झाडखाल ज्या ज्या ठिकानले त्यासनी आपला
सर्वा मुर्तीसनासमोर धुपनं अर्पण करं, तठेना त्यासन्या मुर्त्यासमां त्यासन्या
वेदयासनाभोवती त्यासना वध पावले पडतीन, तवय तुमले समजी की मी परमेश्वर
शे.
14 मी आपला हात त्यासनावर उगारसू अनी त्यासना सर्वा वस्तीस्थानमासला
भुमी दिबलकडला रानपेक्षा वैरान अनी ओसाड करसु; तवय त्यासले समजी की
मी परमेश्वर शे.

# 7

## शेवट जवय येयल शे

1 आजुन परमेश्वरनं वचन माले प्राप्त व्हयनं;
2 "प्रभु परमेश्वर इस्राएल देशले सांगस, "हे मानवपुत्र," शेवट व्हयेल शे, देशना
चारी बाजुना अंत व्हयेल शे.
3 "आते तुना अंत व्हयेल शे, मी मना संताप तुनावर भडकावसु, तुनी
करणीपरमानं तुनं न्याय करसू अनी तुना सर्वा अमंगळ कृत्यासना प्रतिफळ तुले
दिसू
4 मी तुनावर कृपादृष्टी करावू नही, मी दया करावू नही; तर तुना करणीना
प्रतिफळ तुले दिसू, तुना अमंगळ कृत्यासना प्रतिफळ तुनामां दखाई तवय तुमले
समजी की मी परमेश्वर शे.
5 प्रभु परमेश्वर सांगस, विपत्तिमांगे विपत्ती यि राहीनी शे.
6 अंत व्हयेल शे, व्हयेल शे, तो तुनाकरता जागृत व्हयेल शे; दख, तो यि राहीना
शे.
7 देशमासला रहीवास्या, तुनी घडी भरेल शे, काळ ऊना शे, दिन जोडे येयल
शे, डोंगरवर आनंद नहीते धुमाकूळ व्हनार शे.
8 "आते मी संतापमां क्रोधना वर्षाव तुनावर करसु, मी मनी क्रोधनी परीपूर्ति
तुनावर करसु, तुना आचरनपरमानं तुना न्याय करसू अनी तुना सर्वा अमंगळ
कृत्यासना प्रतिफळ तुले दिसू.
9 मी तुनावर कृपादृष्टी करावू नही; मी तुनी दया करावू नही; तर तुनं आचरणंनं
प्रतिफळ तुले दिसू, तुना अमंगळ कृत्यासना प्रतिफळ तुले दिसू. तवय तुले समजी
की मी परमेश्वर तुले मारणार शे.
10 दख, तो दिन! दख तो यि राहीना शे! तुना शिक्षारूपी रोप उगवना शे, तो
फोफाईसनं त्याना दंड बनेल शे, तो गर्वतीन फुगी जायेल शे.
11 बलात्कार हाई शासनदंड व्हयीसनं बसेल शे, त्या लोकेसमासला कोणीबी,
त्यासना समुहमासला कोणीबी, त्याना धनमासला काहीबी, उराव नही; त्यासनी
काहीच प्रतिष्ठा राहावावू नही.
12 येळ येयल शे, दिन जोडे येयल शे, ईकत लेनारानी आनंद कराले नको,
ईकनाराले दुख व्हवाले नको; कारण त्या सर्वा समुहवर क्रोध यि राहिना शे.
13 ईकनारा जीवत राहिना तरी तो ईकेल जमीनपान परत जावावू नही; कारण
हाई भविष्य त्या सर्वा समुहबद्दल शे; त्यामासला काहीच चुकावू नही; कोणीच
आपला अधर्मतीन आपला जीवले बळकटी आणावू नही.

14 त्या करणा वाजाडतसं, बठी तयारी करतसं, तरी कोणीच युध्द कराले पुढे
सरकतसं नही; कारण त्या समुहवर मना कोप व्हयेल शे.

इस्राएलला पापना दंड

15 बाहेर तलवार, मजारमां मरी अनी दुष्काळ; वावरमां ज्या शेतस त्या
तलवारघाई मरतीन; नगरमां ज्या शेतस त्या दुष्काळ अनी महामारी त्यासले मारी
टाकी.
16 त्यासमासला काही वाचतीन त्या वाचतीन, पण त्या सर्वा खोरामासला
पारवासपरमानं डोंगरवर आपला अधर्ममुये फिरत राहातीन.
17 बठासना हात ढिला पडतीन, त्यानसा गुडघामां पाणी व्हयी.
18 त्या कंबरले गोणताट गुंडाळतीन, दरारा त्यासले व्यापी टाकी; त्या बठासनी
तोंडवर लज्जा राही अनी सर्वासना डोका भादरतीन.
19 त्या आपला पैसा रस्तावर फेकी देतीन; त्यासले आपला सोना अमंगळ
वाटी, परमेश्वरना कोपना दिन त्यासना सोनारूप्यासघाई त्यासना बचाव व्हवावू
नही, त्यासपाईन त्यासनी जीवनी तृप्ती व्हवावू नही, त्यासनं पोट भरावू नही, कारण
त्यासनी त्यामुये ठोकर खाईसनं अधर्म करेल शे.
20 त्यासनी त्यानी करेल भुषणे दिमाख दखाडाकरता वापरी; त्यासनी त्यानी
अमंगळ मुर्ती अनी तिरस्करणीय वस्तु आपलाकरता बनाडयात; म्हनीसनं ते
त्यासले अमंगळ वस्तुसनासारखा वाटाले पाहिजे अस मी करेल शे.
21 ते मी परदेशीसले भक्ष्य म्हनीसनं दिसू, ते जगमासला दुष्टासले लूट म्हनीसनं
दिसू, त्या ते भ्रष्ट करतीन.
22 मी आपलं तोंड त्यासनापाईन फिरावसू, मनजे त्या लोके मना भांडार भ्रष्ट
करतीन, लुटारू त्यामां घुशीसनं ते भ्रष्ट करतीन.
23 "बेडी तयार करा, कारण देश रक्तपातना गुन्हासघाई भरेल शे, नगर हिंसाघाई
भरेल शे
24 त्याकरता मी वाईटमासाला वाईले लयी यिसू; त्या त्यासना घर ताबामां
लेतीन; ज्या ताकदवान शेतस त्यासना ताठपणा तोडी टाकसू; त्यासना पवित्रस्थान
भ्रष्ट करी टाकसू.
25 नाश यि राहीना शे; त्या शांती शोधतीन पण त्यासले सापडावू नही.
26 संकटवर संकट येतीन अनी अफवावर अफवा पसरतीन; तवय त्या
संदेष्टासले दृष्टांत सांगाले सांगतीन पण याजकसना धर्मशास्त्रना ज्ञान अनी वडीलसना
मसलत देवानं सामर्थ्य हाई नष्ट व्हतीन.

27 राजा शोक करतीन सरदार दराराघाई भ्याईतीन; देशमासला लोकेसना हात
थरथर कांपतीन; मी त्यासना आचरणपरमानं त्यासनासंगे वागसू, त्यासना गुणपरमानं
त्यासना न्याय करसू; तवय त्यासले समजी की मी परमेश्वर शे.

## परमेश्वरनीबारामां यहज्केलले दुसरं दर्शन

# 8

### संदेष्टयाले यरूशलेमासला वाईट कृत्यसना दृष्टांत

1 सहावा वरीसले सहावा महीनाना पंचमीले आशे व्हयनं की मी मना घर बसेल
व्हतूं अनी यहुदासना वडील मनासमोर बसेल व्हतात; तवय तठे परमेश्वरना सामर्थ्य
मनावर ऊना.
2 मी दख तवय एक माणसु शे आशे माले भास व्हयनं; त्यानां कंबरपाईन खाल
आगना शे आशे माले भास व्हयनं अनी त्याना कंबरपाईन वर पितयना तेजनासारखा
तेज माले दखायनं.
3 तवय त्यानी हात पुढे करीसनं मनी डोकानी एक लट धरी, अनी आत्मातीन
आकाश अनी पृथ्वीनी मजार माले उचलीसनं दिव्यदृष्टीतीन यरूशेलम आठे उत्तरले
मजारमां आंगणना दारनाजोडे आणं; तठे जाळी टाकी आशी मुर्तीनं आसन व्हतं.
4 मंग दख, तवय मी खोरामां दृष्टांत दखं व्हतं त्यानासारखाच इस्राएलना देवना
तेज तठे व्हतं.
5 तवय तो माले बोलना, मानवपुत्रा, आपला डोया वर करीसनं उत्तर दिशाकडे
दख, मी उत्तरले दृष्टी लायी तवय वेदीना वेशीना उत्तरले मंदीरना प्रवेशव्दारना
रस्तामां आग तयार करनारी मुर्ती व्हती.
6 तो माले बोलना, मानवपुत्रा, त्या काय करी राहिना शेतस ते दखी राहीना ना?
मी मना पवित्रस्थानमाईन दूर निघी जावाले पाहिजे म्हनीसनं आशी अमंगळ कृत्ये
इस्राएल घराणं करी राहीना शे; यानापेक्षा जास्त अमंगळ कृत्ये तुले दखायतीन.
7 तवय त्यानी माले आंगणना प्रवेशना रस्तामां आणं; मी दख भितले छीद्र पडेल
व्हतात.
8 त्यानी माले सांग, मानवपुत्रा, भित खंद, मी भित खंदी तवय दखं तर; दार
लागनं
9 तवय तो माले बोलना, आठे हया माणसे कसाना दुष्ट अनी अमंगळ कृत्ये करी
राहीना शेतस त्या दख.

10 मी मजार जायीसनं दख तवय सरपटणारा प्राणी, अमंगळ पशु अनी इस्राएल
घराणान्या बठया मुरत्या त्यासना चित्र भितना चारीमेर काढेल व्हत्यात.
11 त्यासनासमोर इस्राएल घराणाना वडीलमासला सत्तर माणसे उभा व्हतात तवय
त्यासनामां याजन्या बिन शाफान हाऊ उभा व्हता; त्या परतेक माणुसना हातमां
धुपाटना व्हतात; तठे धुपना दाट धुरना धुराडा वर जाई राहींनता.
12 तो माले बोलना, मानवपुत्रा, इस्राएल घराणाना परतेक वडील आपला
मुर्तीसना घरमां अंधारमां काय करी राहीना शे हाई तुले दखाई राहीना शे ना? त्या
तर सांगतस की परमेश्वर आमले दखसं नही; परमेश्वरनी देशना त्याग करेल शे.
13 तो माले बोलना, त्या यानापेक्षा जास्त अमंगळ कृत्ये करी राहीना शेतस, त्या
तुले परत दखावामां येतीन.
14 तवय त्यानी माले परमेश्वरना मंदीरना उत्तरले जो दरवाजा व्हता तठे आणं;
तवय तठे बाया बसीसनं तम्मुजकरता शोक करी राहींनत्यात.
15 तो माले बोलना, मानवपुत्रा, तुले हाई दखास ना? हयानापेक्षा जास्त अमंगळ
गोष्टी तुले दखायतीन.
16 तवय त्यानी माले परमेशवरना मंदीरना मजारना आंगणमां लयी गया; तवय
दख, परमेश्वरना मंदीरना दारपान देवडी अनी वेदीना मजारमां जवयपास पंचवीस
माणसे परमेश्वरना मंदीरकडे पाठ करीसनं अनी पुर्वले तोंड करीसनं उभा व्हतात;
त्या पुर्व दिशाले सुर्यनी उपासना करत व्हतात.
17 तो माले बोलना, मानवपुत्रा, तुले हाई दखास ना? यहुदाना घराणं आठे
अमंगळ कृत्ये करी राहीना शे, हाई कमी व्हयनं का? देश जुलूमना कृत्यासघाई
भरीसनं त्या माले परत परत राग आनाडी राहीना शेतस; दख, त्या आपला नाकाले
फाटा लायी राहीना शेतस.
18 यामुये संतापमां मी जे करसू ते करसू; मी त्यासवर कृपादृष्टी करावू नही;
त्यासवर दया करावू नही; त्या मोठा आवाजतीन मना कानपान आरोळया मारतीन
तवय मी त्यासना आयकावू नही.

# 9

## यरूशलेमले दंड

1 मंग त्यानी माले आयकाले यी आशे जोरमां बोलना, नगरना राखणदारसवन,
तुमी आपला बठा नाश करनारा हत्यार हातमां लिसनं ईकडे या.

2 तवय दख, उत्तरकडली वरनी वेशीना सवू माणसे आपला हातमां नाश करनारा
हत्यार लिसनं ऊनात; त्यासनामां शुभ्र तागना कपडा घालेल एक माणुस व्हता; त्याना
कंबरनाजोडे कारकुनी दऊत व्हती. त्या मजार जायीसनं पितळी वेदीनाजोडे उभा
राहीनात.
3 कस्बारढ इस्राएलना देवना तेज तठेन निघीसनं मंदीरना उंबरठावर ऊना; अनी
कंबरनाजोडे कारकुननी दऊत ज्यापान व्हती अनी शुभ्र कपडा घालेल त्या माणसुले
त्यानी हाक मारी.
4 परमेश्वर त्याले बोलना, नगरमाईन, यरूशेलममां जाईसनं ज्या माणसे आपलामां
व्हयी राहेल बठा अमंगळ कृत्यासमुये उसासे टाकीसनं विलाप करी राहीना शेतस
त्यासना कपायवर चिन्ह कर.
5 माले आयकाले यी आशे तो बाकीसले बोलना, त्यानामागे नगरमां जा अनी
त्यासना नाश कर; कृपादृष्टी करानं नही अनी दया करानं नही;
6 धयडा, तरूण अनी कुवाऱ्या, पोऱ्या अनी बाया हया बठासना कत्तल कर; पन
ज्यासवर चिन्ह व्हयी त्यासले हात लावानं नही; मना पवित्रस्थानपाईन चालू करा;
तवय मंदीरनासमोर ज्या वडील उभा व्हतात तठेन त्यासनी सुरूवात करी.
7 त्यानी त्यासले सांग, मंदीर भ्रष्ट करा; आंगण वधेलसघाई भरी टाका; चाला,
निघा; तवय त्यासनी जायीसनं नगरना नाश करं;
8 त्यासनी आशी कत्तल चालू व्हती तवय मी सुटनू अनी मी उपडा पडीसनं
वरडीसनं बोलनू; हाय! प्रभु परमेश्वरा, तु यरूशेलमवर आपला क्रोधना वर्षाव
करीसनं बठा इस्राएलना नाश करशी का?
9 तवय तो माले बोलना, इस्राएल अनी यहुदा यासना घराणाना अधर्म भलता
भारी शे; देश रक्तपातना भरेल शे; नगर अन्यायघाई भरेल शे; कारण त्या म्हनतसं,
परमेश्वरनी देशना त्याग करेल शे, परमेश्वर दखस नही.
10 मी तर कृपादृष्टी करावू नही, दया करावू नही, त्यासना आचरणं प्रतिफय
त्यासना डोकावर टाकसू.
11 तवय दख; कंबरनाजोडे कारकूननं दऊत ज्यापान व्हतं अनी शुभ्र तागना
कपडा घालेल तो माणुस परत यिसनं कळाडं की तुनी आज्ञापरमानं मी करेल शे.

# 10

## परमेश्वरना तेज यरूशलेमना मंदीरमाईन निघी जासं

1 मी दख तवय तो करूबनावरना छतवर तृणमनीनासारखा काही तरी दखयनं; ते
सिंहना मूर्तीनामायक व्हतं.
2 मंग परमेश्वर तागना कपडा घालेल माणुसले बोलना, करूबानाखाल चाकना
मजार जायीसनं करूबमाईन भितकासघाई आपली ओंजळ भर अनी ते नगरवर
विखर, तवय तो मनासमोर गया.
3 तो माणसु मजार गया तवय करूब मंदीरना उजवीकडे उभा व्हतात अनी
मजारना आंगण ढगघाई व्यापी टाकं व्हतं.
4 परमेश्वरनं तेज करूबवरतीन निघीसनं मंदीरना उंबरठावर येयल व्हतं; मंदीर
ढगघाई व्यापी जायेल व्हतं अनी आंगण परमेश्वरनं तेजघाई भरी जायेल व्हतं.
5 करूबना पंखसना आवाज बाहेर आंगणमां जायी राहींनता; सर्वसमर्थ देवनी
वाणीनामायक तो व्हता.
6 त्यानी शुभ्र तागना कपडा घालेल माणसुले आज्ञा दिसनं सांग की त्या
चाकसमाईन, करूबना मजारतीन भितकं लेय; तवय तो जायीसनं चाकना बाजुले
उभा राहीना.
7 मंग त्या करूबासमाईन एकनी आपला हात लांबाडीसनं करूबमासला ईस्तवले
तो लावं; त्यानी त्यामाईन काही इंगळ लिसनं तागना कपडा घालेल त्या माणुसना
हातमां दिदं; तो त्या लिसनं निघी गया.
8 तठे करूबनाजोडे त्यासना पखसनाखाल माणुसना हातना आकृतीनामायक
काही तरी नजरमां व्हनं.
9 मी दख तवय परतेक करूबना बाजुले एक आशी बठया करूबना बाजुले चार
चाके व्हतात; त्या चाके चमकनारा दखाई राहींनात.
10 दखावाले त्या चार चाकना डौलनामायक व्हतात; त्या जशे काय चाकनामांगे
चाक आशे व्हतात.
11 त्या चालेत तवय चारी दिशाले पाहीजे त्या दिशासले जायेत; चालतांना वयेत
नही; परतेक मस्तकना रोखतीन त्या जायेत, त्या चालेत तवय वयेत नही.
12 त्यासना बठा आंग, पाठ, हात, पख अनी चार चाके यासले बठीकडे डोया
व्हतात.
13 चाकसले गरगर फिरनारा चाके आशे मी आयकं,
14 त्या परतेकले चार तोंड व्हतात; पहीले तोंड करूबना तोंडनामायक व्हतं;
दुसरं माणुसना तोंडनामायक व्हतं; तिसरं सिंहना तोंडनामायक व्हतं अनी चौथ
गरूडना तोंडनामायक व्हतं.

15 त्या करुब वर उडीसनं गयात; मी खबार नदीना काठले दख तो हाऊ प्राणी
शे.
16 करुब चालनात मनजे चाके त्यानासंगे चालेत अनी जमीनवरतीन वर
उडाकरता त्या आपला पख उचलेत तवय त्या चाके येगळा व्हयेत नही.
17 त्या थांबनात मनजे त्याबी थांबेत; त्या वर उडनात मनजे त्यानाबरोबर त्या
वर जायेत; कारण त्या प्राण्यासना आत्मा त्यासमा व्हता.
18 तवय परमेश्वरनं तेज मंदीरना उंबरठावरतीन निघीसनं करुबनाजोडे जायीसनं
राहीनात.
19 निंघाना येळले करुबनी आपला पख उचलात अनी त्या मनासमोर
जमीनपाईन वर चढीसनं गयात; त्यानासंगे चाकबी गयात; त्या परमेश्वरना मंदीरना
पुर्व दारपान थांबनात; त्यासनावर इस्राएलना देवना तेज व्हता.
20 खबार नदीना काठले मी इस्राएलना देवना आसननीखाल दख व्हतं तो हाऊ
प्राणी शे; त्या करुब शेतस हाई माले कयनं.
21 त्यासले परतेकले चार तोंड व्हतात अनी त्यासले परतेकले चार पख व्हतात;
त्यासना पखनाखाल माणसुनी हातनामायक आकृती व्हती.
22 त्यासना चेहरानीबारामा बोलशात ते खबार नदीना काठले मी दखेल
चेहरानामायक त्या व्हतात. त्यासना रुप अनी त्या सोता तशाच व्हतात; त्या सरळ
आपलासारखा चालेत.

# 11

## यरुशलेमनी निंदा

1 मंग आत्मानी माले उचलीसनं परमेश्वरना मंदीरना पुर्वाभिमुख पुर्व वेशीकडे
आणं; तवय दख, वेशीनामोरे पंचवीस माणसे व्हतात; त्यासनामा याजन्या बिन
अज्जूर, अनी पलटया बिन बनाया हया लोकनायक मना नजरमा पडनात.
2 तो माले बोलना, मानवपुत्रा, वाईट योजना करनारा अनी हाई नगरमा अनिष्ट
संकल्प करनारा त्या हयाच माणसे शेतस.
3 त्या बोलतसं, घर बांधानी येळ आजुन येयल नही शे; हाई नगर जशी काय
कढई अनी आमी त्यामासला मांस शे.
4 त्याकरता त्यासनाईरोधमा संदेश देय, मानवपुत्रा, संदेश देय.
5 तवय परमेश्वरना आत्मा मनावर उतरना, तो बोलना, आशे सांग, परमेश्वर
सांगस, अहो इस्राएल वंशसवन, तुमी आशे सांग; तुमना मनमा काय काय यि राहीना
शे ते माले माहीत शे.

6 तुमी हाई नगरमां बराच जणसले मारी टाक; तठेना रस्ता प्रेतघाई भरी टाकात.
7 यामुये प्रभू परमेश्वर सांगस, तुमी या नगरमां ज्यासले मारी टाकं, त्या मांस
शेतस, अनी हाई नगर कढई शे; तुमले तर तठेतीन बाहेर लयी जातीन.
8 तुमी तलवारले भ्यायतसं, मी तुमनावर तलवार आणसू आशे परमेश्वर सांगस.
9 मी तुमले त्यामाईन बाहेर काढसू, मी तुमले परदेशीसना हातमां दिसू अनी तुमले
न्यायदंड करसू.
10 तुमी तलवारघाई पडशात, इस्राएलनी सीमावर तुमनं न्याय करसू तवय तुमले
समजी की मी परमेश्वर शे.
11 हाई नगर तुमले कढई व्हवावू नही अनी तुमीन त्यामासला मांस व्हवात नही,
इस्राएलना सीमावर तुमनं न्याय करसू.
12 तवय तुमले समजी की मी परमेश्वर शे; कारण तुमीन मना नियमपरमानं
चालनात नही, मना निर्णय तुमी पायात नही, तर तुमीन आपला आजुबाजूना राष्ट्रसना
नियमपरमानं वागनात.
13 मी हाऊ संदेश दि राहींनतु तवय आशे व्हयनं की पलटया बिन बनाया मरना,
तवय मी उबडा पडीसनं जोरमां वरडीसनं बोलनू, अहा प्रभु परमेश्वरा, तु इस्राएलना
अवशेषसना पुरा अंत करीशी का?

### बंदीगृहमां जायेल लोकेसकरता परमेश्वरनी प्रतिज्ञा

14 परमेश्वरनं वचन माले प्राप्त व्हयनं की
15 मानवपुत्रा, "ज्या यरूशेलमनिवासी, परमेश्वरपाईन दूर राहाय, आमले देश
वतन मिळेल शे, आशे म्हणतसं त्या तुना भाऊबंदच, तुना आप्तजन, इस्राएलना बठा
घराणा शेतस."
16 त्याकरता आशे बोल, प्रभु परमेश्वर सांगस की मी त्यासले राष्ट्रमाईन
घालाडीसनं देश देशमां पांगाडेल शे; तरी ज्या ज्या देशमां त्या जायेल शेतस तठे
मी त्यासले अल्पकाय पवित्रस्थान व्हसू.
17 त्याकरता आशे बोल, प्रभु परमेश्वर सांगस की मी तुमले राष्ट्रसमाईन गोया
करीसनं आणसू; ज्या ज्या देशमां तुमीन पांगले शेतस तठेन मी तुमले जमा करीसन
आणसू. अनी इस्राएल देश तुमले दिसू.
18 त्या आठे येतीन अनी तठेना तिरस्करणीय अनी अमंगळ वस्तू आठेतीन
काढी टाकसू.
19 मी त्यासले एकच हृदय दिसू; तुमनामां नवीन आत्मा घालसू; मी त्यासना
देहमाईन पाषाणयुक्त हृदय काढी टाकसू त्यासले मांसमय हृदय दिसू.

20 मनजे त्या मना नियमले धरीसनं चालतीन, मना निर्णय पायीसनं त्यापरमानं
वागतीन, त्या मना लोके व्हतीन अनी मी त्यासना देव व्हसू.
21 तरी ज्यासनं मन त्यासना तिरस्करणीय अनी अमंगळ वस्तुसना मनोरथ
परमानं चालतीन त्यासनं आचरणनं प्रतिफळ त्यासनाच माथी यी आशे मी करसू,
आशे प्रभु परमेश्वर सांगस.

### परमेश्वरनी महिमा यरूशलेममाईन परत जासं

22 तवय करूबसनी आपला पख उचलात, त्यासनासंगे चाक बी उचलाई गयात
अनी इस्राएलना देवना तेज त्यासनावर व्हतं.
23 मंग परमेश्वरना सामर्थ्य नगरनां मध्यभागतीन वर चढीसनं नगरना पुर्वना
पर्वतवर राहीनं.
24 तवय त्या आत्म्यानी दृष्टांतमां माले उचलीसनं खास्दी देशमां धरीसनं आणेल
लोकेसकडे आणं; अनी जो दृष्टांत मी दखी राहींनतू तो मना डोयाआड व्हयना.
25 मंग परमेश्वरनी माले सांगले सर्वा वचन, धरीसनं आणेल त्या लोकेसले मी
सांग.

# 12

### यहज्केल बंदीवासना चित्र दखाडस

1 परमेश्वरनं वचन माले प्राप्त व्हयनं की
2 मानवपुत्रा, तु फितुरी घराणामां राही राहीना शे, त्यासले डोया राहीसनं दखास
नही, कान राहीसनं आयकाले येस नही; कारण त्या फितुरी घराणामासला शेतस.
3 त्याकरता हे मानवपुत्रा, तु देशांतर कराले लागनारी सामग्री तयार कर, अनी
भरदिवसमां त्यासनादेखत निघी जाय; त्यासनासमोर आपला ठिकान सोडीसनं
दुसरी ठिकानले जाय; न जानो हाई त्यासना ध्यानमा तरी यि; त्या तर बंडखोर
घराणामासला शेतस.
4 देश सोडी जाशी तवय सामग्री बाहेर काढतसं तशे तु भरदिनमां त्यासनासमोर
आपला सामानसुमान बाहेर काढ, अनी देश सोडीसनं निघतसं तशे संध्याकायले
त्यासनासमोर निघं.
5 त्यासनासमोर तटले आरपार भोक पाड अनी त्यामाईन आपला सामानसुमान
लयी जाय.

6 त्यासनासमोर ते खांदावर लेय अनी अंधार पडना मनजे ते लयी जाय, तु
आपला तोंड झाकी ले मनजे जमीन तुले दखावू नही; कारण मी तुले इस्राएल
घराणानं चिन्हवत नेमेल शे.
7 माले आज्ञा व्हयनी तशे मी करं देशांतराले सामान लयी जातस तशे मी भरदीनमां
आपला सामानसुमान बाहेर काढं अनी संध्याकायल मी तटले आरपार छिद्र पाडात;
अंधार पडना तवय मी सामान बाहेर लयी गयू अनी त्यासनासमोर ते मी खांदावर
लिद.
8 सकासले परमेश्वरनं वचन माले प्राप्त व्हयनं की,
9 मानवपुत्रा, तु काय करसं, आशे तुले त्या इस्राएल घराणानी, त्या फितुरी
घराणानी, सांग ना?
10 त्यासले सांग, प्रभु परमेश्वर सांगस की हाई देववचन यरूशेलममासला
अधिपतीसले अनी ज्या इस्राएल घराणामासला त्या शेतस त्या बठा घराणाले लागू
शे.
11 आशे सांग की मी तुमले चिन्हवत शे; मी त्यासले करी दखाडं तसेच त्यासले
घडी; त्या हद्दपार व्हतीन; बंदीवासमां जातीन.
12 त्यासमासला सरदार अंधार पडना मनजे खांदावर सामान लिसनं निघी जाई;
त्या भितडा फोडीसनं त्यामाईन त्या लयी जातीन; तो आपला तोंड झाकी मनजे
त्याना डोयाला जमीन दखावू नही.
13 मी त्यानावर आपलं जाळं टाकसू मनजे तो मना फासामां सापडी; मी त्यासले
बाबेलले खास्दयासना देशमां लयी जासू; पण तो देश त्याले दखामां येवावू नही अनी
तो तठेच मरी.
14 मी त्याना आजुबाजूना त्याले मदत करनारा अनी त्यानी बठी सेना यासनी
दाही देशामा दाणादाण करसू, अनी मी तलवार काढीसनं त्यासना पाठलाग करसू.
15 "मी त्यासले राष्ट्रसमां इकडे तिकडे करसू, तवय त्यासले समजी की मी
परमेश्वर शे.
16 तरी त्यासमासला बाकीनासले तलवार, दुष्काळ अनी मरी हयानापाईन
वाचाडसू; मनजे त्या ज्या ज्या राष्ट्रमां जातीन तठे आपल्या अमंगळ कृत्यासना
गोष्टया सांगतीन; तवय त्यासले समजी की मी परमेश्वर शे."

### थरकाप करनारा भविष्य वक्तानां चिन्ह

17 मंग परमेश्वरनं वचन माले प्राप्त व्हयनं की,
18 मानवपुत्रा, तु थरथर कापीसन अन्न खाय; कंपायमन व्हयीसनं अनी चिंतातूर
व्हयीसनं पाणी पेय;

19 अनी हया देशमासला लोकेसले सांग की प्रभू परमेश्वर इस्त्राएल देशमासला
यरूशेलम निवासीसनीबारामां सांगस की त्या चिंतातूर व्हयीसनं अन्न खातीन;
भयभीत व्हयीसनं पाणी पितीनं; कारण त्या देशमासला रहीवाशासना दुष्टपनातीन
त्या भुमीमासला बठ काही नष्ट करीसनं ओसाड करामां येयल शे.
20 बसेल नगर उजाड व्हतीन, जमीन ओसाड व्हयी, मनजे तुमले समजी की
परमेश्वर शे.

## लोकप्रीय म्हणी अनी अलोकप्रिय संदेश

21 मंग परमेश्वरनं वचन माले प्राप्त व्हयनं की मानवपुत्रा,
22 दिन लांबी राहीना शेतस, परतेक दृष्टांत निष्फळ व्हयी राहीना शे, हाई जो
प्रवाद इस्त्राएल देशमां तुमना तोंडमां पडेल शे त्याना अर्थ काय?
23 मंत त्यासले सांग; प्रभु परमेश्वर आशे सांगस की मी हया म्हणीसना प्रचार
बंद करसू अनी ती त्या इस्त्राएलमां परत कोणी बोलावूत नहीं; त्यासले सांग दिन
जोडे येयल शेतस अनी परतेक दृष्टांत प्रतयास येवानं येळ जोडे शे.
24 इस्त्राएल घराणामां यानामोरे निरर्थक दृष्टांत अनी खुश करनारा शकून सांगावूत
नही.
25 कारण मी परमेश्वर शे, मी बोली राहीनू शे अनी जे मी बोलसं ते व्हसं; त्याले
येळ लागावू नहीं, कारण प्रभू परमेश्वर सांगस, हे फितुर घराण, मी तुमना कायमां
वचन बोलस अनी ते पुरं करसू.
26 परमेश्वरनं वचन माले प्राप्त व्हयनं की,
27 मानवपुत्रा, दख, इस्त्राएल घराणं सांगी राहीना शे की त्यानी जे दर्शन दख
त्याले बराच येळ शे. तो दुरना काळनीबारामां संदेश दी राहीना शे.
28 त्यामुये त्यासले सांग, प्रभु परमेश्वर सांगस की मना कोणतेच वचनले येळ
लागावू नहीं; मी बोलसू ते वचन पुरं व्हयीच जाई आशे परमेश्वर सांगस.

# 13

## खोटा संदेष्टाना निषेध

1 परमेश्वरनं वचन माले प्राप्त व्हयनं की,
2 "मानवपुत्रा," संदेश देनारा इस्त्राएलना संदेष्टासना ईरोधमां संदेश देय; ज्या
आपला मनतीन संदेश देतसं त्यासले सांग, परमेश्वरनं वचन आयका.

3 प्रभु परमेश्वर सांगस, ज्या मुर्ख संदेष्टा दृष्टांत दखाशिवाय आपला मनतीन संदेश
देतसं त्या हायहाय करोत.
4 हे इस्त्राएला, तुना संदेष्टा ओसाड जागमां राहाणारा कोल्हासनामायक व्हयी
जायेल शेतस.
5 परमेश्वरना दिनमां युध्दले तोंड देवाले तुमी खिंडारमां उभं राहातसं नही अनी
इस्त्राएल घराणाना तट नीट बांधीसनं काढतसं नहीं.
6 परमेश्वरनी त्याले धाडं नही व्हतं ते हाई परमेश्वरनी वाणी आशे म्हणनारा
पोकय दृष्टांत अनी खोटं शकून दखतसं; अनी शकून परमानं घडी अशी आशा त्या
धरतसं.
7 तुमीन निरर्थक दृष्टांत दख, खोठा शकून सांग, अनी मी बोलतू नही ते हाई
परमेश्वरनं वचन आशे तुमीन म्हणतसं, आशी गोष्ट शे ना?

8 यामुये प्रभू परमेश्वर सांगस, तुमी पोकय गोष्टी सांगतस अनी खोटं दृष्टांत
दखतसं, तर दखा, मी तुमले ईरोध करसू आशे प्रभु परमेश्वर सांगस.
9 निरर्थक दृष्टांत दखणारा अनी खोटा शकून सांगणारा संदेष्टासवर मना हात
चाली; मना लोकेसनी मंडयीमां त्यासले प्रवेश मिळावू नही, इस्त्राएल घराणानी
नावनी यादीमां त्यासनी नोंद व्हवावू नही, इस्त्राएल देशमां त्यासनं जाणं व्हवावू
नही; तवय तुमले समजी की मी प्रभू परमेश्वर शे.
10 हयानं कारण हाईच शे की त्यासनी मना लोकेसले फसाडं शे, शांती नही शे
तरी शांती शे आशे त्यासले सांगेल शे; अनी मना लोके तट बांधत व्हतात तवय दख,
त्याले ते कच्चा चुनाघाई लिपी राहीना शेतस.
11 त्या कच्चा चुना लिपनारासले सांग, तडा पडतीन, जोरमां पाऊस लागी;
अहो मोठया गारासवन, तुमी पडशात; तुफानी वारा सुटी.
12 दख, तो भित पडावर तुमी लिपेल चुना कोठे शे, आशे लोके तुमले बोलावूत
नहीं का?"

13 हयाकरता प्रभु परमेश्वर सांगस, आपला संतापमुये तुफानी वारा सुटी आशे
मी करसू; मना कोपमुये जोरमां पाऊस पडी, नाश व्हवाकरता मना संतापमुये मोठया
गारा पडतीन.
14 तुमना कच्चा चुना लिपेल भित मी पाडीसनं जमीनदोस्त करसू, मनजे त्याना
पाया उघडा पडी; भित पडी अनी तुमी त्यानासंगे नष्ट व्हशात; तवय तुमले समजी
की मी प्रभू परमेश्वर शे.

15 मी मना संतापना कहर त्या भितडासवर अनी त्याले कच्चा चुना लिपनारा
लयी यिसू; तवय मी तुमले सांगसू, तट अनी त्याले कच्चा चुना लिपनारा नष्ट व्हयी
जायेल शेतस.
16 ज्या संदेष्टयासनी यरूशेलमनाबारामां संदेश दिदा अनी शांती नही व्हती तरी
शांती शे आशे दृष्टांत सांग, त्या तुमी नष्ट व्हयी जायेल शेतस, आशे परमेश्वर सांगस.

## खोटया बायासना ईरोधमां भविष्यवाणी

17 आजुन हे मानवपुत्रा, आपलाच मनतीन संदेश देनारा तुना लोकेसनी
पोरीसकडे तोंड करीसनं त्यासना ईरोधमां त्यासले संदेश देय.
18 त्यासले सांग, प्रभु परमेश्वर सांगस, लोकेसले फसाडाकरता

ज्या तुमी परतेक कोपराले पट्टया शिसनं लावतसं, अनी येगयेगळा उचा माणुसना डोकाकरता जाया तयार करतसं, त्या तुमी हायहाय म्हणशात, तुमी मना लोकेसले फसाडाकरता, सोतानं जीवना बचाव करतसं.

19 लबाडीले कान देनारा मना लोकेसले लबाडी सांगीसनं, ज्या मराले नही
पाहीजेत त्यासले मारीसनं अनी ज्या जगाले नही पाहीजेत त्यासले वाचाडीसनं
मुठभर साळकरता अनी भाकरीसना तुकडासकरता तुमी मना लोकेसमोर मना
अपमान करेल शे.
20 हयाकरता प्रभु परमेश्वर सांगस, दखा, ज्या पट्टया बांधीसनं तुमीन
चिडासपरमानं शिकार करतसं, त्यासनी मी वाट लावसू; मी तुमना बाहूवरतीन त्या
पट्टया फाडीसन काढी टाकसू अनी ज्या आत्म्यासना तुमी चिडासपरमानं शिकार
करतसं, त्यासले मुक्त करसू.
21 तुमन्या डोकावरना जाळ्याभी मी फाडी टाकसू, तुमना हातमासला मना
लोकेसले सोडावसू; त्या यानामोरे तुमना हातघाई भक्ष्य व्हवावूत नही, तवय तुमले
समजी की मी परमेश्वर शे.
22 "कारण ज्या धार्मिकसले मी दुखाडं नही त्याना मन तुमी खोट बोलीसनं
दुखाडतसं, अनी दुष्टनी आपला कुकर्मपाईन वळाले नही पाहिजे, आपला जीव
वाचावू नही आशे तुमी त्याना हातले बळ देतसं.
23 म्हनीसनं यानामोरे तुमी बिनकामनं भविष्य दखानं अनी तुमनं शकून दखानं
बंद व्हयी; अनी मी आपला लोकेसले तुमना हातमाईन सोडावसू, तवय तुमले समजी
की मी परमेश्वर शे."

# 14

## परमेश्वरकडतीन मुर्ती पुजा करणारासले इशारा

1 इस्त्राएलना वडीलसमाईन बराच माणसे मनाकडे यिसनं मनासमोर बसनात.
2 तवय परमेश्वरनं वचन माले प्राप्त व्हयनं की,
3 मानवपुत्रा, हया लोकेसनी आपला मनमां आपल्या मुरत्या वागाडेल शेतस;
त्यासनी आपलं पापजनक अडखळण आपला नजरनासमोर ठेयेल शे; आशे
लोकेसले मी तुमले प्रश्न ईचारु दिसू का?
4 हयाकरता त्यासनासंगे बोल, त्यासले सांग की परमेश्वर सांगस, इस्त्राएल
घराणामासला जो कोनी आपला मनमां मुर्ती वागाडसं, आपलं पापजनक अडखळण
आपली नजरसमोर ठेवसं अनी संदेष्टयासकडे येस त्यासले मना उत्तर त्याना मुर्तीना
संख्याना मानतीन भेटी.
5 मी इस्त्राएल घरानाना मन वर परत कब्जा कराकरता असं करसु, कारण त्यासनी
आपली मुर्तीसकरता माले सोडी देयल शे.
6 तरीबी इस्त्राएल घराणाले सांग, प्रभु परमेश्वर सांगस, मांगे फिरा, आपल्या
मुरत्यासपाईन फिरा अनी आपला बठा अमंगळ कर्मसपाईन तोंड फिरावा.
7 इस्त्राएलना घराणामासला अनी इस्त्राएलमां वस्ती करीसनं उपरीमासला जो
कोनी मनापाईन येगळा व्हयीसनं आपला हृदयमां मुर्ती वागाडसं, आपली पापनी
ठोकर आपली नजरनीसमोर ठेवसं अनी माले प्रश्न ईचाराकरता संदेष्टयासकडे येस;
त्याले मी सोता योग्य वाटी ते उत्तर दिसू;
8 मी त्यानापाईन तोंड फिराई लिसु; मी त्याले एक उदाहरण बनाडसु, मी
त्याले आपली प्रजानी मंडळीमातीन काढी टाकसु, अनी तुमले समजी कि मीच
प्रभु परमेश्वर शे.
9 “जर एखादा संदेष्टा धोकामां पडीसनं संदेश देत व्हयी तर समजानं की मी
त्याले धोकामां पाडेल शे, मी मना हात त्यानावर उगारसू अनी मना लोक ज्या
इस्त्राएल त्यासमाईन त्यासना नाश करसू.
10 प्रश्न करनारासना जशे दोष तशेच त्या संदेष्टासना दोष; त्या दोनी आपला
दोषना फळ भोगतीन;
11 मनजे इस्त्राएल घराण मनापाईन बहकीसनं जावावून नही अनी आपला सर्व
पातकसघाई सोताले ईटाळवू नही; तर त्या मना लोके व्हतीन अनी मी त्यासना देव
व्हसू;” आशे परमेश्वर म्हणसं.

## नोहा, दानिएल अनी याकोब

12 तवय परमेश्वरनं वचन माले प्राप्त व्हयनं की,
13 “मानवपुत्रा,” “एखादा देशनी ईस्वासघात करीसनं मनाईरोधमां पाप करं
व्हयीते मी त्यानावर आपला हात चालाडसू, त्याना अन्नना आधार तोडसू; देशमां
दुष्काळ पाडसू; अनी त्यामाईन माणुस अनी पशुसना नाश करसू.
14 तवय त्यामां नोहा, दानीएल अनी ईयोब हया तिन्ही राहीनात तरी बस व्हयनं;
त्या आपला धार्मिकतामुये आपला तेवढा जीव वाचाडतीन अश परमेश्वर सांगस.
15 “मी देशमां हिंस्र पशू धाडीसनं तो उद्‌ध्वंस्त करं अनी त्या पशुमुये कोणी
त्यामाईन येत जात नही एवढा तो निर्जन करी टाक.
16 तर प्रभु परमेश्वर सांगस, मनी जीवनी शपथ, त्यामां त्या तिन्ही राहीनात तरी
त्यासले पोर्‍यासना अनी पोरीसना बचाव करता येवावू नही; त्यासना मात्र निभाव
लागी, पण बठा देश नष्ट व्हयी.
17 “मी देशवर तलवार आणीसनं सांग की, अरे तलवार देशवार फिर, अनी
तिनी मनुष्यले अनी पशुसना नाश करी टाक.
18 तर प्रभु परमेश्वर सांगस, मनी जीवनी शपथ, त्यामां त्या तिन्ही राहीनात तरी
त्यासले पोर्‍यासना अनी पोरीसना बचाव करता येवावू नही; त्यासना मात्र निभाव
लागी,
19 “मी त्या देशवर महामारी धाडी अनी त्यामाईन लोके अनी पशू यासना नाश
कराकरता रंगतना रूपमां मना संतापना वर्षाव करी टाक.
20 तर प्रभु परमेश्वर सांगस, त्यामां नोहा, दानीएल अनी ईयोब हया राहीनात
तरी त्यासले पोर्‍यासना अनी पोरीसना बचाव करता येवावू नही; त्या आपला
धार्मिकतामुये फार तर आपला जीव वाचाडतीन.”
21 ✡ मंग मी तलवार, दुष्काळ, हिंस्र पशू अनी मरी हया मना चारी उग्र शासन
यरूशेलममासला मनुष्य अनी पशू हयासना नाश कराकरता त्यासवर धाडसू; तवय
त्यासना निभाव कशे लागी, आशे प्रभू परमेश्वर सांगस.
22 तरी दख, त्यानामां अवशेष राहातीन; त्या अवशिष्ट पोर्‍यासले अनी पोरीसले
बाहेर आणतीन, दख, त्या तुनाकडे येतीन, तुमी त्यासना मार्ग अनी त्यासना
कर्म दखशात; तवय मी यरूशेलमवर आणेल अनर्थ, त्यासवर आणेल बठा प्रसंग
यानाबारामां तुमी सांत्वन पावशात.

✡ **14:21 14:21** प्रकटीकरण 6:8

23 तुमी त्यासना मार्ग अनी त्यासना कर्म दखशात तवय त्यामुये तुमनं सांत्वन
व्हयी, अनी मी जे त्यासनं बठ काही करेल शे त्यामासलं काहीबी विनाकारण करेल
नही शे हाई तुमले समजी, आशे प्रभु परमेश्वर सांगस.

# 15

## द्राक्षवेलनं उदाहरण

1 परमेश्वरनं वचन माले प्राप्त व्हयनं की,
2 “मानवपुत्र, जंगलमासला कोणता बी झाडनी फांदीनी काठीपेक्षा द्राक्षना वेलनी
काठी कशी चांगली शे?
3 तिनं लाकूड कोणी कामले लावसं का? भांडा टांगी ठेवाले त्यान्या खुटया
बनाडतसं का?
4 दख, तीं आगमां सरपन म्हनीसनं टाकतसं, आगघाई तिना दोन्ही टोके जाळी
टाकात अनी मधला भाग भस्म व्हयनाते ते कोणता काममां पडी?
5 दख ती शाबूत राहास तवय ती कोणताच कामले उपयोगमां पडसं नही, तर
मंग आगघाई जाळीसनं तिना कोळसा व्हवावर तो कोणता कामामा पडी?”
6 हयाकरता प्रभु परमेश्वर सांगस, वनवृक्षमासला द्राक्ष येलना आगमां सरपन
म्हनीसनं टाकतसं त्यापरमानं यरूशेलमना निवासीसले आगमां टाकसू.
7 मी त्यासकडे तोंड फिरायी लिसू; त्या आगमाईन बाहेर पडनात तरी आग
त्यासले खायी टाकी; मी त्यासकडे तोंड फिरायी लिसू; तवय तुमले समजी की मी
परमेश्वर शे.
8 त्यासनी ईस्वासघात करेल शे म्हनीसनं मी देश विराण करसू आशे प्रभू परमेश्वर
सांगस.

# 16

## यरूशलेम नगरना व्यभिचार

1 परत माले परमेश्वरनं वचन प्राप्त व्हयनं की,
2 “मानवपुत्रा,” “यरूशेलमनं अमंगळ कृत्य त्यासना ध्यानमां अनी देय.
3 आशे सांग, प्रभु परमेश्वर यरूशलेमले सांगस,
“तुना जन्म अनी उत्पती हया कनान देशमासला शेतस; तुना बाप अम्मोरी अनी
तुनी माय हित्तीण व्हती.

4 तुना जन्मनाबारामां सांग तर तुना जन्म व्हयनं तवय तुनं नाळ कापी नही, तुले
पाणीघाई धईसनं स्वच्छ करं नही, तुनं आंगले मीठ लावं नही अनी तुले बाळंतनमां
गुंडाळं नही.
5 तुनी करूणा यिसनं यामासलं कोणतबी काम करानं आशी तुनावर कोणीच
दयादृष्टी व्हयनी नही; तर तुनं जन्म व्हयनं तवय तुले अमंगळ समजीसनं वावरमां
टाकी देयेल व्हतं.

6 "मी तुना जवयतीन जायी राहींनतू तवय तुले तुना रंगतमां लोळतांना दख,
तवय मी तुले बोलनू; तु आपला रंगतमां लोळी राहीना शे तरी बी जीवत राहाय;
आशेच मी तुले बोलनू.
7 वावरमासलं बीज वाढीसनं शंभर पट व्हसं तशी मी तुनी वृध्दी करी; तु वाढीसनं
उची व्हयनी, तु भलती सुंदर व्हयनी, तुले ऊर फुटनं, तुना केस वाढनात तरी तु
उघडीनागडी व्हती.
8 "मी तुना जवयतीन जायी राहींनतू तवय मी तुले दखनू, तवय ती येळ तुनी
प्रेमविकासनी व्हती; तवय मी तुनावर पदर टाकीसनं तुनी नग्नता झाकी; प्रभु
परमेश्वर सांगस, तवय मी शपथ लिसनं तुनासंगे करार करं तु मनी व्हयनी.

9 "मी तुनी पानीघाई आंघोळ करी, तुनावरना रंगत धयी काढ अनी तेलमां तुले
मळी टाक.
10 तुले वेलबुट्टीना कपडा घालात, चांगला चामडानं चपला घालात, तुना
डोकाले उत्तम तागना कपडाघाई गुंडाळं, अनी तुले रेशमी ओढणी पांघरी.
11 मी तुले दागिनासघाई सजाडं, तुना हातमा बांगडया घाल्यात अनी गळामां
हार घालात.
12 मी तुना नाकमां नथ घाली, कानमां बाळया घाल्यात, तुना डोकाले उत्तम
शिरोभुषण घालात.
13 तु सोनारूप्यासघाई नटली; तुना पेहराव उत्तम ताग रेशीम अनी जरतारी यासना
व्हता; तुले जेवनले सपीठ, मध अनी तेल हया राहेत; तु अती सुंदर व्हती अनी
राजवैभवले पोहंची जायेल व्हती.
14 तुनी सुंदरतामुये तुनी किर्ती राष्ट्रमां पसरनी; कारण मी तुले देयल तेजघाई
तुनी सुंदरता अप्रतिम व्हयनी; आशे प्रभू परमेश्वर सांगस.

15 "तु तुना सौंदर्यावर भरवसा ठेयीसनं आपली किर्तीना जोरवर शिंदळकी
करी, येवा जावाबरोबर शिंदळकीना सपाटा तु चालाडं; तुना सौंदर्य त्यासले लुटाले
सापडनं.

16 तु आपला कपडा लिसनं रंगबेरंगी उच्च स्थान तुनाकरता सजाडं अनी कधी
व्हयनं नही आशी शिंदळकी त्यासवर करी.
17 मी देयल सोनरूपासनं शोभवंत दागिना लिसनं तु त्यासन्या पुरूषमुरत्या कर्‍यात
अनी त्यानासंगे शिंदळकी करी.
18 तु आपली वेलबुट्टीना कपडा लिसनं त्यास घालात, मी देयेल तेलना अनी
धुपना तु त्याले नैवेदय दखाडं.
19 मी भाकर, सपीठ, तेल अनी मध हाई तुले देयेत अनी तुले खावाडेत; ती बी
तु त्यानामोरे सुगंध म्हनीसनं अर्पण करे; हाई आशे घडसं आशे प्रभू परमेश्वर सांगस.
20 "आजुन तुले मनापाईन पोर्‍या अनी पोरी व्हयन्यात, ती तु लिसनं त्यासले
खाई टाकाकरता बळी म्हनीसनं अर्पण करं; हया तुन्या शिंदळक्या तुले पुरेशा
व्हयन्यात नही.
21 म्हनीसनं मना पोर्‍यासले मारीसनं त्यासन्या मुरतीसकरता आगमां होम करं
का?
22 हया बठया अमंगळ कृत्य अनी शिंदळक्या करतांना तु दाखलपणमां
उघडीनागडी व्हती तवय तु आपला रंगतमां लोळी राहींनती यानी तुले कधीच
आठवण व्हनी नही."

### यरूशलेमनं जीवन वेशानामायक

23 तु हाई दुष्कर्म करावर प्रभु परमेश्वर सांगस, तुले धिक्कार असो! तुले
धिक्कार असो! आशे व्हयनं की,
24 तु तुनाकरता कमानदार घर बांधी टाकं, रस्ता रस्तासमां तु आपलाकरता उच्च
स्थान बनाडात.
25 तु रस्तासना नाका नाकासवर आपला उच्च स्थान बनाडी टाकात; आपली
सुंदरता भ्रष्ट करी, वनात - गयात सर्वासनामोरे आपला पाय पसारीसनं मनसोक्त
व्यभिचार करं;
26 मोठा आंगना तुना शेजारना मिसरी लोके यासनासंगे तु व्यभिचार करं; माले
चिडावाकरता तुनी मनसोक्त शिंदळकी करी.
27 "तर मंग दख, मी तुनावर हात उगारीसनं तुनं कायमनं अन्न कमी करं अनी
ज्यासले तुनी शिंदळकी लज्जास्पद वाटसं त्या तुना व्देष करनारा पलिष्टीसन्या
पोरीसना हातमां तुले देतीन.
28 "तुनी तृप्ती म्हनीसनं कवयच व्हसं नही, त्या करता तु अश्शुर्‍यासनीसंगेबी
व्यभिचार करं; हा, त्यासनासंगे तुनी व्यभिचार करं तरी तुनी तृप्ती व्हयनी नही.

29 व्यापाऱ्यासना मनजे खास्दयासना देश तठेपावोत तुनी मनसोक्त शिंदळकी
चालाडी तरीबी त्यानाघाई तुनी तृप्ती व्हसं नही.''
30 प्रभु परमेश्वर सांगस, ''तु निर्लज्ज वेश्याना कामनामायक हाई बठ करं; तुनं
मन कितलं दुर्बल शे!
31 नाका नाकासवर तुनी आपलाकरता कमानदार घरं बांधातं; अनी रस्ता-
रस्तासवर तुनी उच्च स्थान बनाडात; पन तुनी व्यभिचारना वेतननी पर्वा करी नही;
आठे तुनी वेशानी रीत सोडी.
32 तु तर नवराले सोडीसनं दुसरा माणुसनीसंगे सहवास करनारानीमायक शे.
33 लोके वेशाले पैसा देतसं पन तु उलट आपला बठा प्रेमीसले पैसा देसं! त्यासनी
चारीमेरतीन यिसनं तुनासंगे व्यभिचार कराले पाहीजे म्हनीसनं तु त्यासले लालूस
दखाडसं.
34 तुनी व्यभिचारनी रीत दुसऱ्या बायासनी उलट शे, एखादा व्यभिचारी माणसु
तुनामांगे येस नही, तुले कोणी पैसा देस नही, तर तु उलट त्यासले पैसा देस; हाई
तुनं वागनं येगळं शे.''

## यरूशलेमवर देवना न्याय

35 त्याकरता आये वेश्या, परमेश्वरनं वचन आयकं,
36 प्रभु परमेश्वर सांगस, तु आपला पैसा उडाई टाकं, आपला प्रेमीसनीसंगे
व्यभिचार करीसनं आपली लाज दखाडी; तु आपली मुर्तीनासंगे अमंगळ कृत्य
करात अनी आपला पोऱ्यासना रंगत त्यासले अर्पण करं.
37 त्याकरता हाई दख, ज्यासले तु खुश करं, प्रेमपात्र अनी व्देषपात्र आशे ज्या
तुना बठा प्रेमी, त्यासले मी चारीमेरतीन तुना ईरोधमां जमा करसूं; त्यासनामोरे तुनी
लाज उघडी करसू मनजे त्या तुनी बठी लाज दखतीन.
38 व्यभीचारणी अनी रक्तपात करनाऱ्या बाया यासनं न्याय करतसं तशे मी तुनं
न्याय करसू अनी ईर्ष्यातीन अनी क्रोधतीन मी तुनं रक्तपात करसूं.
39 मी तुले त्यासना हातमां दिसु, मनजे त्या तुना कमानदार घरं नष्ट करतीन,
तुना उच्च स्थान पाडी टाकतीन, तुना कपडा हिसकाईसनं अनी तुना दाग दागिना
काढीसनं तुले उघडी बिनकपडासना करतीन.
40 त्या तुना ईरोधमां मंडयीले जमा करीसनं तुले दगडमार करतीन अनी आपल्या
तलवारीसघाई तुले भोसकतीन.

41 त्या तुना घरं आगघाई जायी टाकतीन अनी बऱ्याच बायासनीदेखत तुले शिक्षा करतीन; हाई परकारतीन तुनी शिंदळकी बंद करतीन, अनी यानामोरे तु कोणले पैसा देवावू नही.
42 तवय तुनावरना मना संताप शांत करसु, तुनाईषयी मनी ईर्ष्या कमी व्हयी, मी शांत व्हसु, परत संताप करावू नही.
43 तु आपला तरूणपणना दिनना आठवण ठेवसी, हाई बठ करीसनं तुनी माले चिडावं, म्हनीसनं दख, प्रभु परमेश्वर सांगस, तुनं अनाचारनं प्रतिफळ मी तुनं माथी लावसु; मनजे तुन्या दुसऱ्या बठया अमंगळ कृत्यासमा आजुन पापना भर तु टाकावू नही,

## जशी माय तशी पोर

44 दख, म्हण सांगणारा बठा तुनाबारामां सांगतीन जशी माय तशी पोर,
45 आपला नवरानी अनी पोऱ्यासना धिक्कार करनारी तुनी माय तिनी तु पोर; आपला नवरानी अनी पोऱ्यासना धिक्कार करनाऱ्या तुन्या बहीणी त्यासनी तु बहीण; तुनी माय व्हती हित्तीण अनी बाप व्हता अमोरी.
46 "तुनी डावी बाजुले तुन्या पोरीसनीसंगे राहानारी शोमरोन ती तुनी मोठी बहीण अनी तुनी उजवी बाजुले आपल्या पोरीसनीसंगे राहानारी सदोम हाई तुनी धाकली बहीण.
47 तु त्यासना मार्गतीन अनी त्यासना अमंगळ कृत्यासपरमानं थोडी चालनी आशे नही, तर तु आपला बठा आचरण त्यानापेक्षा भ्रष्ट करं.
48 "प्रभु परमेश्वर सांगस, मनी जीवनी शपथ, तु अनी तुन्या पोरीसनी जशे वर्तन करं तशे तुनी बहीण सदोम हिनी अनी तीन्या पोरीसनी करं नही.
49 दख, तुनी पोर सदोम हिनं पाप यापरमानं व्हतं; गर्व, अन्ननी विपुलता अनी आयीष आराम हाई तिले अनी तिन्या पोरीसले व्हती; दरीद्री अनी गरजवंतसले यासले तिनी हात दिद् नही.
50 त्यासनी अहंकारी व्हयीसनं मनासमोर अमंगळ कृत्य करात, ती दखीसनं त्यासले हाकली दिद्.
51 "शोमरोनीने तर तुनापेक्षा आरधा पापबी करात नही; तु आपला अमंगळ कृत्य त्यानापेक्षा जास्त करात, तु करेल अमंगळ कृत्यासना मानतीन तुन्या बहीणी निर्दोष ठरन्यात.

52 तु आपल्या बहीणीसले आपलापेक्षा निर्दोष ठरावं यानी तुले लाज वाटो; तु
त्यानापेक्षा घोर पाप करामुये तुना मानतीन त्यासले निर्दोष समजाले पाहिजे; तुन्या
बहीणी जास्त नीतीमान शेतस हाई तुनी दखाडं, म्हनीसनं तु लज्जीत अनी फजीत
होवो."

## सदोम अनी शमरोननी परत स्थापना

53 मी सदोम अनी तिन्या पोरीसना, अनी शोमरोन अनी तिन्या पोरीसना, अनी
त्यासनामां तुना धरी लयी जायेल लोकेसलेबी लयी यिसू.
54 मनजे तुले लाजना काळींबा लागी, ज्या तुना बठया कृत्यासघाई त्यासना
मनले समाधान प्राप्त व्हयनं त्यासनाबारामां तु लज्जित व्हशी.
55 तुन्या बहीणी, सदोम अनी तिन्या पोरी परत आपली पहीली दशामां येतीन.
शोमरोन अनी तिन्या पोरी परत आपली दशामां येतीन; तु अनी तुन्या पोरी परत
आपली पहीली दशामां येतीन.
56 तु तुना तोरामां व्हती तवय; तुनी बहीण सदोम हिनं नावसुध्दा तुनं तोंडमां नही
व्हतं.
57 अरामी बाया अनी तिना आसपासना बठा अनी तुले तुच्छ माननऱ्या पलिष्टी
बाया यासनी तुनी अप्रतिष्ठा करी, त्या येळले तुनी दुष्टता प्रकट व्हयनी, तशी
आजपावोत प्रकट व्हयनी नही.
58 तु तुना दुष्कर्मना अनी अमंगळ कृत्यासना फळ भोगी राहीनी शे, आशे
परमेश्वर सांगस.

## एक करार कायम राही

59 प्रभु परमेश्वर सांगस, "तु सोता वाहेल शपथले तुच्छ मानीसनं आपला करार
मोडं; तु जशे करं तशे मी तुनं करसू.
60 तरी मी तुना तरूणपणमां तुनासंगे करेल करारनी आठवन करीसनं तुनासंगे
सर्वकायनं करार करसू.
61 तु तुन्या मोठल्या बहीणी अनी धाकल्या बहीणी यासले आपलं करशी
तवय तु तुन्या आचरणनं आठवन करीसनं लज्जित व्हशी. अनी त्या तुनी करेल
करारमासल्या नही व्हतीन तरीबी त्या पोरी म्हनीसनं दिसू.
62 मी तुनासंगे मना करार स्थापन करसू तवय तुले समजी की मी परमेश्वर शे.
63 तु जे बठ करं त्यानी मी क्षमा करसू, मनजे तुला त्यानी आठवण व्हयीसनं तु
लज्जित व्हशी अनी अप्रतिष्ठामुये तु परत आपलं तोंड उघडावू नही," आशे प्रभु
परमेश्वर सांगस.

# 17

## गरूड अनी द्राक्षवेलनं दृष्टांत

1 परमेश्वरनं वचन माले प्राप्त व्हयनं की,
2 "मानवपुत्रा," इस्राएल घराणाले कोडे घाल; हाई दृष्टांत कथन कर;
3 त्यासले आशे सांग, प्रभु परमेश्वर सांगस, मोठला पखसना, लांब पिसारासना अनी चित्रविचित्र पिसासना आशे एक मोठ गरूड लबानोन पर्वतवर ऊना; त्यानी गंधसरूनी शेंडाकडली एक फांदी तोडी लिदी.
4 त्यानी त्यामासली अगदी वरनी फांदी तोडीसनं व्यापाऱ्यासना देशमां लयी गया अनी सौदा करनारासना एक शहरमां लायी दिदी.
5 त्यानी देशमासला बाकीना बीवारा लिसनं ती पिकावू जमीनमां पैयरी, वाळुज लावतसं तशे ते बराच पानीनाजोडे लावं.
6 ते वाढीसनं त्यानी आखूड पन पसरेल अशी द्राक्षलता व्हयनी; तिन्या फांदया गरूडकडे झुकेल राहीसनं तिना मुळा त्यानाखाल जायेल व्हतात; ती वाढीसनं मोठा द्राक्ष व्हयनात; तिले फाटा फुटनात अनी पाला ऊना.
7 दुसरा एक मोठा गरूड व्हता, त्याले बराच पिसे व्हतात अनी मोठला पखं व्हतात; दख, त्यानी लायेल वाफासमां आपलाले पानी मिळाले पाहिजे म्हनीसनं त्या द्राक्षीनी आपला मुळा त्यानाकडे वाकाडात अनी आपला फाटा त्यानाकडे झुकाडात.
8 त्या रोपसले फाटा फुटीसनं त्याला फळ यावाले पाहिजे अनी भव्य द्राक्षी यावले पाहिजे म्हनीसनं तो एक सुपीक मळामां बराच पानीजोडे लायेल व्हतं.
9 "प्रभु परमेश्वर सांगस, सांग बरं, ती जीव धरी का? ती सुकी जावाले पाहिजे म्हनीसनं तिले मुळनासंगे उपाडीसनं तिना फय तोडी टाकावूत नही का? तिना बठा पाला सुकाई जातीन; तिना मुळा उपडाले जास्त ताकदनी नाहिते बराच लोके लागावूत नही.
10 दख, तिनी लावणी व्हयनी तरी जीव धरी का? पुर्वकडला वारा तिले लागना मनजे ती सुकावू नही का? ती ज्या वाफामां वाढनी तठेच ती मरी जाई."

## दृष्टांतना अर्थ

11 परत परमेश्वरनं वचन माले प्राप्त व्हयनं की

12 “या बंडखोर घराणाले सांग, या गोष्टी काय शेतस हाई तुमले समजत नही
का? त्यासले सांग की दखा, बाबेलना राजानी यरूशेलममां यिसनं तिना राजा अनी
तिना सरदार यासले धरं अनी आपलाकडे बाबेल आठे आणं;
13 तवय त्यानी राजवंशमासला एक माणसुले निवाडीसनं त्यानासंगे करार करं
अनी त्यानाकडतीन प्रतिज्ञा करी लिदी; त्या राष्ट्र नीच व्हावाले पाहिजे; त्यानी
आपल डोकं वर करानं नही; जर त्यानां करार त्यानी पाय तर ते कायम राहावाले
पाहिजे, म्हनीसनं त्यानी बठा कर्ता माणससले बी लयी गया.
14 हयानाकरता की त्या राष्ट्र नीच राहावाले पाहीजे, त्यानी आपलं डोकं वर
कराले नही पाहीजे, पन त्याना करार पाळावर ते कायम राहावाले पाहीजे.
15 ✡पण त्यानी त्यासनाईरोधमां फितुरी करीसनं मिसर देशनी आपलाले घोडे
अनी बराच लोके दयावाले पाहिजे म्हनीसनं त्यानाकडे आपला जासुद धाडात.
त्याले यश भेटी का? ज्यानी आशा गोष्टि कर्‍यात तो निभावेल का? त्यानी करार
मोडेल शे तरी बी तो निभावले का?
16 “प्रभू परमेश्वर सांगस, मनी जीवनी शपथ, ज्यानी त्याले राजा करं,
ज्यानासंगे करेल आणभाक त्यानी तुच्छ मानी, ज्यानं करार त्यानी मोडं, त्या राजानं
निवासस्थानमां, बाबेलमां तो मरी.
17 जवय बराच जणसना फडशा उडावाकरता शत्रु मोरचे लावतीन अनी बुरूज
बांधतीन तवय युध्दना येळले फारोना मोठा सैनिक अनी बराच लोके संगे लिसन
त्यानी कुमक करता येवावू नही.
18 त्यानी शपथ तुच्छ मानीसनं करार मोडं; दख, त्यानी हातवर हात मारं तरी
त्यानी हाई बठ करं; तो निभावनार नही.”
19 त्याकरता परमेश्वर सांगस, “मनी जीवनी शपथ, त्यानी मनी प्रतिज्ञा तुच्छ
मानी; त्यानी मना करार मोडं यानं प्रतिफळ मी त्याना डोकावर टाकसू.
20 मी मना जाळं त्यानावर टाकसू; तो मना फासामां सापडी; मी त्याले बाबेलमां
लयी जासू; त्यानी मनासंगे करेल ईस्वासघातबारामां तठे मी त्यानी झडती लिसू.
21 त्याना बठा सैन्यमासला पयनारा त्या बठा तलवारघाई पडतीन; ज्या उरतीन
त्यासनी चारीमेर दाणादाण व्हयी; तवय तुमले समजी की मी परमेश्वर हाई बोलनू
शे.”

## परमेश्वरनी प्रतिज्ञा

22 प्रभु परमेश्वर सांगस,

✡ **17:15 17:15** २ राजे 14:15-20; २ इतिहास 26:10-13

मी उची गंधसरूना शेंडावरनी एक फांदी तोडीसनं ती लावसू,
त्यानी वरनी कोवळी फांदीमासली एक लिसनं
ती एक मोठा उचा पर्वतवर लावसू.
23 मी इस्राएलना उचा पर्वतवर ती लावसू;
तिले फाटा फुटतीन, फळे येतीन,
तिना उत्तम गंधसरू व्हयी;
मनजे मंग त्यानाखाल बठया चिडासनी जाती राहातीन,
त्याना फाटासना सावलीमां त्या राहातीन.
24 जंगलमासला बठा झाडसले कयी की
मी परमेश्वर
उचा झाडसले नीच करेल शे
अनी नीचासले उचा करेल शे,
हिरवा झाडसले सुकाडेल शे
अनी सुकेल झाडसले फलदूप करेल शे;
मी परमेश्वर हाई बोलनू शे अनी मी हाई करेल बी शे.

# 18

## वैयक्तीक जबाबदारी

1 परमेश्वरनं वचन माले प्राप्त व्हयनं की
2 ✡बापनी आंबट द्राक्ष खादात
अनी पोऱ्यासना दात आंबनात, हाई म्हण तुमी इस्राएल देशमां वापरतसं ती का?
3 “प्रभु परमेश्वर सांगस, मनी जीवनी शपथ,” हाई म्हण इस्राएलमां यानामोरे
तुमी वापरानं नही.
4 दख, बठा जीव मना शेतस, बापना जीव तशे पोऱ्यानं जीव मना शे, जो जीव
आत्मा पाप करसं तो मरी.
5 धार्मिक माणसे कोणले म्हणशात जो न्यायतीन अनी धर्मतीन वागस,
6 डोंगरवर जेवण करतसं नही, इस्राएल घराणासना मुर्तीसकडे डोया लावतसं
नही, आपली शेजारनी बाईले भ्रष्ट करसं नही, पाळी येयल बाईन्नाजोडे जात नही.

✡ **18:2 18:2** यिर्मया 31:29

7 कोणवर जुलूम करस नही, कर्जदारनं गहाण त्याले परत करसं, कोणले लूटसं
नही, ज्या भुक्या शेतस त्यासले जेवण देस अनी ज्या उघडा शेतस त्यासले कपडा
देतसं,
8 वाढीदिढी करसं नही, व्याज लेस नही, वाईटपाईन आपला हात आवरसं,
माणुस माणुसमां सत्य निर्णय करसं.
9 ✡मना नियमपरमानं चालसं, अनी मना निर्णय पाळीसनं सत्यतीन वागसं; तोच
धार्मिक शे; तो नक्की वाची, आशे प्रभू परमेश्वर सांगस.
10 "तरी बी त्याले बलत्कारी अनी खुनशी पोऱ्या व्हयना. अनी बापनी
हयापैकी कोणतच काम कर नही जर पोऱ्यानी त्यामासलं एकबी काम करं.
11 त्यानी डोंगरवर जेवण करं, आपली शेजारनी बाईले भ्रष्ट करं,
12 लाचार अनी दुबळा यासवर जुलूम करं, एखादाले लुटं, कर्जदारनं गहाण
त्याले परत करं नही, मुर्तीकडे दख, अमंगळ कृत्य करं,
13 वाढीदिढी करी, व्याज लिद्, मंग आशे माणूस वाची का? तो वाचावू नही;
त्यानी हाई बठा अमंगळ कृत्ये करेल शेतस; तो नक्की मरी, त्यानी करेल रक्तपात
त्यानावरच उलटी.
14 परत दख, त्याले आशे पोऱ्या व्हयना की बाप जे पाप करसं ती तो दखसं,
तरी ते दखीसनं तो सोता तशे करसं नही,
15 तो डोंगरवर जेवण करसं नही, इस्राएल घराणानी मुर्तीकडे दखसं नही,
आपली शेजारनी बाईले भ्रष्ट करसं नही,
16 कोणवर जुलूम करसं नही, कर्जदारनं गहाण आडावसं नही, कोणले लुटसं
नही, ज्या भुक्या शेतस त्यासले अन्न देस अनी ज्या उघडा शेतस त्यासले घालाले
कपडा देस,
17 गरीबसले हानी करापाईन आपला हात आवरी धरसं, वाडीदिढी करसं नही,
व्याज लेस नही, मना निर्णय पायस, मना नियमपरमानं चालसं, तो आपला बापना
पापमुये मरावू नही, तो नक्की वाची.
18 त्याना बापनी बारामां सांगशात ते त्यानी जुलूम करं, आपला भाऊले लुटं
अनी आपला लोकेसवर अत्याचार करं, त्यामुये दख, तो आपला अधर्मतीन मरी.
19 "तरी तुमी म्हणतसं, बापना पापना भार पोऱ्यानी का बर वाहावानं नही?
हाई दख, पोऱ्या न्यायतीन अनी धर्मतीन वागना, त्यानी मना बठा नियम पाळीसनं
त्यापरमानं वर्तन करं तर तो नक्की वाची.

✡ **18:9 18:9** लेवीय 18:15

20 ✡जो जीवआत्मा पाप करी तोच मरी, पोऱ्या बापना पापना भार वाहावू
नही, अनी आपला बाप आपला पोऱ्याना पापना भार वाहावू नही, धार्मिकले त्याना
धार्मिकतीन फळ भेटी; दुष्टले त्याना दुष्टतीन फळ भेटी,

21 "तरीबी दुष्ट त्यानी करेल बठा पापसपाईन फिरीसनं मना बठा नियम पाळी
अनी तो नीतीतीन अनी धर्मतीन वागना तर तो नक्की वाची, मरावू नही.
22 त्यानी करेल कोणतच पाप त्याना हिशोबमां धरता येवावू नही, त्यानी करेल
धार्मिकतीन तो वाची,
23 प्रभु परमेश्वर सांगस, दुष्ट मरावर माले आनंद व्हसं का? त्यानी आपला मार्ग
सोडीसनं वाचाले पाहीजे यावरतीन माले आनंद व्हसं ना?

24 "तरी बी धार्मिक आपली धार्मिकता सोडीसनं दुष्कर्म कराले लागना अनी
अधार्मिकना बठा अमंगळ आचरणपरमानं वागाले लागना, तर तो वाची का? त्यानी
करेल बठी धार्मिकता हिशोबमां धरता येवावू नही, त्यानी करेल भ्रष्टाचार अनी त्यानी
करेल पाप यामुये तो मरी.

25 "तरी तुमी सांगतसं, प्रभुना मार्ग न्यायी नही, हे इस्त्राएल घराणा, आयकी
लेय, मना मार्ग न्यायी नही का? तुमनाच मार्ग न्यायी नही शेतस, आशे नही का?
26 एखादा धार्मिक आपली धार्मिकता सोडीसनं दुष्कर्म करसं अनी त्यानामुये
मरसं तर तो आपला करेल दुष्कर्मतीन मरसं.

27 दुर्जन त्यानी करेल आपला दुष्टाईपाईन दूर व्हयीसनं नीतीतीन अनी
धार्मिकतीन वागी तर तो आपला जीव वाचाडी.
28 तो आपला करेल बठा पाप ध्यानमां आणीसनं वळी तर तो नक्की वाची,
मरावू नही.
29 तरीबी इस्त्राएल घराणं म्हणसं, देवना मार्ग न्यायी नही, हे इस्त्राएल घराणा,
मना मार्ग न्यायी नहीत का? तुमनाच मार्ग न्यायी नहीत, हाई नही का?

30 "प्रभु परमेश्वर सांगस, हे इस्त्राएल घराणा, मी तुमना परतेकना ज्याना त्याना
मार्गपरमानं न्याय करसू, तुमी फिरा, आपला बठा पापपाईन मांगे फिरा, मनजे तुमना
अधर्म तुमले अडथळा व्हावाऊ नही.
31 तुमी आचरण करेल बठा दुराचार टाकी दया; तुमनामां नवीन हृदय अनी
नवीन आत्मा स्थापन करा; हे इस्त्राएल घराणा तुमीन का बरं मरतस?

✡ **18:20 18:20** अनुवाद 24:16

32 कारण प्रभु परमेश्वर सांगस, मरनारासना मृत्युमुये माले आनंद व्हस नही; तर
मांगे फिरा अनी जीवत राहा.”

# 19

## विलापगीत

1 आते तु इस्राएलसना सरदारसकरता विलाप कर,
2 तु आशे सांग, तुनी माय कोण? ती सिंहीण व्हती,
ती सिंहसमां राहात व्हती, ती तरूण सिंहसमां आपला बच्चासना देखभाल करं;
3 तिनी आपला बच्चासपैकी एकले वाढावं, ते वाढीसनं तरूण सिंह व्हयना अनी
शिकार कराले शिकना,
तो माणुसले खावाले लागना.
4 राष्ट्रसनी त्यानाबारामां आयकं;
त्यासनी करेल खड्डामां तो आडकी गया;
त्यासनी त्याले वेसण घालीसनं लयी गयात.
5 आपली आशा भग्न व्हयीसनं नष्ट व्हयनी हाई तिनी दख
तवय तिनी आपला दुसरा एक बच्चा लिसनं त्याले वाढावं
अनी त्याले तरूण्यावस्थामां आणं.
6 तो सिंहसमां हिराफिराले लागना. तरूण सिंह व्हयना
अनी शिकार कराले सिकना,
तो माणसेसले भक्ष कराले लागना.
7 त्यानी त्यासना वाडा उद्‌ध्वस्त करात अनी त्यासना नगर उजाड करात;
त्यानी गर्जनाना शब्दघाई देश
अनी त्यामासला सर्वा काही ओसाड व्हयी गये.
8 आजुबाजूना येगयेगळा प्रांतमासला राष्ट्र त्यानावर उठनात;
त्यासनी त्यानावर आपला जाळा टाकात;
त्यासनी करेल खड्डामां तो आडकी गया.
9 त्यासनी त्याले वेसण घालीसनं पिंजरामां कोंड
अनी बाबेलना राजाकडे लयी गयात.
इस्राएलना डोंगरवर
त्याना शब्द परत आयकाले येवाले नको
म्हनीसनं त्याले दरीमां टाकी दिदी.
10 तुनी माय तुनी आबादानीमां पानीनाजोडे लायेल द्राक्षीनामायक व्हती;

पानीना विपुलतामुये ती सफळ व्हयीसनं तिले बराच फाटा फुटनात.
11 अधिपतीसना राजवेत्रे तयार व्हतीन
आशे मजबूत फाटा वनात;
त्या उचा वाढीसनं ढगना वर गयात
अनी बराच फाटासहीत ती उंचीमां मोठया दखाई राहींनत्यात.
12 तवय तिनावर संताप व्हयीसनं
तिले उपाडीसनं जमीनवर पाडामां ऊनं;
पुर्वकडला वारा वाहीसनं तिना फळ करपनात,
तिना मजबुत फाटा मोडीसनं सुकाई गयात;
आगधाई त्या खाक व्हयी गयात.
13 आते तिले जंगलमां रूक्ष
अनी निर्जल जागवर लायेल शे.
14 तिना शाखासना फाटासमाईन आग निघीसनं
त्यानी तिना फये खाई टाकेल शेतस;
आते अधिकार चालाडनारासना राजदंड व्हयी
आशे एकबी मजबूत फाटा राहीनात नही;
हाई विलापगीत शे अनी विलापकरता राही.

# 20

### परमेश्वरनी इच्छा अनी माणुसनी अवज्ञा

1 सातवा वरीसना पाचवा महीनाना दशमीले आशे व्हयनं की इस्राएलना काही
वडील प्रश्न ईचाराकरता यिसनं मनासमोर बसनात,
2 तवय परमेश्वरनं वचन माले प्राप्त व्हयनं की,
3 "मानवपुत्रा," "इस्राएलना वडीलसनीसंगे बोल, त्यासले सांग, प्रभु परमेश्वर
आशे सांगस, तुमी माले प्रश्न ईचाराले येयल शेतस का? प्रभु परमेश्वर सांगस, मनी
जीवनी शपथ, मी तुमले माले प्रश्न ईचारू देवावू नही.
4 "तु त्यासनं न्याय करानं नही का? मानवपुत्रा, तु त्यासना न्याय करानं नही
का? त्यासले त्यासना वडीलसना अमंगळ कृत्य विधित करं.
5 त्यासले सांग प्रभु परमेश्वर सांगस, ज्या दिन मी इस्राएलले निवाडी लिद,
याकोब वंशकडे हात करीसनं मी शपथ लिदी, मिसर देशमां मी त्यासले प्रकट
व्हयनू; हात उचलीसनं मी त्यासले शपथपुर्वक सांग की मी परमेश्वर तुमना देव शे.

6 त्या दिन मी हात उचलीसनं, त्यासनासंगे शपथ लिदी की, मी तुमले मिसर
देशमाईन काढिसनं दुधमधना प्रवाह वाहातसं आशे तुमनाकरता दखेल देशमां लयी
यिसु; तो देश बठा देशसमां मुकूटमणी शे.
7 तवय मी त्यासले सांग, तुमी सर्वासनी तुमनी नजरमां प्रिय आशा अमंगळ वस्तु
फेकी देवानं अनी मिसर देशन्या मुर्तीसघाई सोताले विटाळ व्हवू देवानं नही; मी
परमेश्वर तुमना देव शे.
8 तरीबी त्यासनी मनासंगे फितुरी करी अनी मना आयकनात नही; त्यासनी
नजरमां त्यासले प्रिय आशा तठेन्या अमंगळ वस्तु फेकात नही; मिसर देशमासल्या
मुर्त्याबी त्यासनी सोडयात नही; तवय मिसर देशमां त्यासनावर मनी संतापनी वृष्टी
व्हावाले पाहिजे; मना कोप त्यासनावर परा व्हावाले पाहिजे, आशे मी सांग.
9 तरी मना नावकरता, ज्या राष्ट्रासमां त्या राही राहींनतात त्यासनासमोर आपलं
नावनं आपमान व्हावाले नको, म्हनीसनं मी हाई काम करं; मी त्यासले मिसर
देशमाईन काढीसनं त्या राष्ट्रासनासमोर त्यासले प्रकट व्हयनु.
10 "मी त्यासले मिसर देशमाईन काढीसनं जंगलमां आणं.
11 ✡ मी त्यासले नियम लायी दिदु, मना निर्णय त्यासले दखाडी दिदात, हाई जो
कोणी पाळी तो त्यापरमानं वाची.
12 आजुन त्यासनामां अनी मनामां चिन्ह व्हावाकरता मी त्यासले आपलं
शाब्बाथ दिद; ते हयानाकरता की मी परमेश्वर त्यासले पवित्र करं आशे त्यासले
समजाले पाहिजे.
13 तरीबी रानमां इस्राएल घराणानं मनासंगे फितुरी करी, ज्यानं पाळामुये माणुस
वाचसं; त्या मना नियमपरमानं चालनात नही, मना निर्णय त्यासनी टाकी दिदात
अनी मना शाब्बाथ भलत भ्रष्ट करं; तवय रानमां त्यासनावर आपली क्रोधनी वृष्टी
करीसनं त्यासनं नाश करानं आशे मी सांग.
14 तरीबी ज्या राष्ट्रासनादेखत मी त्यासले बाहेर आणं त्यासनादेखत आपलं नावनं
आपमान व्हावाले नही पाहिजे म्हनीसनं आपलं नावकरता आशी कृती करी.
15 आजुन मी हात उचलीसनं रानमां अशी शपथ लिदी की दुधमधनं प्रवाह जठे
वाही राहीना शेतस अनी जो बठा देशना मुकूटमणी शे आशे देश मी त्यासले देयल
व्हतुं, तठे मी त्यासले आणाऊ नही.
16 कारण त्यासनं मन त्यासना मुर्तीसनीसंगे जुडामुये त्यासनी मना निर्णय टाकी
दिदात; त्या मना नियमपरमानं चालनात नही, अनी त्यासनी मनी शपथ भ्रष्ट करी.

✡ **20:11 20:11** लेवीय 18:5

17 "तरीबी मी त्यासनावर कृपादृष्टी करीसनं त्यासनी दया करी, रानमां त्यासना
नाश करं नही, त्यासना पुरा शेवट करं नही.
18 तशेच रानमां त्यासना वंशसले बोलनू, तुमी आपला वडीलसना नियमपरमानं
चालू नका, त्यासना निर्णयले अनुसरानं नही, अनी त्यासन्या मुरत्यासघाई सोताले
ईटाळू नका;
19 मी परमेश्वर तुमना देव शे, मना नियमले धरीसनं चाला; आपला निर्णय
पायीसनं त्यापरमानं वागा.
20 मना शाब्बाथ पवित्र माना, मनजे ते तुमनामां अनी मनामां चिन्ह व्हतीन अनी
तुमले समजी की मी परमेश्वर तुमना देव शे.
21 "तरीबी त्या वंशनीबी मनासंगे फितुरी करी; जे पायामुये माणुस वाचसं, त्या
मना नियमपरमानं चालनात नहीं; त्यासनी मना निर्णय टाकी दिदात, मना शाब्बाथ
त्यासनी भ्रष्ट करं; तवय रानमां त्यासनावर मनी क्रोधनी वृष्टी करीसनं त्यासनावर
मना कोप पुरा व्हावाले पाहिजे आशे मी बोलनू.
22 तरीबी ज्या राष्ट्रासनादेखत मी त्यासले बाहेर आणं त्यासनादेखत आपलं नावनं
आपमान व्हावाले नहीं पाहिजे म्हनीसनं मी आपला हात आवरा; आपलं नावकरता
आशी कृती करी.
23 ✡आजून त्यासनी राष्ट्रासामां पांगापांग करसूं अनी त्यासले देशोधडीले लावसू
आशी प्रतिज्ञाबी मी रानमां हात उचलीसनं करी.
24 कारण त्यासनी मना निर्णय पायात नहीं; मना नियम टाकी दिदात, मना
शब्बाथ भ्रष्ट करी टाक; अनी त्यासनी नजर त्यासन्या वडीलसनी मुरतीसकडे
लागनं.
25 "तवय जे चांगल नही आशे नियम मी त्यासले दिदात, ज्यानाघाई त्या
वाचावूत नहीं आशे निर्णय त्यासले दिदात.
26 मी त्यासनी नासधुस करामुये त्यासले आशे कळी की मी परमेश्वर शे; मी
त्यासले त्यासना यज्ञ अर्पणनाबारामां आशे भ्रष्ट करी टाक की त्यासनी गर्भमाईन
निघेल पहिलं आगमां होमं करी टाक.
27 "म्हनीसनं हे मानवपुत्रा, इस्राएलना घराणानीसंगे बोल, अनी हाई सांग; प्रभु
परमेश्वर आशे सांगसं, परत फिरीसनं तुना पुर्वजसनी मनासंगे ईस्वासघात करीसनं
मना अपमान करं; ते आशे.
28 मी मना हात उचलीसनं शपथ लिसनं देयल देशमां त्यासले आणं तवय
त्यासनी उचा टेकडया अनी परतेक दाट सावलीना झाड दखीसनं तठे आपला

✡ **20:23 20:23** लेवीय 26:33

यज्ञबलीना अर्पण करात; तठे राग यि आशे अर्पण त्यासनी करात; तठे त्यासनी सुवासिक धुप जाळात अनी तठेच त्यासनी आपला पेयार्पण वाही टाकात.
29 तवय मी त्यासले बोलनू; तुमी ज्या उचा ठिकानले जातसं ते कसानं शे? आजपावोत त्याले बामा (उंचवट) आशे बोलत ऊना शेतस.
30 म्हनीसनं इस्राएल घराणाले सांग, प्रभु परमेश्वर सांगस, तुमी आपला बापना मार्गले लागीसनं सोताले विटाळंतसं, अनी अनाचार करीसनं त्यासन्या अमंगळ वस्तुसनामांगे लागतसं.
31 अनी आपला अर्पण वाहीसनं अनी आपला पोऱ्यासना आगमां होम करीसनं आपल्या बठया मूर्तीसकडतीन आजपावोत सोताले विटाळत ऊना शेतस; आशे राहीसनं बी मी तुमले प्रश्न ईचारु दिसू का? प्रभु परमेश्वर सांगस, मनी जीवनी शपथ मी तुमले प्रश्न ईचारू देवावू नही.
32 तुमी म्हनतसं, राष्ट्रासमां, देश देशमासला लोकेसपरमानं आम्ही दगडनी मुर्तीनी पुजा करसतू; हाई जे तुमी मनमा तरंग उडावतसं ते सिध्दीस जावावू नही.

## परमेश्वर दंड देस अनी माफबी करसं

33 "प्रभु परमेश्वर सांगस, मनी जीवनी शपथ, मी शक्तीशाली बाहूघाई, उगारेल हातघाई अनी कोपवृष्टी करीसनं तुम्हनावर राज्य करसू.
34 मी प्रबळ बाहूघाई, उगारेल हातघाई अनी कोपवृष्टी करीसनं तुमले राष्ट्रसमाईन लयी यिसु; ज्या देशमां तुमनी पांगापांग व्हयेल शे तठेतून मी तुमले एकजागे करसू.
35 अनी मी तुमले राष्ट्रसना रानमाईन आणीसनं तठे तुमनासंगे समक्ष वाद करसू.
36 मी मिसर देशना रानमां तुमना वाडवडीलसनीसंगे वाद करं तशे तुमनासंगे वाद करसू, आशे प्रभु परमेश्वर सांगस.
37 "तुमले काठीखालतीन चालाडीसनं करारबध्द करसू;
38 बंडखोर अनी मनासंगे फितुरी करनारा यासले मी तुमनापाईन येगळं करसू; त्या थोडाच येळ वस्ती करीसनं शेतस त्या देशमाईन त्यासले बाहेर लयी जासु; पन इस्राएल देशमां त्यासनं येणं व्हवावू नही; मनजे तुमले समजी की मी परमेश्वर शे."
39 म्हनीसनं प्रभु परमेश्वर आशे म्हणसं, हे इस्राएलना घराणा, जा, तुले पाहिजे त्या मुरत्यासनी पुजा कर; पन पुढे तुमी नक्कीच म्हना आयकशात, अनी आपला अर्पणघाई अनी मुरतीसघाई म्हनं पवित्र नावले बट्टा लावावूत नही.
40 तर तुमी मना पवित्र पर्वतवर, इस्राएलना उचा पर्वतवर, इस्राएलन सर्वा घराणा, त्यामासला बठा जण, आपला देशमां मनी सेवा करतीन, आशे प्रभु परमेश्वर सांगस,

तठे मी त्यासना अंगीकार करसू; तठे तुमनाजोडे अर्पण, तुमना श्रेष्ठ अर्पण, समर्पित करेल बठया वस्तु मी मांगसू.

41 मी तुमले राष्ट्रसमाईन बाहेर आणसू अनी ज्या देशमां तुमनी पांगापांग व्हयेल शे तठेतीन तुमले जमा करसू; तवय मी सुंगधपरमानं तुमनं स्विकार करसू, अनी तुमनामां मनी पवित्रता विदेशी राष्ट्रसमां प्रकट व्हयी.

42 जो इस्राएल देश मी हात वर करीसनं तुमना वडीलले दिद् तठे मी तुमले आणसू तवय तुमले समजी की मी परमेश्वर शे.

43 ज्य तुमना मार्गतीन अनी ज्या तुमना बठा कर्मतीन तुमी सोताले विटाळेल शे, त्यासनी तुमले आठवन यि अनी ज्या तुमी सर्व दुष्कर्म करात त्यामुये तुमी सोताले वीट मानशात.

44 हे इस्राएल घराणा, प्रभु परमेश्वर सांगस, तुमना कुकर्मपरमानं, तुमना भ्रष्ट कृत्यासपरमानं नही ते मना नावकरता मी तुमनामां करनी करसू, तवय तुमले समजी की मी परमेश्वर शे.

### दक्षिणना ईरोधमां भविष्यवाणी

45 परमेश्वरनं वचन माले परत प्राप्त व्हयनं;

46 मानवपुत्रा, दक्षिणकडे आपलं तोंड कर, दक्षिणकडे आपली वाणीनं ओघ वाहू देय अनी दक्षिणनां मैदानमां वननीबारामां संदेश देय.

47 दक्षिणना वनले सांग, परमेश्वरनं वचन आयक, प्रभु परमेश्वर सांगस, दख, मी तुनामां आग पेटाडसू, तो तुनामासला परतेक हिरवा झाड अनी परतेक शुष्क झाड भस्म करी; धगधगनारा जाळं ईझावू नही अनी तिनामुये दक्षिणना अनी उत्तरना बठा तोंड पोळतीन.

48 मी परमेश्वरनी तो अग्नी पेटाडेल शे आशे बठा माणसे समजतीन; तो ईझावू नही.

49 मी सांग, अहा! प्रभु परमेश्वर; लोके मनाबारामां सांगतस, हाऊ दृष्टांत सांगनारा नही का?

# 21

### न्यायनी तलवार

1 परमेश्वरनं वचन माले प्राप्त व्हयनं की,

2 "मानवपुत्रा," "यरूशेलमकडे आपल तोंड करं; पवित्रस्थानकडे आपली वाणीनी ओघ वाहू देय अनी इस्राएल देशना ईरोधमां संदेश देय.

3 इस्राएल देशले सांग, परमेश्वर आशे सांगस की, दख, मी तुनाईरोधमां शे, मी
मनी तलवार म्यानमाईन काढीसनं तुनामासला धार्मिक अनी दुष्कर्मी यासले छेदी
टाकसू.
4 मी तुनामासला धार्मिक अनी दुष्कर्मी यासले छेदी टाकसू; म्हनीसन मनी
तलवार म्यानमाईन निघीसनं दक्षिण अनी उत्तरकडला सर्व मानवजातवर चाली;
5 तवय बठी मानवजातले समजी की मी परमेश्वरनी आपली तलवार म्यानमाईन
उपसेल शे; ती परत त्यामा जावावू नही.
6 म्हनीसनं हे मानवपुत्रा, कंबर मोडी आशे उसासा टाक, त्यासनासमोर कष्टना
उसासा टाक;
7 उसासा का बर टाकी राहीना शे आशे कोनी तुले ईचारी तवय त्यासले सांग
की, हाई वार्ता ध्यानमां यि राहीनी शे म्हनीसनं; तवय बठासना मन खची, सर्वासना
हात निर्बल व्हतीन, सर्वासना उत्साह कमी व्हयी, बठासना गुडघामां पानी व्हयी,
दख, ती प्रत्ययास यि राहीनी शे, त्यामा खास घडणार शे, आशे प्रभु परमेश्वर सांगस.
8 परमेश्वरनं वचन माले प्राप्त व्हयनं की,
9 "मानवपुत्रा," संदेश दिसनं सांग, परमेश्वर आशे सांगस,
तलवार, पानी देयेल, पाजेल तलवार!
10 वध कराले पाहिजे म्हनीसनं तिले पानी देयेल शे,
ती ईजपरमानं चमकाले पाहिजे
म्हनीसनं ती पाजेल शे,
मना पोऱ्याना राजवेत्र बठा दंडले तुच्छ लेखसं आशे शे म्हनीसनं तुमी आनंद
करतसं का?
11 ती हातमां धरता येवाले पाहिजे
म्हनीसनं पाजाले देयेल शे,
तलवार वध करनारानी हातमां देवानी शे
म्हनीसनं तिले पानी देयेल शे, ती पाजेल शे.
12 मानवपुत्रा, वरड, आक्रोश कर,
कारण ती मना लोकेसवर चालेल शे;
ती इस्राएलना बठा सरदारसवर चालेल शे;
मना लोकेसनीसंगे त्याबी तलवारघाई पडेल शेतस,
म्हनीसनं आपलं ऊर बडवं.
13 कारण त्याले परिक्षामां टाकेल शे,
अनी तुच्छ माननारा राववेत्र टिकावुत नहीते कशे,

आशे प्रभु परमेश्वर सांगस.
14 मानवपुत्रा तु संदेश दिसनं टाळया वाजाड मनजे तलवारले, भोसकनारी
तलवारले, तिप्पट जोर यि, त्याले घेरनारी तलवार, थोरसलेबी भोसकनारी व्हयी.
15 त्यासना हृदय गलित व्हावाले पाहिजे, अनी त्यासना पाया पराकाष्ठतीन
लटपटाले पाहिजे म्हनीसनं मी त्यासनी बठी वेशीवर घात करनारी तलवार चालाडेल
शे; अहो! ती ईजपरमानं चमकाले पाहिजे आशे तिले करेल शे, ती माराकरता
उपसेल शे.
16 आये तलवार, तुनं तोंड जशे फिरी तशे तु सवारीसनं उजवीकडे वय,
डावीकडे फिर.
17 मी बी टायी वाजाडीसनं मनी क्रोधनी पुर्तता करसु; मी परमेश्वर हाई सांगस.

### बाबेलना राजानी तलवार

18 परमेश्वरनं वचन माले परत प्राप्त व्हयनं की,
19 मानवपुत्रा बाबेलना राजानी तलवार येवाकरता दोन रस्ता आखी ठेव; नगरमां
जानारा रस्तानी चवाठीवर मार्गदर्शक हातनी एक आकृती खंदी ठेव.
20 अम्मोनी पोर्‍यासना राब्बा यानावर तलवार येवाकरता एक रस्ता अनी
यहुदामां जायीसनं तटबंदी करेल यरूशेलमवर तलवार येवाकरता एक रस्ता आखी
ठेव.
21 कारण बाबेलना राजा चवाठावर, दोन रस्ता फुटतसं तठे शकून दखाले थांबेल
शे; तो भातामासला बाण हालाडीसंन प्रश्न दखी राहीना शे; तेराफिमले कौल लायी
राहीना शे, बली चढायेल पशुना काळजवरतीन शकून दखी राहीना शे.
22 त्यानी उजवीकडे यरूशेलमनीबारामां शकून निघना; तो आशे शे की
आघातयंत्र लवावी; मारा! हाणा! आशे शब्द तोंडमाईन निंघाले पाहिजे; सिंहानंद
करानं, वेशीले आघतयंत्र लावानं; मोरचे रचानं अनी बुरूज बांधानं.
23 इस्राएलना नजरतीन हाई शकून खोटा शे, कारण त्यासनाजोडे देवनं
प्रतिज्ञापुर्वक करार शेतस. तरीबी तो त्यासले त्यासना अधर्मनी आठवन करीसनं
परकासनी हातमां दी.
24 हयामुये प्रभु परमेश्वर सांगस, तुमना पाप उघडा व्हयीसनं तुमन्या बठया
कृत्यासमां तुमनी पापं दखायतसं, ज्यानामुये तुमीच सोताले अधर्मनी आठवन करी
देतस; तुमले आठवन व्हयी जायेल शे म्हनीसनं तुमी परक्यासना हातमां सापडेल
शेतस.
25 हे जखमी व्हयेल पापी सरदार, तुनी येळ, तुनं पापनं शेवट जोडे यि लागेल
शे.

26 प्रभु परमेश्वर आशे सांगस, शिरोभुषण उतार, मुकूट काढी टाक; काहीच
कायमनं राहावावू नही; ज्या नीच त्या उचा व्हतीन अनी उचा त्या नीचा व्हतीन.
27 मी त्यासना नाश करसू; करसूस करसू; हाई स्थिती आशी राहावावू नही;
ज्याना हक्क शे तो येवावर मी सत्त दीसू,

### अम्मोनी लोकेसनी ईरोधमां तलवार

28 "हे मानवपुत्रा संदेश दिसनं सांग, अम्मोनी पोर्‍यासनीबारामां अनी त्यासनी
करेल निंदानीबारामां प्रभु परमेश्वर जे सांगस ते सांग,
तलवार वध कराकरता तलवार उपशेल शे;
फन्ना उडावाकरता, चमकाडाकरता ती पाजेल शे.
29 त्या तुनासमोर कपटना संदेश देतस तवय; तुले खोटं शकून सांगतस तवय; ज्या
जखमी व्हयेल पापीसना पापजन्य शेवट जवय यि लागेल शे त्यासनी कापेल मानवर
ती तलवार तुले झोपाडी.
30 "ती परत म्यानमां घाल, जठे तु तयार व्हयेल शे ती तुनी जन्म भुमीवर मी
तुना न्याय करसू.
31 मी मना कोपना वर्षाव तुनावर करसू, अनी ज्या राक्षशनासारखा अनी नाश
करानाबारामां कुशल शेतस आशे माणसासनी हातमां तुले दिसू
32 तु आगमां भस्म व्हशी; तुना रंगत देशमां पडी राही; तुनी मोरे आठवन
राहावावू नही; कारण मी परमेश्वर हाई बोलेल शे.

# 22

### यरूशलेम नगरना अपराध

1 परमेश्वरनं वचन माले प्राप्त व्हयन की,
2 "मानवपुत्रा," "तु न्याय करशी ना? त्या खुनी नगरीना न्याय करशी ना? त्या
येळले तिले तिना बठा अमंगळ कृत्य दखाड.
3 तिले सांग, प्रभु परमेश्वर सांगस, आये नगरी, तुना काय येवाले पाहिजे
म्हनीसनं तु आपलामां रक्तपात करस, अनी सोताले विटाळ कराकरता मुर्ती करस.
4 सोता पाडले रंगतघाई तु आपलाला दोषी करं, तु करेल मुर्तीघाई सोताले
विटाळ; तु आपला काय जोडे आणं, तुना वरीस भरी जायेल शेतस, म्हनीसनं मी
तुले राष्ट्रसना निंदाले, बठा देशना थटाले पात्र करसू.
5 तु अभद्र नावनी अनी बेबंदपणतीन भरेल नगरी शे हाई समजीसनं जोडेना अनी
दुरना तुना उपहास करतीन,

6 दख, इस्त्राएलना बठा सरदार आप आपला बाहुबलपरमानं रक्तपात कराकरता
तुनामां राहेल शेतस.
7 ✡तुमनामां लोके मायबापले तुच्छ मानतसं, तुनामां त्या परदेशीवर जुलूम
करतसं, तुमनामां त्या अनाथ अनी विधवासवर अत्याचार करतसं,
8 तु मन्या पवित्र वस्तुसले तुच्छ मानस, तु मना शाब्बाथ अपवित्र मानी राहीना
शेतस.
9 तुनामां रक्तपात कराकरता लुचा लोके राही राहीना शेतस, त्या तुना डोंगरवर
मेजवानी करतसं, तुनांमा बदलफैलीमां चालतसं.
10 ✡तुनामां त्या बापनी लाज उघडी करतसं, पाळी येयल बाई दुर बशेल व्हती
तवय तिनावर बलात्कार करतसं.
11 तुनामां कोणीबी आपली शेजारनी बाईनीसंगे अघोर कर्म करसं, कोनी आपली
सुननीसंगे शरीरसंबध करीसनं तिले भ्रष्ट करसं, कोनी आपली बहीनले, कोनी
आपला बापनी पोरले भ्रष्ट करसं.
12 तुनामां रक्तपात कराले पाहिजे म्हनीसनं त्या लाच लेतस, तु व्याजबटा करस,
जुलूम करीसनं आपला शेजारीले त्रास देस अनी माले ईसरेल शे, आशे प्रभु परमेश्वर
सांगस,
13 म्हनीसनं हयामुये, तु अन्यायतीन करेल कमायीमुये, अनी तुनामासला
रक्तपातमुये मी मना हात उपटी राहीनू शे.
14 मी तुना समाचार लिसू त्या दीन तुन मन टिकावू धरावू नही का? तु हात दृढ
राहातीन का? मी परमेश्वर हाई जे बोलेल शे ते मी करसुच.
15 मी राष्ट्रसमां तुनी पांगापांग करसु, देश देशमां तुनी दाणादाण करसू अनी तुनी
अशुध्दता नष्ट करसू.
16 तु राष्ट्रासदेखत आपला कर्मतीन अपवित्र ठरशी; तवय तुले समजी की मी
परमेश्वर शे.

## परमेश्वरना राग

17 परमेश्वरनं वचन माले प्राप्त व्हयनं की,
18 मानवपुत्रा, इस्त्राएलना घराणां मनी नजरमां फक्त गाळ व्हयी जायेल शे,
भट्टीमासला पितय, कथील, लोखंड अनी शिसा यानासारखा त्या सर्वा शेतस; त्या
रूप्यामासला गाळ व्हयी जायेल शेतस.

✡ **22:7 22:7** निर्गम 22:21-22 ✡ **22:10 22:10** लेवीय 18:7-20

19 हयामुये प्रभु परमेश्वर सांगस, तुम्ही सर्वा गाळ व्हयेल शेतस; म्हनीसनं दख,
मी तुमले यरूशेलममां एकजागे करसू.
20 रूपे, पितय, लोखंड, शिसा अनी कथील लोके भट्टीमां टाकतसं अनी ती
ईतवळाकरता आगमां फुकी तापाडतस, तशे मी मना क्रोधघाई अनी संतापतीन तुमले
जमा करसू अनी भट्टीमां ईताळसू.
21 मी तुमले जमा करीसनं मनी क्रोध आगना फुंकर तुमनावर घालसू, ज्यामुये
तुमी भट्टीमां ईतळी जाशात.
22 रूपे भट्टीमां ईतळतसं तशे तुमी यरूशलेमां ईतळी जाशात, तवय तुमले समजी
की मी परमेश्वरनी आपला संताप तुमनावर वतेल शे.

## इस्राएल सरदारसना पाप

23 मंग परमेश्वरनं वचन माले प्राप्त व्हयनं की,
24 मानवपुत्रा, हाई भुमीले सांग, क्रोधनां दिनमां ज्या शुध्दी न पावेल अनी
पर्जन्यवृष्टी नही व्हयेल तु भुमी शे.
25 तठे संदेष्टयानी एकोपा करेल शे; भक्ष्या फाडीसनं खानारा गरजना करनारा
सिंहपरमानं त्या लोकेसना प्राण ग्रासी टाकतीन; त्या धन अनी पैसा लयी जातसं;
त्या तिना विधवासनी संख्या वाढवतसं.
26 तिना याजक मना धर्मशास्रना नियम मोडीसनं मन्या पवित्र वस्तु भ्रष्ट करतसं;
पवित्र अनी अपवित्र यासमां त्या काही भेद ठेवतसं नही; शुध्द अनी अशुध्द यासना
फरक त्या शिकाडतसं नही; त्या मना शब्बाथनीबारामां डोयाझाकपना करतसं;
त्यासनामां मना अपमान व्हसं.
27 तिनामासला सरदार भक्ष्य फाडीसनं खानारा लांडगानामायक शेतस; त्या
अन्यायतीन कमाई कराकरता रक्तपात करतसं; मानव जातनं विनाश करतस.
28 तिना संदेष्टा कच्चा चुना त्यासनाकरता वापरतसं; मिथ्या दृष्टांत दखीसनं त्या
त्यासले खोटा शकून सांगतसं अनी परमेश्वर सांगस नही तरीबी परमेश्वरनी सांगेल
शे आशे त्या सांगतसं.
29 देशमासला लोके बलत्कार अनी चोरी करतसं; त्या दुर्बल अनी दारीद्रयासले
दाबी टाकतसं अनी परदेशीसवर अन्याय अनी जुलूम करतसं.
30 मी भुमीना नाश नही कराले पाहिजे म्हनीसनं तिनामां कोनी तट बांधी, कोनी
मनासमोर देशकरता खिंडमां उभा राही की काय यानी मी वाट दखी, पन कोनीच
माले तशे दखायनं नही.

31 यामुये मी त्यासनावर आपला क्रोधना वर्षाव करसू; मी आपला कोप आगघाई
त्यासले भस्म करसू; त्यासना आचरणना प्रतिफय त्यासना माथी आणसू आशे
परमेश्वर सांगस.

# 23

## दोन व्यभिचारी बहीणी

1 परमेश्वरनं वचन माले प्राप्त व्हयनं ते आशे,
2 "मानवपुत्रा," दोन बाया व्हत्यात, त्या एकच मायन्या व्हत्यात;
3 त्यासनी मिसर देशमां व्यभिचार करं; त्यासनी आपला तरूणपनमां व्यभिचार
करं; तठे त्यासना स्तन दाबामां ऊनात; त्यासना कौमार्या अवस्थामां माणसेसनी
त्यासना स्तन दाबात.
4 *त्यासमासली मोठीनं नाव अहला व्हतं अनी तिनी दाखली बहीननं नाव
अहलीबा व्हतं; त्या मन्या व्हयन्यात अनी त्यासले पोर्‍या अनी पोरी व्हयन्यात;
त्यासना नाव दखात तवय (तिना डेरा) मनजे शोमरोन अनी अहलीबा (मना डेरा
तिनाजोडे शे) मनजे यरूशेलम.
5 अहला मनी व्हती तवय तिनी महापाप करी वेशापन करं, ती आपली जार,
आपली शेजारीन अश्शुरी हिनावर आसक्त व्हयनी.
6 त्या निया कपडा घालनारा व्हतात अनी त्या अधिपती अनी नायब अधिपती
व्हतात, त्या बठा सुंदर अनी तरून राहीसनं स्वाबदार व्हतात.
7 त्या बठा निवडक अश्शुरी माणसे राहीसनं त्यासनासंगे ती वेशापन कराले
लागनी, अनी ज्या बठासवर ती मोहीत व्हयनी त्यासन्या बठया मुर्तीसघाई भ्रष्ट
व्हयनी.
8 मिसर देशमासली आपला वेशापन तिनी सोडी नही; तठेना माणसेसनी तिना
तरूणपनमां तिनासंगे गमन करं; त्यासनी तिना कौमार्या आवस्थामां स्तन दाबात अनी
तिनासंगे मनसोक्त व्यभिचार करी टाकं.
9 यामुये मी तिले तिना प्रेमीसना हातमां दिद; ज्या अश्शुरी माणसेसवर ती आसक्त
व्हयेल व्हती त्यासना हातमां तिले दिद.
10 त्यासनी तिले नग्न करं, तिना पोर्‍या अनी पोरीसले लयी पळनात; तिले
तलवारघाई मारी टाकं; तिनं नाव बायासनी तोंडमां व्हयनं; कारण त्यासनी तिले
शिक्षा करी.

* **23:4 23:4** अहला - जठे मना शरणस्थान

11 तिनी बहीन अहलीबा हिनी दख, तरीबी ती तिनापेक्षा जास्त भ्रष्ट व्हती; तिनी
आपली बहीनपेक्षा जास्त व्यभिचार करं.
12 शेजारना अश्शुरी माणूस अधिपती अनी नायब अधिपती, अनी उचा कपडा
घालेल स्बाबदार व्हतात, त्या बठा सुंदर तरूणसवर ती मोहीत व्हयनी.
13 मी दख तवय तिबी भ्रष्ट व्हयनी; त्या दोनीसनं वर्तन सारखाच व्हतं.
14 "तिनी आपला व्यभिचारनं क्षेत्र वाढाई टाक; तिनी भितवर माणसेसना चित्र
काढेल दखात, ती सेंदुरघाई काढेल खास्दयासना चित्र व्हतात.
15 त्यासना कंबरले पट्टा राहीसनं डोकामां उचा अनी रंगीत पागोटी व्हती;
त्या बठा माणसे वीरपरमानं राहीसनं त्यासना ढब खास्दी देशमासला बाबेलना
माणसेसपरमानं व्हतं; या माणसेसनी जन्मभुमी खास्दी देश व्हता.
16 तिनी नजर त्यासनावर गयी तवय ती त्यासनावर मोहीत व्हयनी अनी तिनी
त्याले बलावाले खास्दी देशमां जासुद धाडात.
17 तवय बाबेलना माणसे तिना सजाडेल पलंगवर तिनाजोडे गयात, त्यासनी
तिनासंगे व्यभिचार करीसनं तिले भ्रष्ट करी टाक, त्यासनी समागमातीन ती भ्रष्ट
व्हयनी, तवय तिनी आपला मन त्यासनावरतीन काढी लिद्.
18 आशे तिनी आपलं व्यभिचार मांड अनी आपली काया उघडी करी; तवय
जशे तिनी बहीनवरतीन मन उडेल व्हतं तशे तिनावरतीन उडंन.
19 तरीबी तिनी आपला तरूणपनमां मिसर देशमां वेशावृत्ती चालाडी व्हती; तिनं
तिले आठवन व्हयीसनं तीनी आजुन आपला व्यभिचार वाढाई टाक.
20 ती आपला प्रेमीसवर आसक्त व्हयनी, त्यासना अवयव तर गधडासना
अवयवनामायक व्हतं अनी त्यासना माज घोडासना माजनासारखा व्हता.
21 हाई परकारं तरूनपनमां मिसरी माणसे तुना कौमार्यादशामां दाबेत त्या येळनी
शिंदळकीनी तुले आठवन व्हनी.

## दाखली बहीणले परमेश्वना दंड

22 "म्हनीसनं, आये अहलीबे, प्रभु परमेश्वर म्हनसं दख, ज्या तुना प्रेमीसवरतीन
तुनं मन उडेल शे त्याले मी तुनाईरोधमां उठाडसू, त्याले तुनावर चारीमेरतीन आणसू;
23 बाबेलना माणसे, बठा खास्दी, पकोड, शोआ अनी कोआ आठेना माणसे
अनी अश्शुरी माणसे, ज्या बठा सुंदर तरूण, अधिपती अनी नायब अधिपती, वीर
अनी मंत्री शिलेदार शेतस; त्यासले तुनावर आणसू.
24 त्या शस्रे, रथ, चाकसना वाहान, येगयेगळा लोकेसना दळभार लिसनं तुनावर
येतीन; त्या कवचे, ढाली अनी शिरस्राण धारन करीसनं तुले चारीमेरतीन घेरतीन;

मी न्याय करानं काम त्यासनावर सोपाडी दिसू; मनजे त्या आपला कायदाले धरीसनं
न्याय करतीन.
25 मी तुनावर मनी ईर्ष्या रोखसू मनजे त्या चिडीसनं तुना समाचार लेतीन, त्या
तुना नाक अनी कान कापी टाकतीन, तुना अवशिष्ट माणसे तलवारघाई पडतीन, त्या
तुन्या पोरी अनी पोर्‍यासले लयी पळतीन, तुना उरेल माणसे आगमां भस्म व्हतीन.
26 त्या तुना कपडा लयी पळतीन तुना उत्कृष्ट जवाहीर हिसकाई लेतीन.
27 आशी तुनी शिंदळकीनी खोड, मिसर देशमां तुले लागेल व्यभिचारनी चट,
मी मोडसू, मनजे तु त्यासनाकडे ढुकीसनंबी दखावू नही अनी मिसर देशनी आठवन
यानापुढे येवावू नही.
28 प्रभु परमेश्वर सांगस, दख, ज्यासना तु व्देष करसं त्यासना हातमां मी तुले
दिसू. ज्यासनाईरोधमां तुनं मन उडेल शे त्यासना हातमां तुले दिसू.
29 त्या व्देषतीन तुना समाचार लेतीन त्या तुनी बठी मालमत्ता हिसकाईसनं तुनी
नग्नता उघडी करतीन. यानावरतीन तुनी शिंदळकीचाळासनी, तुनी कामसक्तीनी
अनी तुनी व्यभिचारनी लाज उघडी पडी.
30 तु व्यभिचार कराकरता दुसरा राष्ट्रसनीमांगे लागनी, अनी त्यासन्या
मुर्तीसघाई सोताले विटाळ म्हनीसनं हाई बठ तुले प्राप्त व्हयनं.
31 तु आपली बहीनना मार्गतीन गयीस म्हनीसनं तिनामायक तुना हातमाबी
वाटका दिसू.
32 प्रभु परमेश्वर सांगस,

तु आपली बहीनना मायक खोल
अनी मोठा पेला पिसी;
त्याना माप मोठा राव्हामुये तु हास्य
अनी थटाले पात्र व्हशी.
33 तु धाक अनी शोक यानाघाई भरी जाशी;
तुनी बहीन शोमरोन हिना पेला भय
अनी उजाड याना शे.
34 तु तो निथळीसनं पिसी;
त्यान्या खापर्‍या तु कुरतडीसनं खासी
अनी त्यानाघाई तु आपली छाती ओरबडसी;
कारण हाई मी बोलेल शे, आशे प्रभु परमेश्वर सांगस.

35 यामुये प्रभु परमेश्वर सांगस, तु माले ईसरेल शे, अनी तु मनाकडे पाठ फिरायेल
शे, म्हनीसनं तु आपली कामसक्तीना अनी व्यभिचारना फय भोग.

## दोन्ही बहीनीसले दंड

36 आजुन परमेश्वरनी माले सांग, मानवपुत्रा, तु अहला अनी अहलीब यासना
न्याय करस ना? तर त्यासले त्यासना अमंगळ कृत्य दखाड.
37 कारण त्यासनी व्यभिचार करेल शे, त्यासना हातले रंगत लागेल शे, त्यासनी
आपल्या मुर्तीसनीसंगे व्यभिचार करले शे अनी मनापाईन त्यासले व्हयेल पोऱ्या
मर्तीसले भक्ष्य व्हावाले पाहिजे म्हनीसनं त्यासनी आगमां त्यासना होम करेल शेतस.
38 त्यासनी मनासंगे हाईबी वर्तन करेल शे की त्यासनी त्याच दिन मना
पवित्रस्थान अपवित्र करेल शे अनी मना शाब्बाथ भ्रष्ट करेल शे.
39 कारन त्यासनी आपला पोऱ्यासना वध करीसनं त्या आपल्या मुर्तीसले अर्पण
करेल शे, तवय त्याच दिन त्या मना पवित्रस्थान अपवित्र कराकरता तठे ऊनात;
दख, त्यासनी मना मंदिरमां आशे वर्तन करेल शे.

40 "तशेच तुमी दुरदुरना माणसेसले बलावाकरता निरोप धाडात, त्यासनाकडे
जासुद धाडात अनी दख, त्या वनात, त्यासनाकरता तु आंग धव, डोयामां काजय
लायी अनी दागिनासघाई सोताले सजाडं.
41 उत्कृष्ट मंचवर बसनी, त्यासनामोरे मेज मांडीसनं त्यासनावर मना धुप अनी
तेल ठेवं.
42 तठे चैनी लोकेसनी धामधुम चालू व्हयनी, सामान्य माणसासनीसंगे रानमाईन
आजुन दारूबाज लोकेसले आणं; त्यासनी त्यासना हातमां बांगडया घाल्यात अनी
डोकामां उत्तम शिरोभुषण घालात.
43 तवय शिंदळकी करीसनं नि:सत्व व्हयेल व्हती तिनाबारामां मी बोलनू की
आते त्या तिनासंगे अनी ती त्यासनासंगे व्यभिचार करी का?
44 लोके वेशाकडे जातसं तशे त्या तिनाकडे गयात; त्या अहला अनी अहलीबा
या बायासकडे गयात.
45 तथापी धार्मिक लोके प्रेमिसना अनी खुनी बायासना न्याय करतसं तशे
त्यासना करतीन; कारण त्या प्रेमी शेतस अनी त्यासना हातले रंगत लागेल शे.

46 प्रभु परमेश्वर सांगस, मी त्यासनावर लोकेसना जमवा आणीसनं त्यासना
दहशत पडी अनी त्यासले लुटतीन आशे करसू.

47 लोकेसना जमाव त्यासले दगडमार करी अनी आपली तलवारघाई त्यासना
नाश करी; त्या त्यासना पोर्‍या सोर्‍यासना कत्तल करतीन अनी त्यासना घरदार
आगघाई जायी टाकतीन.
48 हाई परकारं मी देशमाईन महापाप नष्ट करी टाकसु, मनजे बठया बाया सावध
व्हयीसनं तुमनामायक शिंदळकी करावृत नही.
49 त्या तुमना महापाप प्रतिफय तुमले देतीन; तमी आपल्या मर्तीपुजाना पापना
फय भोगशात; तवय तुमले समजी की मी प्रभु परमेश्वर शे.

# 24

## बघुनाना दृष्टांत

1 मंग नववा वरीसले, दहावा महीनानी दशमीले परमेश्वरनं वचन माले प्राप्त
व्हयनं की,
2 "✡मानवपुत्रा," "तु हाई तारीख, आजनी तारीख लिखी ठेव; आजनी तारीखले
बाबेलना राजा यरूशेलमवर जायीसनं पडना शे.
3 हाई भांडखोर घराणाले दाखला दिसनं आशे सांग, प्रभु परमेश्वर सांगस, प्रभु
परमेश्वर सांगस
एक कढाई चुलावर चढाव,
ती चढावावर तिमां पानी वतं.
4 मांडया अनी खांदा आशे
मांसना चांगला तुकडा जमा करीसनं तिमा टाक,
तिमा निवडक हाडे भर.
5 कळपमाईन एक चांगला मेंढरू निवाडी लेय;
हाडं शिजाडाकरता खाल लाकडसना निखारा कर;
ते चांगले शिजू देय;
त्यासमासला हाडंबी चांगलं शिजू देय.
6 म्हनीसनं प्रभु परमेश्वर सांगस, हाई खुनी नगरीले धिक्कार असो! ती गंज
चढेल कढाईनामायक शे, तिना गंज निघसं नही, तिमासला एक एक तुकडा बाहेर
काढ, तठे चिठया टाकानं नही.

✡ **24:2 24:2** २ राजे 25:1; यिर्मया 52:4

7 कारण तिनी रक्तपात करेल शे, त्या रंगतघाई ती भरेल शे, ते तिनी उघडा
खडकवर पडू दिद् शे, धुळघाई ते झाकता येवाले नही पाहिजे म्हनीसनं तिनी ते
जमीनवर पडू दिद् नही.
8 संताप यिसनं सूड लेवाकरता तिनी रंगत पाडेल शे, ते झाकता येवाले नही
पाहिजे म्हनीसनं ते उघडा खडकवर पडाले पाहिजे म्हनीसनं आशे मी करेल शे.
9 त्यामुये प्रभु परमेश्वर सांगस, हाई खुनी नगरीले धिक्कार असो! मी सरपनना
ढिगबी मोठ करसू.
10 लाकडे भरपूर टाक, आग चांगली पेटाड, मांस चांगल शिजाड, रसाले
चांगलं घट व्हयी जाऊ देय, हाडंबी भुजी टाक.
11 मंग कढाई ईस्तवर रिकामी ठेव मनजे तिनं पितय तपी अनी धगधगती
व्हयीसनं तिनं मय मजारमां जयी, तिना गंज निघी जायी.
12 ति काम करीसनं थकी गयी तरी तिनावर बसेल दाट गंज निघनं नही,
गंजनासंगेच तिले आगमां टाक.
13 तुनी अशुध्दता दखी तवय ती भलती भयंकर शे; मी तुले साफ करी दख तरी
तू स्वच्छ व्हयनी नही, तुनावर मना संतापघाई मन भरसं तोपावोत तु शुध्द व्हवावू
नही.
14 मी परमेश्वर हाई बोली राहीनू शे; हाई घडीच; हाई मी करसुच; मी मांगे
सरकावू नही; दया करावू नही; तुना आचरन परमानं, तुनं कर्मपरमानं त्या तुना न्याय
करतीन; आशे प्रभु परमेश्वर सांगस.

### यहज्केलनी बायकोनं मरण

15 परत माले परमेश्वरनं वचन प्राप्त व्हयनं की,
16 मानवपुत्रा, दख, मी तुना डोयासले जे प्रिय शे त सपटयासरशी काढी लेस;
तरी तु शोक करावू नही, रडावू नही, आसू गायावू नही.
17 उसासा गचचुप टाक; मरेलसनीकरता शोक करू नको; डोकामां फेटा घाल,
पायमां जोडा घाल, आपला वठ जाकू नको, सुनकना माणसे जेवण धाडतसं ते खाऊ
नको.
18 सकासले लोकेसमां मी हाई बोलनू, अनी संध्याकायले मनी बायको मरनी;
तवय माले आज्ञा व्हयेल व्हती तशे मी दुसरा दिन सकासले करी टाक.
19 यावरतीन माणसे माले बोलनात, तु हाई काय करसं त्याना आमनासंगे काय
संबंध शे ते आमले सांगशी का?
20 मी त्यासले बोलनू, परमेश्वरनं वचन माले प्राप्त व्हयेल शे की,

21 इस्राएलना घराणाले आशे सांग, प्रभु परमेश्वर सांगस, दख, तुमनी ताकदतीन,
तुमना डोयासले प्रिय, तुमना जीवना जिव्हाळा, आशे जे मनं पवित्रस्थान ते मी भ्रष्ट
करसू अनी तुमी मांगे ठेयेल तुमना पोऱ्यासोरे तलवारघाई पडतीन.
22 मंग मी करेल शे तशे तुमीन करशात, तुमी वठ झाकावून नही अनी सुतकना
लोके जेवण धाडतसं ते तुमी खावावूत नही.
23 तुमी आपला डोकामां फेटा घालशात, पायमां जोडा घालशात, तुमी शोक
करावुत नही, रडावूत नही, तर आपला अधर्मघाई झुरशात अनी येरायेरले दखीसनं
उसासे टाकशात.
24 हाई परकारतीन यहेज्केल तुमले चिन्हवत व्हयी, त्यानी करं तशे तुमी
करशात; हाई घडी यि तवय तुमले समजी की परमेश्वर शे.
25 हे मानवपुत्रा, त्यासनी ताकद, त्यासना वैभवमुलक हर्ष, त्यासन्या डोयासले
प्रिय वाटनाऱ्या वस्तु, त्यासना जीवना ईष्टविषय अनी त्यासन्या पोरीसन्या पोऱ्यासले
मी त्यासनापाईक हिसकाई लिसू.
26 त्या दिन वाचेल एखादा माणुस तुना कानवर हाई वर्तमान सांगाले तुनाकडे
यि.
27 त्या दिन तो वाचेल माणुसनासंगे बोलाकरता तोंड उघाडशी; तु बोलशी,
यानामोरे तु शांत राहावावू नही; आशे तु त्यासले चिन्हवत व्हशी, मनजे त्यासले
समजी की परमेश्वर शे.

# 25

## अम्मोननी ईरोधमां भविष्यवाणी

1 परमेश्वरनं वचन माले परत प्राप्त व्हयनं की,
2 मानवपुत्रा, अम्मोनी वंशकडे आपलं तोंड करीसनं त्यानाईषयी संदेश देय;
3 अम्मोनी वंशसले सांग, प्रभु परमेश्वरना वचन आयका; प्रभु परमेश्वर आशे
सांगस, मना पवित्रस्थान अपवित्र करामां व्हनं, इस्राएल देश ओसाड करामां व्हनं,
यहुदयासना घराणाले बंदीवान करीसनं लयी गयात तवय तु, वाहवा आशे सांग,
4 म्हनीसनं दख, मी पुर्वकडना लोकेसले तुना ताबा दिसू. त्या तुनासंगे छावनी
करीसनं राहातीन अनी आपला घर बांधतीन; त्या तुनामासला फये खातीन अनी
तुना दुध पितीन.
5 मी राब्बा नगरले उंटसना गोठा बनाडसू, अम्मोनी वंशसना मेंढया बकऱ्या
बसाडाना वाडा करसू; तवय तुमले समजी की परमेश्वर शे.

6 "कारन प्रभु परमेश्वर सांगस, तु इस्राएल देशनाईषयी टाया वाजाडयात, थयथय
नाचना अनी त्यासनी दुर्दशा दखीसनं तु मनपाईन आनंद करं.
7 म्हनीसनं दख, मी आपला हात तुनावर उगारसू, मी तुले राष्ट्रसना हातमां लुट
म्हनीसनं दिसु, तुना राष्ट्रसमाईन नाश करसू, देशमाईन नाहीसं करसू, तुले मी नष्ट
करसू; तवय तुले समजी की मी परमेश्वर शे.

### मवाबना ईरोधमां भविष्यवाणी

8 प्रभु परमेश्वर आशे सांगस, मवाब अनी सेईर सांगतसं की दखा, यहुदयासना
घराणं दुसरा राष्ट्रसनामायक शे.
9 म्हनीसनं दखा, मी मवाबना स्कंधपरदेश उघडा करसू, त्याना नगर, देशमासला
भुषण आशी बेथ-याशिमोथ, बाल-मौन, किर्याथ हया नगर,
10 अनी अम्मोनी वंशसना देश, हया पुर्वकडला लोकेसले स्वारी कराकरता
खुला करी दिसू; त्यासना मी त्यासले ताबा दीसु, मनजे अम्मोनी वंशसना नाव
यानामोरे राष्ट्रमां कोनी काढावूत नही.
11 मवाबवर मी न्यायदंड आणसू; तवय त्यासले समजी की मी परमेश्वर शे.

### अदोमनी ईरोधमां भविष्यवाणी

12 प्रभु परमेश्वर सांगस, अदोमनी यहुदयासना सुड लेवानी बुध्दीतीन वर्तन करं,
त्यानी त्यानं सुड लिद् हाई पाप करं.
13 म्हनीसनं प्रभु परमेश्वर सांगस, मी अदोमवर मना हात उगारसू, तठे माणुस
अनी पशु यासनं नाश करसू; तो तेमानापाईन पुढे वैराण करी, ददानापाईन माणसे
तलवारघाई पडतीन.
14 मी आपला लोके इस्राएल यासना हातघाई अदोमना सूड लिसु, मना
आवेशमय रागपरमानं त्या अदोमनी वाट लावतीन; त्यासले मना सुडना अनुभव
यि, आशे प्रभु परमेश्वर सांगस.

### पलिष्टयांसना ईरोधमां भविष्यवाणी

15 ✡ प्रभु परमेश्वर सांगस, पलिष्टीसनी सुड लेवानी कृती करेल शे, मना राग
धरीसनं नाश करानी बुध्दीतीन त्यासनी आपली कायमनी शत्रुनी सुड लेयेल शे.
16 म्हनीसनं प्रभु परमेश्वर सांगस, मी मना हात पलिष्टीसवर उचलसू, करेथना
संहार करसू अनी समुद्रना काठवर ज्या उरेल शेतस त्यासना नाश करसू.

---

✡ **25:15 25:15** यशया 14:29-31

17 त्यासले संतापतीन शिक्षा करीसनं मी त्यासना भयंकर सुड लिसू; मी त्यासवर
सुड उगाडसू तवय त्यासले समजी की मी परमेश्वर शे.

# 26

## सोर शहरना बारामां भविष्यवाणी

1 नंतर अकरावा वरीसले महीनाना सुरवातले, परमेश्वरनं वचन माले प्राप्त व्हयनं
ते हाई शे;
2 "मानवपुत्रा," "सोर शहर यरूशेलमईषयी आशे सांगी राहीना शे, अहा! ज्या
फक्त राष्ट्रसना प्रवेशव्दार आशे व्हतात त्या मुडी जायेल शेतस अनी आते लोकेसना
लोंढा मनीकडे वयेल शे; ती उजाड व्हयी जायेल शे, म्हनीसनं मी आते भरभराट
व्हनार शे;
3 "यामुये प्रभु परमेश्वर सांगस, दख, आये सोर, मी तुनाईरोधमां शे, समुद्र
आपल्या लाटा ढकलसं त्यापरमानं मी तुनावर बराच राष्ट्र ढकलसू,
4 त्या सोरना भितडासना नाश करतीन अनी तिना बुरूज पाडी टाकतीन; मी
तिनावरनी माटी खयडीसनं तिले उघडा खडक करसू.
5 ती समुद्रमां जायी पसारानी जागा व्हयी; मी हाई सांग शे आशे प्रभु परमेश्वर
सांगस, लुट म्हनीसनं ती राष्ट्रसना हातमां लागी.
6 तिन्या भुप्रदेशमां ज्या पोरी शेतस त्या तलवारघाई मरतीन; तवय त्यासले समजी
की परमेश्वर शे."
7 कारण प्रभु परमेश्वर सांगस, दख, मी बाबेलना राजा, राजाधिराज नबुखद्नेस्सर,
याले उत्तरकडतीन घोडा, रथ अनी मोठा दल यासले सोरवर आणसू.
8 भुप्रदेशमासल्या तुन्या पोरीसले तो तलवारघाई मारी; तो तुनाईरोधमां बुरूज
बांधी, मोर्चा रची अनी तुनाईरोधमां ढालना कोट बनाडी.
9 तो तुना तटले आपला आघातयंत्र लायी, आपला हत्यारसघाई तुना बुरूज पाडी
टाकी.
10 त्याना घोडा येवढा येतीन की त्यासनी उडायेल धुयघाई तु झाकाई जाशी;
तटबंदीना नगर फोडीसनं मजार घुसतसं तशे तो तुना वेशीमाईन मजार यि, तवय
स्वार, चाके अनी रथ यासना आवाजघाई तुना तट हालतीन.
11 तो आपला घोडासना टापासघाई तुना बठा रस्ता चेंदी, तो तुना लोकेसले
तलवारघाई मारी, तुना मजबुत खांब जमीनदोस्त करी.

12 त्या तुनी संपत्ती लूटी टाकतीन, तुना माल लुटतीन, तुना तट उद्‌ध्वस्त
करतीन, तुना सुंदर घर पाडी टाकतीन, तुना दगड, लाकूड, माटी वगैरे बठ काही
पानीमां बुडाई टाकतीन.
13 मी तुना गाणसना आवाज बंद करसू, तुना वीणासना सुर परत आयकामां येवावू
नही.
14 मी तुले उघडा खडक करीसनं तुले जायी पसारानी जागा करसू; तुले परत
बांधता येवावू नही, मी परमेश्वर हाई सांगेल शे, आशे प्रभु परमेश्वर सांगस.
15 प्रभु परमेश्वर सोरले सांगस, तुना पतनना आवाजघाई, जखमी व्हयेल
कण्हनाघाई; तुनामां चालेल कत्तलघाई बेटसना थरकाप व्हवावू नही का?.
16 तवय बठा दयावर्दी सरदार आप आपला आसनवरतीन उतरीसनं खाल
येतीन, आपला झगा काढी ठेवतीन; आपला जरतारी कपडा काढी टाकतीन; त्या
भितनामायक कपडा घालीसनं जमीनवर बसतीन; थोडा येळमां त्यासना थरकाप
व्हयी अनी त्यासनाबारामां त्या विस्मय पावतीन.
17 त्या तुनाईषयी शोक करीसनं बोलतीन,

आये किर्तीमान नगरी,

तु जशी समुद्रामाईन निघीसनं बसेल व्हती;

तु समुद्रमां पराक्रमी व्हती;

तु अनी तुना रहीवासी यासना तठेना लोकेसवर वचक राहे, ती तु कशी नष्ट व्हयनीस!

18 तुना शेवटना दिनमां

बेटना थरकाप व्हये;

तुना निर्णयतीन समुद्रमासला व्दिप भयचकीत व्हयेल शेतस.

19 प्रभु परमेश्वर सांगस, मी तुले निर्जन व्हयेल नगरपरमानं ओसाड नगरी करसू
अनी तुनावर खोल सागरनी लोट आणसू भला मोठा जलप्रवाहघाई तुले झाकी
टाकतीन.
20 तवय खडामां जायेल प्राचीन कायना लोकेसकडे तुले खाल टाकीसनं खडामां
जायेलपरमानं प्राचीन कालपायीन ओसाड व्हयेल जागमां पृथ्वीनी मजारनी भागमां
तुले राहावाले लावसू मनजे तु परत बसावू नही; पन मी जीवतसनी भुमीले वैभव
दिसू.
21 लोकेसले दहशत पडी आशे मी तुनं नाश करसू, तु नष्ट व्हशी; तुना शोध
करतीन तरीबी तु कधीच सापडावू नही; आशे प्रभु परमेश्वर सांगस.

# 27

## सोर शहरनीकरता शोकगीत

1 परमेश्वरनं वचन परत माले प्राप्त व्हयनं की,
2 "मानवपुत्रा," "सोरनीबारामां विलाप कर;
3 तिले सांग, प्रभु परमेश्वर सांगस, हे सोरे, समुद्रनी प्रवेशना ठिकानीजोडे बसेल,
बराच व्दिपासनीसंगे राष्ट्रसना व्यापार चालडनारी; तु सांगस,
मी सौंदर्यानी खाण शे.
4 तुनी सीमा समुद्रघाई वेष्टन घालेल शेतस;
बांधनारासनी तुले सुंदर बनाडेल शे.
5 त्यासनी सनीरना सरुघाई तुनी फया कर्‍यात,
तुनाकरता डोलकाठी व्हावाले पाहिजे म्हनीसनं त्यासनी लबानोनना गंधसरु आणं.
6 त्यासनी तुनी वल्ली बाशानमासला आल्लोनना झाडसघाई करी;
तुना बसाना बाक बेटवरना बाक्स लाकुडघाई करीसनं
हातीना दातघाई जडेल व्हतात.
7 तुनी शीड मिसर देशमाईन आणेल
वेलबुटीदार उत्तम तागना व्हतात;
तुले ती निशानदाखल व्हती;
तुना छत अलीशा बेटमासला निया अनी
जांभया रंगना कपडाना व्हतात.
8 सीदोन अनी अर्वद आठेना रहिवासी तुना वल्हेकरी राहेत,
हे सोरे, तुनामां चतुर माणसे व्हतात, त्या नाविक व्हतात.
9 गबालना वडील अनी कुशल कारागीर
तुनी जहाजनी तुटफुट दुरुस्त करी राहेत;
समुद्रमासला बठा जहाज अनी त्यासना नावाडी
तुना मालनी देवघेव कराकरता तुनासंगे राहेत.
10 तुन सैन्यसमां पारसी, लुदी अनी पुटी हया तुना लढाई करनारा व्हतात; त्या
तुनामां आपल्या ढाली अनी शिरस्राण टांगेत; त्या तुला तेजस्वी करेत.
11 अर्वदना माणसे तुना सैन्यसनीसंगे तुना तटवर आजुबाजूले राहेत; तुना बुरुजवर
शुर माणसे राहेत; त्या तुना तटवर चारीमेर आपल्या ढाली टांगीसनं तुले सौंदर्ययुक्त
करेत.

12 "सर्वा परकारनं माल तुनाजोडे भरपुर राहे त्यामुये तार्शीश तुनासंगे व्यापार
करे; तुना मालना मोबदला त्या पैसा, लोखंड, कथील अनी शिसा देयेत.
13 यावान, तुबाल अनी मेशेख हया तुनासंगे व्यापार करेत; तुना मालना मोबदला
म्हनीसनं त्या तुले माणसे अनी पितयना भांडे देयेत.
14 तोगार्माना वंश तुना मालना मोबदला म्हनीसनं तुले घोडा, स्वारीना घोडा
अनी खेचर देयेत.
15 ददानी लोके तुनासंगे व्यापार करेत; बराच व्दिपे त्यासले व्यापारकरता
सोयीना राहेत; त्या तुना मालना बदलामां तेल हत्तीसना दात शिंग अनी अबनुस
देयेत.
16 तुना कारागीरना पदार्थ बहुविध राहावामुये अरामी लोके तुनासंगे व्यापार
करेत; त्या तुना मालना बदलामां तुले पाच, जांभया रंग, तागना वेलबुटिदार उत्तम
कपडा, प्रवाळ अनी मानके देयेत.
17 यहुदा अनी इस्राएल देशमासला लोके तुनासंगे व्यापार करेत; त्या तुना मालना
बदलामां तुले मिन्नीथाना गहू, मेवामिठाई, मध, तेल अनी उद देयेत.
18 तुना कारागीरना माल बराच राहावामुये अनी बठा परकारनं माल तुनाजोडे
बराच राहावामुये दिमिष्क तुनासंगे व्यापार करेत अनी मालना बदलामां तो तुले
हेल्बोनना द्राक्षरस अनी पांढरी लोकर देये.
19 वदान अनी यावानना लोक या तुना माल लिसन तुले सुत देयेत; पोलाद, तज
अनी अगरु हाई तुना व्यापारना मालपैकी राहे.
20 ददान तुनासंगे व्यापार करीसनं तुले स्वारीना साज पुराये.
21 अरबस्तान अनी केदारना सर्वा सरदार व्यापारनीबारामां तुनी मुठीमां राहेत;
कोकरा, एडका अनी बोकडया यासना त्या तुनासंगे सौदा करेत.
22 शबा अनी रामा आठेना व्यापारी तुनासंगे व्यापार करेत; त्या तुना माल लिसनं
त्या तुले परतेक परकारनं मसाला, जवाहीर अनी सोना देयेत.
23 हारन, कन्ने, एदेन, शबा, अश्शुर अनी किल्मद आठेना व्यापारी तुनासंगे
व्यापार करेत,
24 त्या तुना माल लिसनं उत्तम कपडा, जांभया अबू वेलबुटीदार झगा, उचा
कपडाना पेठा अनी वयेल टिकावू दोऱ्या हया व्यापारन्या वस्तु तुले देयेत.
25 तार्शीशना जहाज तुना मालनी ने आन करनारा जनु काय काफेलाच व्हतात;
भर समुद्रमां तु भलती समृध्द
अनी वैभवशाली व्हयनी.

26 तुना वल्हेकरासनी तुले खोल पानीमां लयी गयात;
पुर्वकडला वारानी तुले भर समुद्रमां मोडी टाकं;
27 तुना धन, तुना माल,
तुना व्यापारीसना जिन्नत, तुना नावाडी, तुना खलाशी,
तुना फुटतुट दुरूस्त करनारा,
तुना मालनी लेव-देव करनारा,
तुना बठा सैनिक, तुनासंगेना बठा माणसे
तुना नि:पातना येयले भर समुद्रमां पडनात.
28 तुना खलाश्यासनी मारेल आरोयीना आवाजघाई
तुनी आसपासनी जमीन हादरी राहीनी शे.
29 सर्वा वल्हेकरी, खलाशी अनी समुद्रवर प्रवास करनारा
सर्वा नावाडी आप आपल्या नावा सोडीसनं किनारवर उभा राहेल शेतस.
30 त्या तुना परिस्थीतीमुये लांब हेलकावा दिसनं दु:खमां रडी राहीना शेतस;
त्या आपला डोकावर धुळ टाकी राहीना शेतस अनी धुळमां लोळी राहीना शेतस.
31 त्या तुनामुये डोका भादरीसनं,
कंबरले गोंटी गुंडायी राहीना शेतस
अनी मनमां दु:खी व्हयीसनं तुनाकरता जोरमां विलाप करी राहीना शेतस.
32 त्या शोकाकुल व्हयीसनं तुनाईषयी विलाप करीसनं बोलतसं,
सोरेपरमानं, समुद्रमां गडप व्हयेल सोरेपरमानं,
कोनीतरी दशा व्हयेल शे का?
33 जलमार्गतीन तुना माल जाये येय
तवय तु बराच राष्ट्रसनी भुक भागाडी,
तु आपला विपुल मालघाई अनी सौदाघाई
जगमासला राजासले श्रीमंत करी टाकं व्हतं.
34 समुद्रना लाटासघाई तु खोल पानीमां फुटनी
तवय तुना माल
अनी तुनी बठी मंडयी तुनासंगे बुडनी.

35 "समुद्रना काठना बठा लोके तुले दखीसनं विस्मित व्हयी जायेल शेतस;
त्यासना राजा थरथर कापी राहीना शेतस; त्यासना तोंडे काळं पडी जायेल शेतस.
36 राष्ट्रसमासला व्यापारी तुना धिक्कार करतसं; तुनी दशा दखीसनं लोकेसले
दहशत पडेल शे; तु कायमनी नष्ट व्हयी जायेल शे."

# 28

### सोरना राजानीबारामां भविष्यवाणी

1 परमेश्वरनं वचन माले प्राप्त व्हयनं की,
2 "मानवपुत्रा," "सोरेना अधिपतीसले सांग, प्रभु परमेश्वर सांगस, तुनं हृदय
उन्मत व्हयीसनं तु सांगस, मी देव शे, भर समुद्रमां मी देवना आसनवर बठेल शे, पन
तु देव नही शे, माणुस शे, आपलं मन देवनामायक शे आशे आव तु आणी राहीना शे.
3 दख, तु दानीएलपेक्षा तु बुध्दीमान शे; कोनतीच गुप्त गोष्ट लोकेसले तुनापाईन
दपाडता येस नही;
4 तु आपली आकलतीन अनी चतुरतीन धन जमा करं अनी आपला भांडारमां
सोनं चांदीना साठा करात;
5 तु आपली आकलनी जोरवर व्यापार करीसनं आपलं धन वाढावं; हाई तुना
धनघाई तुनं हृदय उन्मत व्हयी जायेल शे,
6 हयाकरता प्रभु परमेश्वर सांगस, आपलं चित्त देवना चित्तनामायक शे आशे तु
आव आणी राहीना शे.
7 म्हनीसनं दख, मी तुनावर परका लोके आणसु; तुनावर दुसरा राष्ट्रसन उग्र
लोकेसले आणसू; तुनं आकलनं सुंदरताना त्या तलवारघाई उपसतीन अनी तुनं तेज
भ्रष्ट करतीन.
8 त्या तुले खडामां उतारतीन, भर समुद्रमां वध पावनारा मृत्युनामायक तुना मृत्यु
व्हयी.
9 तु सोताले वधनारासनीसमोर, मी देव शे आशे बोलशी का? घायाळ
करनारासनी हातमां सापडना तर तु देव नही शे, माणसु शे.
10 बेसुंती मरतसं तशे तु परदेशीना हातघाई मरशी; हाई म्हनं म्हणन शे, आशे
प्रभु परमेश्वर सांगस.

### सोर राजानं पतन

11 परत परमेश्वरनं वचन माले प्राप्त व्हयनं की,
12 "मानवपुत्रा," "सोरेना राजानीबारामां विलाप करीसनं त्याले सांग; प्रभु
परमेश्वर सांगस, तु पुर्णतानी मुद्राच शे; तु ज्ञानपुर्ण अनी सर्वांगसुंदर शे.
13 देवना बाग एदेन आठे तु व्हता; अलाक, पुष्कराज, हिरा, लसणा, गोमेद,
यास्फे, नीलमणी, पाच, माणिक अनी सोनं आशे बराच परकारना जवाहीर तुना
आंगभर व्हतात; खंजिर्‍या अनी बासर्‍या यासना कसब तुना आठे चालेत; तुले
निर्माण करं त्याच दिन त्यासनी योजना व्हयनी.

14 तु पाखर घालनारा अभिषीक्त करुब व्हता; मी तुनी तशी योजना करी व्हती;
तु देवना पवित्र पर्वतवर व्हता; तु आगनामायक झगझगनारा पाषाणनमाईन फिरत
राहे.
15 तुले निर्माण करं त्या दिनपाईन अधर्म तुनामां दखास तोपावोत तुनी
चालचलणुक यथायोग्य व्हती.
16 तुना व्यापार मोठा राहावामुये तुना मनमां अपकारबुध्दी घुशीसनं तु पाप करं;
म्हनीसनं मी तुले भ्रष्ट समजीसनं परमेश्वरना पर्वतवरतीन ढकली दिद्. हे पाखर
घालनारा करुबा! त्या आगनामायक झगझगनारा पाषाणमाईन काढीसनं मी तुनं
नाश करी टाकं.
17 तुना सौंदर्याना अभिमानतीन तुनं हृदय उन्मत व्हयनं; तुना वैभवतीन तुनी
बुध्दी भ्रष्ट व्हयनी; मी तुले जमीनवर आपटं; राजानी तुना तमाशा दखाले पाहिजे
म्हनीसनं त्यानामोरे तुले टाकं;
18 खोटा व्यापार करीसनं तु बराच पाप करात, त्यासनाघाई तु आपला
पवित्रस्थान विटाळं म्हनीसनं तुनामाईन आग निघीसनं तुले खाई टाकी, आशे मी
करेल शे, अनी तुले दखनारासनी नजरनासमोर मी पृथ्वीवर तुनी राखरांगोळी करेल
शे.
19 राष्ट्रसमां तुना वयखना बठा तुले दखीसनं विस्मय व्हयी जायेल शेतस; तुनी
दशा दखीसनं लोकेसमां दहशत पडेल शे, तु कायमना नष्ट व्हयेल शे.

## सिदोनना ईरोधमां भविष्यवाणी

20 मंग परमेश्वरनं वचन माले प्राप्त व्हयनं की
21 मानवपुत्रा, सीदोनकडे आपल तोंड फिराईसनं तिनाईरोधमां संदेश देय;
22 तिले सांग, प्रभु परमेश्वर सांगस दख, हे सीदोन, मी तुनाईरोधमां शे, अनी
तुनामां मी आपला प्रताप गाजाडसू; मी तिले न्यायदंड करसू अनी तिनामां मी पवित्र
ठरसू, तवय त्यासले समजी की मी परमेश्वर शे.
23 मी तिनामां मरी धाडसू, तिना रस्तावर रंगतना सडा घालसू; तिनावर
चारीमेरकडतीन तलवार चाली अनी लोके घायाळ व्हयीसनं तिनामां पडतीन, तवय
त्यासले समजी की परमेश्वर शे.

## इस्राएलले आशिर्वाद

24 मंग इस्राएल घराणाना आसपासना व्देष्टासपाईन कोनी त्यासले बोचनारा काटा
अनी टोचनारी नांगी आशी उरावू नही, तवय त्यासले समजी की मी परमेश्वर शे.

25 प्रभु परमेश्वर सांगस, इस्राएल घराणं ज्या ज्या देशमां पांगेल शे तठेन मी
त्यासले एकजागे करसू अनी विधर्मी राष्ट्रासनीसमोर त्यासनामां पवित्र ठरी; मंग जो
देश मी आपला सेवक याकोब याले दिद् तठे त्या वस्ती करतीन.
26 त्या तठे निर्भय राहातीन, त्या घरं बांधतीन, द्राक्षना मया लावतीन; अनी
त्यासना आजुबाजूना त्यासना व्देष्टयासले मी न्यायदंड करसू तवय त्या निर्भयतीन
राहातीन; मंग त्यासले समजी की मी परमेश्वर त्यासना देव शे.

# 29

## मिसरी देशानाईरोधमां भविष्यवाणी

1 दहावा वरीसले दहावा महीनामां बारावा दिनले परमेश्वरनं वचन माले प्राप्त
व्हयनं की
2 मानपुत्रा मिसर देशना राजा फारो यानाकडे आपलं तोंड करीसनं त्यानाईरोधमां
अनी बठा मिसर लोकेसना ईरोधमां संदेश दे;
3 त्यानासंगे बोल; त्यासले सांग; प्रभु परमेश्वर सांगस, दखा, हे मिसर देशना
फारो राजा, आपली नदीमां पडी राहेल मोठया मगरी, तु जे म्हणसं की नदी मनी शे,
मी ती सोताकरता निर्माण करेल शे, त्याकरता मी तुनाईरोधमां शे.
4 मी तुना जबडामां गय टोचसू, मी तुन्या नदीमासला मासा तुना खवलासले
चिटकाडसू, मी तुले तुना खवलासले चिटकेल नदीमासला मासासनीसंगे नदी वढी
काडसू.
5 मी तुले अनी तुना नदीमासला सर्वा मासासले सोडी दिसू; तु उघडा मैदानमां
पडी राहाशी; तुले कोनी उचली आणावू नही, नहीते कोनी तुनी जोडजाड करावू
नही तर जंगलमासला पशुसले अनी आकासमासला चिडासना तु खादय व्हशी आशे
मी करसू.
6 ✡तवय मिसर देशमासला बठा रहीवासीसले कयी की
मी परमेश्वर शे. कारण त्या परमेश्वर घराण्याला बोरुनी काठी आशे व्हयेल
शेतस.
7 जवय त्यासनी तुले हातघाई धर तवय तु चिरीसनं त्या सर्वासना खांदा फोडी
टाकात; त्या तुनावर टेकेल व्हतात तवय तु मुडी गया अनी बठासनी कंबरा खची
गयात.
8 म्हनीसनं प्रभु परमेश्वर सांगस, दखा, मी तुमनावर तलवार आणसू अनी
तुमनामाईन माणुस अनी पशू यासना नाश करसू.

✡ **29:6 29:6** यशया 36:6

9 मिसर देश ओसाड अनी विरान व्हयी तवय त्यासले समजी की मी परमेश्वर
शे; कारन तो बोलना, नदी मनी शे, मी ती तयार करेल शे.
10 तर दख, मी तुन्या नदयासवर उठसू; मी मिग्दोलपाईन ते सवेनेपावोत, कूशनी
सीमापावोत, मिसर देश ओसाड अनी उजाड करसू.
11 माणुसना पाय त्याले लागावू नही, पशुना पायना त्याले स्पर्श व्हवावू नही;
चायीस वरीस तठे कोनी वस्ती करावू नही.
12 उजाड व्हयेल देशमां मी मिसर देशसले उजाड करसू; उजाड व्हयेल नगरमां
मी त्यासना नगर चायीस वरीस उजाड करसू, मी मिसऱ्यासले राष्ट्रसमाईन विखरसू;
त्यासले देशोधडीस लावसू.
13 प्रभु परमेश्वर सांगस की चायीस वरीस सरावर मिसरी लोकेसनी ज्या देशमां
पांगापांग व्हयेल शे तठेन मी त्यासले गोया करसू,
14 मी मिसर देशमासला बंदीवानसे पलटावसू, मी पथ्रोस देशमा त्यासनी
जन्मभुमीमां त्यासले परत आणसू; तठे त्यासना एक हलका राज्य हालका राज्य
व्हयी.
15 सर्वा राष्ट्रसमां ते हलकं व्हयी; ते आतेपावोत दुसरा राष्ट्रसवर वरचढ व्हवावू
नही, मी त्यासले अल्प करी ठेवसू मनजे त्या दुसरा राष्ट्रसवर सत्ता करावूत नही.
16 तो यानामोरे इस्राएल घराणाना आधार व्हवावू नही; त्यानाकडे त्यानं मन गये
तर त्याले त्याना पापनी आठवन यि; तवय त्याले समजी की मी प्रभु परमेश्वर शे.

## नबुखद्रेस्सर राजा मिसर देशना पराभव करसं

17 परत सत्तावीसवा वरीसले, पहिला महीनानी सुरवातले परमेश्वरनं वचन माले
प्राप्त व्हयनं की,
18 मानवपुत्रा, बाबेलना राजा नबुखद्रेस्सर यानी सोरेला वेढा घालं तवय त्यानी
आपला सैनिकसले भारी कष्ट कराले लावं; सर्वासनी डोकानी टकली पडनी,
खांदयासना सालटा निघनात, तरी त्यानी जो खटाटोप करं त्याना त्याले नहिते त्याना
सैनिकसले योग्य मोबदला मियना नही.
19 यामुये प्रभु परमेश्वर सांगस, दखा, बाबेलना राजा नबुखद्रेस्सर याले मी मिसर
देश दिसु; तवय तो त्याना समुदायले हिसकाई लि, त्यानी लुटेल तो लुटी, त्यानी
हिसकायेल तो हिसकाई, आशे त्याना सैन्यसले मोबदला भेटी.
20 त्याना श्रमना मोबदला म्हनीसनं मी त्यासले मिसरन मुलूख दिसु; कारन
त्यासनी हाई श्रम मनाकरता करेल शे, आश प्रभु परमेश्वर सांगस.

21 त्या दिन मी इस्राएल घराणामां सिंग उगी आशे मी करसू, अनी त्यासनामां
तुनं तोंड उघडी आशे करसू, तवय त्यासले समजी की मी परमेश्वर शे.

# 30

## मिसर देशले परमेश्वरना दंड

1 परत परमेश्वरनं वचन माले प्राप्त व्हयनं की,
2 "मानवपुत्रा," संदेश दिसनं सांग, प्रभु परमेश्वर सांगस
तो दिन, आशे हाहाकार करा.
3 कारन दिन जोडे यि लागेल शे, परमेश्वरना दिन यि लागेल शे;
तो ढगना दिन राही; तो अधर्मीसना शासन दिन राही;
4 तवय मिसर देशवर तलवार यि,
लोकेसना वध व्हयीसनं मिसरमां पडतीन,
तवय कूशमासला लोकेसले वेदना व्हतीन;
मिसर समुदाय हिसकावामां यि;
त्याना पाय मोडी टाकतीन.
5 कुशी, पुटी, लुदी, सर्व मिश्र जाती अनी कुबी, अनी त्यासनासंगेना करारमदार
करेल देशना लोके त्यासनासंगेच तलवारघाई पडतीन.
6 प्रभु परमेश्वर सांगस, मिसर देशले आधार देनारा लोके पडतीन, आशे प्रभु
परमेश्वर सांगस,
7 त्या विरान देशमां उद्ध्वस्त व्हयीसनं पडतीन, उजाड नगरमां त्यासना नगरे
उद्ध्वस्त व्हयीसनं पडतीन.
8 मी मिसरले आग लावसू अनी त्याना बठा मदतनीस नष्ट व्हतीन; तवय त्यासले
समजी की मी परमेश्वर शे.
9 "त्या दिन त्या नक्कीच कूशी लोकेसले घाबरावाकरता मनाकडना जासुद
जहाजमां बशीसनं जातीन; मिसरवर प्रसंग वना त्यापरमानं त्यासले वेदना व्हतीन,
कारन दख, ती येय यि राहीनी शे.
10 प्रभु परमेश्वर सांगस, बाबेलना राजा नबुखद्नेस्सर याना हातघाई मी मिसरना
लोकसमुदाय नाहीसा करसू.
11 तो अनी बठा लोकेसमां भयंकर आशे त्याना लोके हयान देशना नाश कराले
आणसू; त्या मिसरवर आपल्या तलवारी उपसीसनं वध करेल माणसासना सर्वा देश
भरी टाकतीन.

12 मी नद्या कोयडया करसू, हाई भुमी ईकीसनं दुष्टसनी हातमां दिसू, अनी
परकासनी हातघाई हाऊ देश अनी तठे सर्व काही नासधुस करसू; मी परमेश्वर हाई
बोलेल शे.

13 प्रभु परमेश्वर सांगस, मी नोफ शहरना दैवतसना नाश करसू; मुर्त्या नष्ट करसू;
अनी मिसर देशमासला कोनीच अधिपती राहावावू नही आशे करसू; मिसर देश
दहशतघाई भरी टाकसू.
14 मी पथ्रोस शहर उजाड करसू, सोआनसले आग लावसू, नो नगरले न्यायदंड
दिसू.
15 मिसरना दुर्ग जो सीन शहर त्यावर मी आपला क्रोधाग्नीना वर्षाव करसू अनी
नो आठेना लोके समुदायना नाश करसू.
16 मी मिसरले आग लावसू; सीन वेणा दी; नो छिन्नभिन्न व्हयी; नोफ शहरवर
भरदिनमां वैरी उठतीन.
17 आवेन अनी पि-बेसेथ आठेना तरूण माणसे तलवारघाई पडतीन; हया नगर
जिकामां येतीन.
18 मिसरीसनी घालेल जोखड मी मोडी टाकसू अनी त्यासना पराक्रमनं गर्व
जिरी तवय तहपन्हेस आठे दिनमांच आंधार व्हयी, त्या ढगघाई जाकाई जातीन,
त्यान्या पोरी बंदीवान व्हयी जातीन.
19 या परकारं मिसरमां न्यायदंड करसू; तवय त्यासले समजी की मी परमेश्वर
शे."

## मिसर देशनी तुटेल शक्ती

20 तवय अकरावा वरीसले पहिला महीनाना सातवा दिनले परमेश्वरनं वचन
माले प्राप्त व्हयनं की,
21 मानवपुत्रा, मिसरी राजा फारो याना भुज मी मोडेल शे; दख, त्यासले परत
तलवार धरानी शक्ती येवाले पाहिजे म्हनीसनं त्यासले औषध उपचार करीसनं पट्टी
बांधानी ती कोनीच बांधी नही,
22 यामुये प्रभु परमेश्वर सांगस, दखा, मी मिसरी राजा फारो याणा ईरोधमां शे;
त्याना शाबूत अनी मोडका आशे दोनी हात तोडी टाकसू; त्यानी हातमासली तलवार
गयी जाई आशे मी करसू.
23 मी मिसर्‍यासले राष्ट्रासमां पांगाडसू, त्यासले दशोधडीले लावसू,

24 मी बाबेलना राजानं भुज बळकट करसू, मी मनी तलवार त्याना हातमां दिसू;
पन मी फारोनं भुज आशे मोडसू की एखादा भयंकर घायाळ व्हयेल माणुसपरमानं
तो त्यानामोरे आक्रोश करी.
25 मी बाबेलना राजानं भुज बळकट करसू, अनी फारोनम भुज गळतीन; मी
मिसर देशवर उगाराकरता बाबेलना राजानी हातमां तलवार दिसू तवय त्यासले
समजी की मी परमेश्वर शे.
26 मी मिसऱ्यासले राष्ट्रसमां पसारसू, त्यासले देशोधडीले लावसू; तवय त्यासले
समजी की मी परमेश्वर शे.

# 31

## मिसरनी तुलना देवदारनी झाडनीसंगे व्हसं

1 अकरावा वरीसले, तिसरा महीना सुरुवातले परमेश्वरनं वचन माले प्राप्त व्हयनं
की
2 "मानवपुत्रा," मिसर देशना राजा अनी
त्याना लोकसमुह यासले ईचार की
तु मोठापनतीन कोनामायक शे?
3 दख, अश्शुर हाऊ लबानोना एक गंधसरु राहीसनं
त्याले सुंदर फांदया फुटन्यात,
त्यानी सावली दाट व्हयनी, तो उचा वाढीसनं त्याना शेंडा मेघमंडळले जायीसनं
भिडनं.
4 पानीनी त्याले पोसं, जलाशयनी त्याले वाढावं,
तठेन निघनारा प्रवाह लागवड करेल
सर्वा मळासमां खेळत राहे;
अनी त्याना पाट जंगलमा सर्वा झाडसले जायी पोहचेत.
5 जंगलमासला दुसरा झाडसपेक्षा त्यानी उची मोठी व्हयनी,
पानी बराच राहावामुये
त्याले फाटा बराच फुटनात अनी त्यान्या फांदया लांब पसरन्यात.
6 आकासमासला बठा चिडा त्यासना फाटाफाटासमां खोपा करेत;
त्यासना खांदाना आधारतीन सर्वा पोऱ्या व्हतात,
त्यासनी सावलीमां मोठमोठला राष्ट्र वस्ती करी राहेत.
7 असं तो मोठा व्हयीसनं त्याले लांब लांब फाट फुटनात
म्हनीसनं तो भलता सुंदर दखाये,

कारन त्याना* मुय मोठा तलावनाजोडे व्हतात.
8 देवना बागमासला देवदारूनीघाई त्याले झाकता जमे नही;
सुरूऩ्या फांदया त्यान्या तोडना नही व्हतात.
अर्मोनवृक्ष त्याना शाखाना तोडनं नही व्हतं;
देवना बागमासला कोणतच झाड त्यानी बराबरी करनारा नही व्हतात.
9 मी त्याले असंख्य फाटया ते एवढ सुंदर व्हयनं की
देवना एदेन बागमासला सर्वा झाडे त्याना हेवा करेत.
10 त्यामुये प्रभु परमेश्वर सांगस, त्यानी सोतालेच उच करेल शे, आपला शेंडाघाई
त्यानी मेघमंडयीले भेदेल शे; तो उचा व्हवामुये त्यानं मन उन्मत व्हयेल शे.
11 म्हनीसनं मी त्याले एक ताकदवान राष्ट्रनी हातमां दिसू.तो खात्रीतीन त्याना
समाचार लि; त्याना दुष्टतामुये मी त्याना त्याग करेल शे.
12 दुसरा राष्ट्रसमासला परका लोकेसनी त्याले भयंकर छेदी टाकेल शे; अनी
त्याले फेकी दिद; त्यान्या फाटया पर्वतवर अनी बठा खोरामां पडेल शेतस; देशना
बठा नालानालासमां त्यान्या फाटया मुडीसनं पडेल शेतस; पृथ्वीवरना बठा राष्ट्र
त्यानी सावलीमाईन जायेल शेतस.
13 त्या पडेल झाडसपान आकासमासला चिडा जायीसनं बसतसं; बठा वनपशु
त्यान्या फाटयासमां येतस.
14 पानीनाजोडे लायेल कोनतबी झाडनी आपली उचीमुये गर्व कराले नको;
आपला शेंडाघाई मेघमंडयले भेदाले नको, पानीनी पोसेल झाडनी आपली उचीमुये
सोतावर ईस्वास ठेवानं नही; म्हनीसनं हाई घडेल शे, कारन त्या बठासले मृत्युना,
अधोलोकना स्वाधीन करामा येयल शे; ज्या खडामां मानवपुत्र जातसं तठे त्यासलेबी
जावाले लायेल शे.
15 प्रभु परमेश्वर सांगस, ज्या दिन तो अधोलोकी गया त्या दिन मी विलाप
कराडं; त्यानाकरता मी जलनिधी झाक, त्यानं प्रवाह बंद करं, महापुर रोखात,
त्यासनाकरता मी लबानोनले काय ठिक्कर करी टाक; त्यानाकरता जंगलमासला
सर्वा झाडं म्लानवदन व्हयनं.
16 खडामां जानारासनीसंगे मी त्याले अधोलोकी ढकली दिद् तवय त्याना पडानं
आवाजघाई मी राष्ट्रसले थरथर कापाडं; तवय पृथ्वीना मजारनी भागमासला एदेनना
बठा झाडे, पानीमां पोसेल अनी अति सुंदर आशे लबानोन झाड समाधान पावनात.

* **31:7 31:7**

17 राष्ट्रसमाईन त्यानी सावलीमां बसनारा त्याना सहाय्यक त्याबी त्यासनासंगे
तलवारघाई ठार करेलसमां अधोलोकी गयात.
18 तु वैभवतीन अनी मोठापनतीन ऐदेनमासला झाडसमाईन कोणा तोडीना शे?
तुले तर एदेनमासला झाडेसनीसंगे अधोलोकमां ढकलतीन अनी तलवारघाई ठार
व्हयेलसनीसंगे बेसुंतीसमां त्या पडी राहातीन. फारो अनी त्याना लोकसमुदाय
यासनी आशी गत व्हयी, आशे प्रभु परमेश्वर सांगस.

# 32

## मिसर राजानी तुलना मगरनीसंगे

1 बारावा वरीसले, बारावा महीनाना पहिला दिन परमेश्वरनं वचन माले प्राप्त
व्हयनं की
2 मानवपुत्रा, मिसर देशना राजा फारो यानाबारामां विलाप कर; त्याले सांग,
राष्ट्रासमां तुले सिंहनी ऊपमा देयेल व्हती, तरी तु महानंदमासला मगरनामायक शे;
तु तुन्या नदीसमां उसळया मार्‌यात; तुना पायघाई पानी गढूळ करं; अनी त्यासन्या
बठया नदया घाण कर्‌यात.
3 प्रभु परमेश्वर सांगस, मी बराच राष्ट्रासकडतीन तुनावर मना जायी टाकसू; त्या
तुले मना जायासघाई बाहेर वढी काढतीन.
4 मी तुले जमीनवर सोडी दिसू; उघडा मैदानमां तुले फेकी दिसू, आकाशमासला
बठा चिडा तुनावर बसतीन आशे मी करसू, सर्वा पृथ्वीवरना वनपशूसना तुना
मांसघाई तृप्त करसू.
5 मी पर्वतवर तुना मांस ठेवसू; तुना धिप्पाड शरीरघाई खोरा भरसू,
6 तुना रक्तप्रवाहघाई देश बुडाई टाकसू; तो पर्वतले जायी लागी, बठा नदीनाला
तुना रंगतघाई भरतीन.
7 ✡मी तुले नष्ट करसू तवय मी आकास झाकसू अनी तठेना बठा निस्तेज करसू;
मी सुर्य ढगसघाई झाकी टाकसू, चंद्र प्रकास देवावू नही.
8 मी आकासमासला बठा तारा तुनावर निस्तेज करसू; मी तुना देशवर अंधारी
आणसू, आशे प्रभु परमेश्वर सांगस.
9 ज्या राष्ट्र, ज्या देश तुना वयखना नहीत, तठे मी तुना नि:पात करानी बातमी
प्रसिध्द करसू, तवय मी बराच राष्ट्रसन मन भ्याई जातीन.

✡ **32:7 32:7** यशया 13:10; मत्तय 24:32; मार्क 13:24-25; लूक 21:25; प्रकटीकरण
6:12-13; प्रकटीकरण 8:12

10 बराच राष्ट्रे तुले दखीसनं भयचकीत व्हतीन आशे मी करसु; मी मनी तलवार
त्यासना राजासनीसमोर परजसु, तवय त्या थरथर कापतीन; तुना पतनना दिनले
आपला जिव भ्यायीसनं त्याच येयले थरकाप व्हयी.
11 कारन प्रभु परमेश्वर सांगस, बाबेलना राजानी तलवार तुनावर यि.
12 वीरसनी तलवारघाई मी तुना लोकसमुदाय पाडसु; त्या सर्वा राष्ट्रसमासला
माणसे भयंकर शेतस; त्या मिसरना गर्व हरन करतीन, त्यासना सर्वा लोकसमुहना
विध्वंस व्हयी.
13 महाजलनाजोडे त्यासना सर्वा गुरढोरसना नाश करसु; यानामोरे कोनताच
माणुसना पायघाई अनी जनावरसना खुरसघाई तीं गढूय व्हवावू नही.
14 तवय मी त्यासना जलाशय स्वच्छ करसु, त्यासन्या नदया तेलपरमानं वाहत्या
करसु; आशे प्रभु परमेश्वर सांगस.
15 मी मिसर देशमासला बठा रहीवाशीसले मारीसनं त्या देशना जंगल करसू
अनी देशमासला सर्वकाही नाहीसं करीसनं तो उजाड करसु, तवय त्यासले समजी
की मी परमेश्वर शे.
16 हाई विलापगीत लोके शोकपुर्वक म्हनतीन; राष्ट्रसन्या पोरी शोकपुर्वक
म्हनतीन; मिसर देश अनी त्यामासला सर्वा लोकसमुह याकरता ते शोकपुर्वक
म्हनतीन. आशे प्रभु परमेश्वर सांगस.

### मरेलसना संसार

17 बारावा वरीसले, महीनानी पोर्णिमेले परमेश्वरनं वचन माले प्राप्त व्हयनं की;
18 मानवपुत्रा, मिसरी लोकसमुहकरता विलाप कर; त्यासले, मिसरन्या पोरीसले
अनी गाजेल राष्ट्रसन्या पोरीसले खडामां उतरनारसनीसंगे अधोलोकमां ढकली देय.
19 तु सुंदरतातीन कोनीपेक्षा वरचढ शे?
चाल, खाल उतर,
अनी बेसुंत्यासनीसंगे जायीसनं पड.
20 तलवारघाई वध करेलसनीसंगे त्या जायी पडतीन, तिले तलवारनी हवाली
करेल शे; तिले अनी तिना बठा समुहले वढी लयी जावा.
21 वीरसमां ज्या प्रमुख शेतस त्या त्यासनासंगे अनी त्यासना सहाय्यकर्तासनीसंगे
अधोलोकमाईन बोलतीन; त्या खाल उतरेल शेतस; हया बेसुंती तलवारघाई वध
करीसनं तठे पडेल शेतस.
22 "अश्शुर अनी त्याना बठा समुदाय तठे शे; त्यासन्या कबरा त्यासन्या
कबरासनी आजुबाजूले शेतस; त्या बठा तलवारघाई वध करीसनं तठे पडेल शेतस.

23 त्यासन्या कबरा खडामां तयले शेतस; त्यासन्या कबरासनी आजुबाजूले
त्यासना समुदाय शे; जीवतसनी भुमीले ज्यासनी दहशत घाली त्या बठा वध व्हयेल
शेतस, तलवारघाई पडेल शेतस.

24 "तठे एलाम शे अनी त्यानी कबरनी आजुबाजूले त्याना बठा समुदाय शे; त्या
जीवतसनी भुमीले दहशत घालेत त्या बठा वध व्हयेल शेतस, त्या बेसुंती अधोलोकी
जायेल शेतस; खडामां उतरनारासनीसंगे त्या अप्रतिष्ठा व्हयेल शेतस.
25 त्यासनी त्यानाकरता अनी त्यान्या सर्वा लोकसमुदायकरता वध करेलसमां
शय्या तयार करले शे; त्यासन्या आजुबाजूले त्यासन्या कबरा शेतस; त्या बठा
बेसुंती लोके तलवारघाई ठार व्हयेल शेतस, त्यासनी जीवतसनी भूमी दहशतघाई
भरी म्हनीसनं खडामां उतरनारासनीसंगे त्या अप्रतिष्ठा पावेल शेतस. वध करेलसमां
त्यासले ठेयेल शे.

26 "तठे मेशेख, तुबाल अनी त्याना बठा समुह शेतस; त्यासन्या आजुबाजूले
त्यासन्या कबरा शेतस; त्यासनी जीवतसनी भूमी दहशतघाई भरी म्हनीसनं त्या
बठा बेसुंती लोके तलवारघाई ठार व्हयेल शेतस,
27 बेसुंती लोकेसमाईन ज्या वीर समरांगणमां पडीसनं शस्रासह अधोलोकी गयात
अनी ज्यासन्या तलवारी त्यासना उसाखाल ठेवामां उन्यात आशेसनासंगे पडी नही
राहीनात का? कारन जीवतसनी भुमीमां त्या वीरसले दहशत घालेत, म्हनीसनं
त्यासना पाप त्यासना हाडमां शेतस.

28 तु बेसुंती लोकेसमां भंग व्हशी अनी तलवारघाई वध करावर तुबी पडी
राहाशी.

29 तठे अदोम, त्याना राजे अनी त्याना सरदार हयाबी शेतस; त्या शुर राहीसनं
त्यासले तलवारघाई ठार करताचबरोबर ठेयेल शे; त्यासले बेसुंती लोकेसनीसंगे
अनी खडामां उतरनाऱ्यासनीसंगे ठेयेल शे.

30 उत्तरकडला सरदार अनी वध करेलसनीसंगे उतरीसनं जायेल सीदोनी हया
सर्वा तठे शेतस, त्यासना शौर्यमुये त्यासना वचक बसेल व्हतं तरी त्यासनी अप्रतिष्ठा
व्हयनी; त्य बेसुंती माणसे तलवारघाई वध करताचबरोबर पडेल शेतस अनी खडामां
उतरनारासनीसंगे लजित व्हयेल शेतस.

31 फारो त्यासले दखी तवय तो आपला सर्वा लोकसमुदायनीबारामां समाधान
व्हयी; फारो अनी त्याना सैनिक यासले तलवारघाई वध करी टाक, आशे प्रभु
परमेश्वर सांगस.

32 मी फारोले जीवतसनी भुमीवर दहशत घाली तरी तो अनी त्याना सर्वा
लोकसमुह यासले बेसुंती लोकेसमां तलवारघाई वधेलसनीसंगे ठेयेल शे, आशे प्रभु
परमेश्वर सांगस.

# 33

## यहज्केल इस्राएलना पहारेकरी

1 परमेश्वरनं वचन माले प्राप्त व्हयनं की,
2 मानवपुत्रा, तु आपला भाऊसनीसंगे बोल, त्यासले सांग की मी देशवर तलवार
आणसु तवय जर देशमासला लोकेसनी तुमनापैकी एकले निवाडीसनं पहारेकरी ठेव.
3 देशवर तलवार यि राहीनी शे आशे दखीसनं शिंग फुकीसनं त्यानी लोकेसले
सावध कर.
4 अनी त्या शिंगना शब्द आयकीसनं एखादा सावध व्हयना नही म्हनीसनं
तलवार यिसनं त्याले लयी गयी; तर त्याना रंगत त्यानाच डोकावर राही.
5 शिंगना शब्द आयकीसनं तो सावध व्हयना नही म्हनीसनं त्याना रंगत त्याना
डोकावर राही; तो सावध व्हयना व्हयीते आपला जीव वाचाडता;
6 पन जर पहारेकरीनी तलवारले येतांना दखीसनं शिंग वाजाडं नही अनी तलवार
यिसनं त्यासनामाईन एखदाले लयी गयी तर तो आपला अधर्मतीन मरी, अनी त्याना
रक्तपातना जाब मी त्या पहारेकरीनाजोडे मांगसू.
7 "तर हे मानवपुत्रा, मी तुले इस्राएल घराणानं पहारेकरी नेमेल शे; म्हनीसनं तु
मनं तोंडनं शब्द आयकीसनं मनाकडतीन त्यासले सावध कर.
8 हे दुर्जना, तु खास मरशी, आशे मी एखादा दुर्जनले बोलनू जर त्याले त्याना
मार्गपाईन मांगे फिरानीबारामां तु बोलीसनं त्यासले सावध करं नही तर तो आपला
अधर्मतीनच मरी खरा, पन त्याना रक्तपातना जाब मी तुनाजोडे मांगसू.
9 त्या दुर्जननी आपला मार्गतीन फिराले पाहिजे म्हनीसनं तु त्याले सावध
करीसनंभी तो आपला मार्गतीन मांगे फिरना नही तर तो आपला अधर्मतीन मरी
खरा, पन तु आपला जीव वाचाडसी.

## व्यक्तीगत जबाबदारी

10 हे मानवपुत्रा, तु इस्राएल घराणाले सांग, तुमी सांगतसं की आमना आपराध
अनी आमना पाप यासना भार आमनावर शे अनी त्यामुये आमी सडी राहीनू शेतस,
आमी कसे जगसुत?

11 त्यासले सांग प्रभु परमेश्वर सांगस, मनी जीवनी शपथ, एखादा दुर्जन मराले
पाहिजे यामां माले काही आनंद नही तर त्यानी आपला मार्गपाईन मांगे फिरीसनं
जगाले पाहिजे यामां माले आनंद शे. फिरा, आपला मार्गतीन मांगे फिरा; इस्राएल
वंशसवन, तुमी का बर मरतस?
12 "तर हे मानवपुत्रा, तु आपला भाऊसले सांग, धार्मिक पाप कराले लागना
तर त्यानी धार्मिकता त्याले मुक्त करावू नही, अनी दुर्जन आपला पाप मार्गतीन
मांगे फिरी तर त्याना दुष्टपनामुये त्यानं नाश व्हवावू नही; तशेच धार्मिक पाप कराले
लागना तर तो आपला धार्मिकतामुये वाचावू नही.
13 मी एखादा धार्मिकले बोलनू की तु खास वाची जाशी, अनी त्यानी आपली
धार्मिकतावर भिस्त ठेयीसनं दुष्कर्म करी टाक तर त्यानी बठी धार्मिकता धरता
येवावू नही; त्यानी करेल दुष्कर्मामुये तो मरी.
14 तशेच मी एखादा दुर्जनले बोलनू की तु मरशी; तो आपला पापना मार्गतीन
मांगे फिरीसनं नीती अनी धार्मिकतीन आचरन करं.
15 तो दुर्जन गहाण परत करी, हिसकायेल परत करी दी, अनी काहीएक अधर्म
नही करता जीवनना नियमपरमानं चाली तर तो जगी, मरावू नही.
16 त्यानी करेल सर्वा पाप त्याना हिशोबमां धरामां येवावूत नही; नीतीतीन अनी
धार्मिकतातीन वागी राहींनता म्हनीसनं तो जगी.
17 तरीबी तुमना लोकं सांगतस, प्रभुना मार्ग नीट नही; पन त्यासनाच मार्ग नीट
नहीत.
18 एखादा धार्मिकनी आपली धार्मिकता सोडीसनं पाप कराले लागना तर
त्यानामुये तो मरी.
19 अनी दुर्जन आपला दुराचरण सोडीसनं नीतीतीन अनी न्यायतीन वागना तर
तो त्यानामुये वाची.
20 तरीबी तुमी सांगतसं की प्रभुना मार्ग नीट नही; अहो इस्राएल वंशसवन मी
तुमना परतेकना तुमना मार्गपरमानं करसू.

### यरूशलेमना पतनना समाचार✡

21 आमना बंदीवासना बारावा वरीसले, दहावा महीनाना पाचवा दिनले
यरूशेलममाईन एक माणूस सुटीसनं पयी वना, अनी त्यानी सांग की नगरना नाश
व्हयी जायेल शे.

✡ **33:20 33:21** यिर्मया 39:2-5

22 तो पयीसनं येयल माणुसनी आगोदरना दिनले संध्याकायले परमेश्वरनं
वरदहस्त मनावर वना; तो माणुस सकासले मनकडे वना तोच देवनी मना तोंड
उघाडं व्हतं, मना तोंड उघाडं तवय काय मी मुका नही व्हतू.

### माणुसना पाप

23 तवय परमेश्वरनं वचन माले प्राप्त व्हयनं की,
24 मानवपुत्रा, इस्राएल देशना उजाड व्हयेल जागवर राहानारा आशे म्हनी राहीना
शेतस की अब्राहाम एक राहीसनं त्याले हाई देशनं वतन भेटनं. आमी तर बराच शेतस
अनी देश आमले वतनदाखल देयेल शे.
25 यामुये यासले सांग, प्रभु परमेश्वर आशे सांगस की तुमी रंगतसहीत मास
खातसं, आपल्या मुर्तीसकडे नजर लावतसं अनी रक्तपात करतसं, आशे ज्या तुमी
त्या तुमले हाई देशना वतन भेटी का?
26 तुमी आपली तलवारवर ईस्वास ठेयीसनं अमंगळ कर्म करतसं, आपल्या
शेजारन्या बाईले भ्रष्ट करतसं, आशे तुमले हाई देशनं वतन भेटी का?
27 तु त्यासले सांग, प्रभु परमेश्वर आशे सांगस, मनी जीवनी शपथ, उजाड
व्हयेल परदेशमां राहानारा तलवारघाई पडतीन, उघडा मैदानमां राहानारासले मी
वनपशुसले खावाले दिसु, दरीमां अनी गुहामां राहानारा मरीघाई मरतीन.
28 मी हाऊ देश ओसाडी अनी विस्मयी यासना ईषय करसु, त्यासनी ताकदना
गर्व जिरी, इस्राएलना पर्वत विरान व्हतीन; कोनीच त्या वाटघाई जावावूत नही.
29 त्यासनी करेल बठा अमंगळ कृत्यासमुये मी हाऊ देश ओसाडी अनी विस्मयी
यासना ईषय करसु, तवय त्यासले समजी की परमेश्वर शे.

### संदेष्टांना संदेशना परीणाम

30 हे मानवपुत्रा, तुना भाऊबंद भितनाजोडे, दारनाजोडे तुनाईषय बोली राहीना
शेतस; एक दुसराले, भाऊ भाऊले, म्हनसं, चला, परमेश्वरकडतीन काय वचन
येयल शे ते आयकूत.
31 जनसभापरमानं त्या तुनाकडे यिसनं मना लोकना रिवाजपरमानं तुनामोरे
बसनात, त्या तुना वचन आयकतसं, पन त्यापरमानं चालतसं नही; त्या तोंडवर
गोड गोष्टी करतसं, पन त्यासनं मन लोभघाई भरेल शे.
32 अनी दख, एखादा मधुर कंठना अनी वाजा चांगला वाजडनारा प्रेमगीत
म्हनसं तशा तु त्यासले वाटसं कारन त्या तुना वचन आयकतसं पन त्यापरमानं
चालतसं नही.

33 तरी बी हाई घडी यि (दख, ते आते घडी राहिनं शे) तवय आपलामां एक
संदेष्टा व्हता आशे त्यासले समजी.

# 34

## इस्राएलना मेंढपाय

1 परमेश्वरनं वचन माले प्राप्त व्हयनं की,
2 "मानवपुत्रा," "इस्राएलना मेंढपायसना ईरोधमां संदेश दिसनं सांग, प्रभु परमेश्वर
आशे सांगस, ज्या इस्राएलना मेंढपाय आपलामांच चरतसं त्यासले धिक्कार असो!
मेंढपायसनी मेंढरासले चारानं की नही?
3 तुमी मेंढरासनी चरबी खातस, त्यासना लोकरना कपडा वापरतस; त्यामासला
धष्टपुष्ट दखीसनं कापतसं, पन कळप चारतसं नही.
4 तुमी निर्बलसले बलवान करतसं नही, रोग्यासले चांगल करतसं नही,
जखमी व्हयेलसनी जखम बांधतसं नही, हाकली देयल परत आणतसं नही,
धवडी जायेलसले शोधतसं नही; तर तुमी बळजबरीतीन अनी कडकपनमां सत्ता
चालाडतसं.
5 ✡त्यासले कोनी मेंढपाय नही राहावामुये त्यासनी दाणादाण व्हयनी; त्या सर्वा
वनपशुसना भक्ष्य व्हयीसनं त्यासनी दाणादाण व्हयनी.
6 मना मेंढरा बठा डोंगरवर, सर्वा उचा टेकडासवर फिरी राहीना शेतस; देशभर
मना मेंढरा उधळेल शेतस; त्यासनी कोनलेच शुध्दी नही, कोनीच त्यासनी शोध
करतसं नही.
7 म्हनीसनं मेंढपायसवन, तुमी परमेश्वरनं वचन आयका;
8 प्रभु परमेशवर सांगस, मनी जीवनी शपथ; कोनीच मेंढपाय नही राहावामुये
मना मेंढरं लुटाई जायेल शेतस; मना मेढरं वनपशुसना भक्ष्य व्हयी जायेल शेतस;
मना मेंढपायसले मना मेंढरासनी शुध्दी नही; मेंढपाय सोताच चरतसं, पन मेंढरासले
चारतसं नही.
9 म्हनीसनं मेंढपायसवन, परमेश्वरनं वचन आयका,
10 प्रभु परमेश्वर सांगस, दखा, मी मेंढपायसनी ईरोधमां शे, त्यासनाकडतीन मी
मना मेढरासना हिशोब लिसू; मन कयप चारानी त्यासले बंदी घालसू; त्याले सोताले
चाराले भेटावू नही; मी मना मेंढर त्यासना तोंडमाईन सोडावसू मनजे यानामोरे त्या
त्यासना भक्ष व्हवावुत नही.

✡ **34:5 34:5** गणना 27:17; १ राजे 22:17; मत्तय 9:36; मार्क 6:34

## चांगला मेंढपाय

11 कारन प्रभु परमेश्वर सांगस, दखा, मी सोता मना कयपना शोध करसू, त्यासले
मी शोधसू.
12 जो मेंढपाय आपला दाणादाण व्हयेल मेंढरासमां राहीसनं त्यासले सोडावसं,
त्यापरमानं मी आपला मेंढरासले सोडावसू; अनी ढगघाई जाकेल अनी आंधारना
दिनमां त्यासनी दाणादाण व्हयनी त्या बठा ठिकानमाईन त्यासले वाचाडी लयी यिसू.
13 मी त्यासले राष्ट्रसमाईन लयी यिसु, येगयेगळा देशमाईन त्यासले एकजागे
करसू, मी त्यासले स्वदेशी परत आणसू, मी इस्राएलना पर्वतवर, नालासनाजोडे
अनी देशमासला बठा वस्तीस्थानमां त्यासले चारसू.
14 मी त्यासले चांगल्या चरणमां चारसू, त्यासना चरण इस्राएलना उचा पहाड
व्हयी, त्या तठे चांगला चरणमां बसतीन, इस्राएलना पर्वतवर त्यासले उत्तम चारा
भेटी.
15 मी सोता मना कयप चारसू अनी त्यासनी झोपा उठानी सोय करसू आशे प्रभु
परमेश्वर सांगस.
16 मी दवडायी जायेलसले शोधसू, हाकली देयेलसले परत आणसु, जखमी
व्हयेलसले पट्टी बांधसू, रोगीसले ताकद दिसु, पन लठ्ठ अनी ताकदवानसना नाश
करसू, त्यासले मी यथान्याय चारसू.
17 प्रभु परमेश्वर सांगस, मना कयप, तुमनं आशे व्हयी, मी मेंढरामेंढरासमा,
एडकाबोकडयासमां निवाडा करसू.
18 तुमी चांगला चारा खायीसनं उरेल चाराले पायघाई चेंगरतसं, तुमी स्वच्छ
पानी पिसनं उरेल पानी गढूय करतसं, हाई काहीच नही आशे तुमले वाटसं का?
19 मना मेंढरं तुमना पायघाई चेंगरेल चारा खातसं अनी तुमना पायघाई गढूय
व्हयेल पानी पितसं.
20 "हयामुये, प्रभु परमेश्वर त्यासले सांगस, दखा, मी, मीच पुष्ट पशु अनी रोड
पशू यासनामां निवाडा करसू.
21 निर्बलसले तुमी आपला आंगघाई अनी खांदासघाई धक्का देतस अनी
आपला शिंगसघाई ठोकर दिसनं हाकली देतसं.
22 म्हनीसनं मी आपला कयपना बचाव करसू, मनजे त्या आठेपावोत दुसरासना
भक्ष्य व्हवावूत नही; मी मेंढरामेंढरासमां निवाडा करसूं.
23 त्यासनावर मी एक मेंढपाय नेमीसनं त्यासले चारसू; तो कोण राही तर मना
सेवक दावीद हाऊ राही; तो त्यासले चारी, तो त्यासना मेंढपाय व्हयी.

24 मी परमेश्वर त्यासना देव व्हसु, त्यासनामां मना सेवक दावीद हाऊ अधिपती
व्हयी; मी परमेश्वर हाई बोलेल शे.
25 मी क्षेमवचन दिसनं त्यासनासंगे करार करसु, देशमाईन दुष्ट पशु नष्ट करसु
अनी मनजे त्या जंगलमां निर्भय आशे राहातीन अनी जंगलमां झोप लेतीन.
26 "मी त्यासले अनी मना डोंगरना आजुबाजूना ठिकानले मंगलमय करसु;
पाऊस योग्य ऋतुमां पडी आशे मी करसु; मंगलदायी वृष्टी व्हयी.
27 मयामासला झाडे फलद्रुप व्हतीन, मी त्यासनारना जोखडना बंधन तोडीसनं
ज्यासनी त्यासले दास म्हनीसनं वागाडं त्यासना हातमाईन त्यासले सोडावसु तवय
त्यासले समजी की मी परमेश्वर शे.
28 त्या यानामोरे विधर्मी राष्ट्रसले भक्ष व्हवावुत नही; वनपशु त्यासले फाडीसनं
खावावूत नही; तर त्या निर्भयतीन राहातीन, कोनीच त्यासले धाक देवावू नही.
29 मी त्यासनाकरता चांगलं पिकपानीनी लागवड करसु, मनजे परत फिरीसनं
त्यासना देशवर दुष्काळ पडीसनं त्यासना र्‍हास व्हवावू नही; त्यासले परत विधर्मी
लोकेसनी अप्रतिष्ठा सोसानी गरज पडावू नही.
30 तवय मी परमेश्वर त्यासना देव त्यासनासंगे शे अनी इस्राएल घराणं मनी प्रजा
शे हाई त्यासले समजी, आशे प्रभु परमेश्वर सांगस.
31 तुमी मना मेढरं, मना चरणमासला कयप शेतस, तुमी मानव अनी मी तुमना
देव शे, आशे प्रभु परमेश्वर सांगस.

# 35

## अदोमले परमेश्वरना दंड

1 परमेश्वरनं वचन माले प्राप्त व्हयनं की,
2 "मानवपुत्रा," "सेईर डोंगरकडे आपलं तोंड कर अनी त्याना ईरोधमां संदेश
देय.
3 त्यासले सांग, प्रभु परमेश्वर सांगस,
हे सेईर डोंगरा, दख, मी तुना ईरोधमां शे,
मी मना हात तुनावर चालाडसु
अनी तुले उजाड अनी उद्‌ध्वस्त करसु.
4 मी तुना नगर ओस करसु
अनी तु उजाड व्हशी;
तवय तुले समजी की मी परमेश्वर शे.

5 तु कायमनं वैर धरं अनी इस्राएल लोकेसवर संकट ऊनात तवय त्यासना
पापमुलक अंतसमय वना तवय त्यासले तलवारनी धारनी हवाली करी टाकं.
6 म्हनीसनं प्रभु परमेश्वर सांगस, मनी जीवनी शपथ, मी तुनी रक्तपातनी तयारी
करसू, अनी रक्तपात तुना पिच्छा करी; तु रक्तपातनीबारामां नापसंती दखाडी नही
म्हनीसनं रक्तपात तुनामांगे लागी.
7 मी सेईर डोंगर उद्ध्वस्त अनी विरान करसू; तठे येनारा जानारासना नाश
करसू.
8 त्याना वध करेल लोकेसनी मी त्याना डोंगर व्यापी टाकसू; तुन्या
टेकडयासवर, तुना खोरामां अनी तुना नालामां तलवारघाई वध करेल पडतीन.
9 मी तुमनं कायमनं उद्ध्वस्त करसू, तुमना नगर परत बसावुत नहीं; तवय तुमले
समजी की मी परमेश्वर शे.
10 "हया दोन राष्ट्रे, हया दोन देश मना शेतस; आपन त्यासना ताबा लि टाकूत,
आशे तठे परमेश्वर व्हता तवय तुनी बोलं व्हतं.
11 म्हनीसनं प्रभु परमेश्वर सांगस, मनी जीवनी शपथ, तु जो व्देष दखाडं, तु
त्यासना व्देष करीसनं जो हेवा प्रकट करं; त्यापरमानं मी तुनासंगे वागसू; मी न्याय
करीसनं तुले शिक्षा करसू तवय मी त्यासले प्रकट व्हसू.
12 तु इस्राएलना पर्वतनाईरोधमां बोलं व्हत की त्या उद्ध्वस्त व्हयेल शेतस, त्या
आमले भक्ष कराकरता देयेल शेतस; हाई तुनं बठ दुर्भाषण मी परमेश्वरनी आयकेल
शे हाई तुले कळी.
13 हाई परकारं तुमी आपला तोंडघाई मनाईरोधमां मनी थोरवी गाजाडी;
मनाईरोधमां पाहिजे तेवढा बोलनात; ते मी आयकेल शे.
14 "म्हनीसनं प्रभु परमेश्वर सांगस, बठी पृथ्वी आनंद करी तवय मी तुले उजाड
करसू.
15 इस्राएलना घराणानं वतन उद्ध्वस्त व्हयनं तवय तुमले आनंद वाटनं;
म्हनीसनं मी तुनबी तशेच करसू; हे सेईर डोंगरा, तु विरान व्हशी, जवयपास बठा
अदोम ओसाप व्हयी, तवय त्यासले समजी की मी परमेश्वर शे."

# 36

## इस्राएलले परमेश्वरना आशिर्वाद

1 "हे मानवपुत्रा, इस्राएलना पर्वतमां संदेश दिसनं सांग, इस्राएलना पर्वतसवन,
परमेश्वरनं वचन आयका.

2 प्रभु परमेश्वर सांगस, तुमनीबारामां शत्रु सांगतसं, अहा! हया प्राचीन उचा
स्थळ आपला ताबामां येयल शेतस;

3 "म्हनीसनं संदेश दिसनं सांग की प्रभु परमेश्वर सांगस, त्यासनी तुमले उद्ध्वस्त
करेल शे, राष्ट्रसमाईन उरेल लोकेसना तुमनावर ताबा बसाले पाहिजे म्हनीसनं
त्यासनी तुमले चारीमेरतीन त्रास देयेल शे, अनी तुमनं नाव लोकेसना तोंडमा राही
जायेल शे अनी त्यासले तुमी निंदानं ईषयी बनी जायेल शेतस.
4 म्हनीसनं इस्राएलना पर्वतसवन, प्रभु परमेश्वरनं वचन आयका, आसपासना
राष्ट्रसमाईन उरेल लोकेसले लुट अनी निंदाना ईषय व्हयेल अनी टेकडया, नाला
अनी खोरा, उजाड अनी ओसाड नगरे यासले प्रभु परमेश्वर आशे सांगस की,

5 "राष्ट्रसमाईन बाकीना उरेल अनी सर्वा अदोम यासनी उल्लासयुक्त मनतीन
अनी व्देषबुध्दीतीन मना देश लुटीसनं फस्त कराना हेतूतीन तो आपला सत्तामां
लिद; म्हनीसनं त्यासनाईरोधमां ईर्ष्यायुक्त व्हयीसनं नक्की बोलेल शे;

6 "इस्राएल देशनाईषय संदेश दिसनं पर्वत अनी टेकडया, नाले अनी खोरा यासले
सांग की प्रभु परमेश्वर सांगस, विधर्मी राष्ट्रसनी करेल अप्रतिष्ठा तुमी सहन करेल शे
म्हनीसनं, दख, मी आपली ईर्ष्यातीन अनी संतापतीन बोलेल शे.
7 म्हनीसनं प्रभु परमेश्वर सांगस, मी आपला हात उचलेल शे; तुना आजुबाजून
विधर्मी राष्ट्र खचित अप्रतिष्ठा पावतीन.
8 पन इस्राएलना पर्वतसवन, तुमनावरना झाडसले फाटा फुटीसनं तुमी मना
इस्राएल लोकेसले फळ दिशात आशे लवकर घडी.
9 कारण दख, मी तुमले अनुकूल शे, मी तुमनाकडे वयसू अनी तुमनावर नांगरनी
पेरणी व्हयी;
10 मी तुम्हनावर माणसेसनी, इस्राएलनी जवयपास बठा घराणानी संख्या
वाढावसू, नगरे बसतीन, पडीत ठिकान बांधी काढतीन.
11 माणुस अनी पशू यासनी संख्या मी तुमनावर वाढावसू, त्यासनी वृध्दी
व्हयीसनं फलद्रूप व्हतीन; पहिलापरमानं तुमनावर वस्ती बशी, अनी तुमना जुना
दिनमां करं त्यानापेक्षा जास्त तुमनं कल्यान करसू; तवय तुमले समजी की मी
परमेश्वर शे.
12 माणसे, मनजे मना इस्राएल लोके, तुमनावर परत ये जा करतीन आशे मी
करसू; त्या तुमना ताबा लेतीन, तुमी त्यासना वतन वशात, तुमी आठेपावोत त्यासले
अपत्यहीन करावुत नही.

13 "प्रभु परमेश्वर सांगस, त्या तुमले सांगेत की तु मनुष्यभक्षक देश शे; तु आपला
राष्ट्रसले अपत्यहीन करेल शे;
14 तर तु यानामोरे मनुष्य भक्ष करावू नही, आपला राष्ट्रसनामोरे आडफाटा ठेवावू
नही; आशे प्रभु परमेश्वर सांगस,
15 परत फिरीसनं मी तुले राष्ट्रसनी निंदा आयकाडावू नही, राष्ट्रसनी करेल
अप्रतिष्ठा तुले सोसानी गरज पडावू नही तु आपला राष्ट्रनीमोरे आडफाटा ठेवावू
नही आशे प्रभु परमेश्वर सांगस.

## इस्राएलना नवीन जीवन

16 परमेश्वरनं वचन माले परत प्राप्त व्हयनं की,
17 "मानवपुत्रा," "इस्राएल घराणं देशमां वस्ती करीसनं राहीनात तवय त्यासनी
आपला आचरनतीन अनी कृतीतीन तो देश भ्रष्ट करी टाकं; त्यासनं आचरन
मनासमोर पाळी येयल बाईना परमानं व्हतं.
18 त्यासनी देशमां रक्तपात करं अनी आपल्या मुर्तीसघाई तो भ्रष्ट करी टाकं;
म्हनीसनं मी देशवर आपला संतापना वर्षाव करं.
19 मी त्यासनी राष्ट्रसमां पांगापांग करी, देश देशमां त्यासनी दाणादाण व्हयनी;
त्यासना आचरनपरमानं अनी कृतीपरमानं मी त्यासना न्याय करं.
20 ज्या ज्या देशमां त्या गयात तठे त्यासनी मना पवित्र नावले बट्टा लावं; लोके
त्यासना ईषयी सांगेत की हया परमेश्वरना लोके शेतस, हया त्याना देशमाईन बाहेर
निघेल शेतस;
21 पन इस्राएल घराणं ज्या ज्या राष्ट्रसमां गयात तठे त्यासनी मना पवित्र नावले
बट्टा लावं, तवय मी मना नावले जपनू.
22 "यामुये इस्राएल घराणाले सांग की प्रभु परमेश्वर सांगस, हे घराण्या, मी हाई
तुमनाकरता करी नही राहीनू, तर तुमी राष्ट्र राष्ट्रसमां जायीसनं मना पवित्र नावले बट्टा
लावं म्हनीसनं मना नावकरता मी हाई करी राहीनु शे.
23 तुमी मना थोर नावले राष्ट्रासनीसमोर बट्टा लावामुये त्या राष्ट्रसनी मना नाव
अपवित्र मानी टाक; त्या ती पवित्र मानतीन आशे मी करसू; अनी त्या राष्ट्रासनीसमोर
तुमनामां माले पवित्र मानतीन तवय राष्ट्रसले समजी की मी परमेश्वर शे, आशे प्रभु
परमेश्वर सांगस.
24 कारन मी तुमले राष्ट्रसमाईन काढी आणेल शे, सर्वा देशमाईन तुमले एकजागे
करीसनं तुमले देशमां आणेल शे.

25 मी तुमनावर शुध्द पानी शितडसू; मनजे तुमी शुध्द वशात; तुमना बठी
मलिनता अनी तुमन्या बठया मुर्त्या यासपाईन मी तुमनी शुध्दी करसू.
26 ✡ मी तुमले नवीन ह्दय दिसू; तुमनामां नवा आत्मा घालसू; तुमना देहमाईन
दगडना ह्दय काढीसनं अनी तुमले मांसमय ह्दय दिसू.
27 मी तुमनामां मना आत्मा घालसू अनी तुमी मना नियमतीन चालशात, मना
निर्णय पायीसनं त्यापरमानं आचरन करशात आशे मी करसू.
28 मी तुमना पर्वजसले देयेल देशमां तुमी वस्ती करशात, अनी तुमी मनी प्रजा
अनी मी तुमना देव व्हसू.
29 मी तुमना बठी मलिनतापाईन तुमले मुक्त करसू; मी धान्यवर हुकूम करीसनं
त्यानी विपलुता वाढावसू, तुमनावर दुष्काळ आणावू नही.
30 झाडेसना फळे अनी वावरसना उपज यासनी मी वृध्दी करसू; मनजे राष्ट्रसमां
तुमले यानामोरे दुष्कायमुये व्हनारी विटंबना भोगानी गरज पडावू नही.
31 तुमले तुमना दुष्कर्मनी अनी अनाचारनं स्मरण व्हयीं; तुमना अधर्म अनी
अमंगय कृत्य यामुये तुमलेच तुमना ईट यि.
32 प्रभु परमेश्वर सांगस, हाई मी तुमनाकरता करी नही राहीनू हाई तुमले माहीत
राहु दया; हे इस्राएल घराण्या, तुमी आपला आचरनना ईषयी लज्जित अनी फजित
व्हा.
33 प्रभु परमेश्वर सांगस, मी तुमना सर्वा अधर्म घालाडीसनं तुमले साफ करसू;
तवय नगरे बसतीन अनी पडीत जागा बांधामां येतीन आशे मी करसू.
34 येता जाता विरान व्हयेल ठिकान नांगरामाम यि.
35 तवय लोके म्हनतीन, हाई जमीन विरान व्हयेल व्हती ती आते एदेन
बागनीमायक व्हयेल शे; ओसाड, उजाड अनी उद्ध्वस्त व्हयेल नगरसनी तटबंदी
व्हयीसनं तठे वस्ती व्हयेल शे.
36 ज्या राष्ट्रे तुमना आजुबाजूले टिकी राहातीन त्यासले समजी की मी परमेश्वर
उद्ध्वस्त व्हयेल ठिकान बांधी काढसं; उजाड व्हयेल जमीननी लागवड करसं;
मी परमेश्वर जे बोलेल शे ती मी करसुच.
37 प्रभु परमेश्वर सांगस, आजुन मी आशे कराले पाहिजे म्हनीसनं इस्राएल
घराणाले मनी ईनंती कराले भाग पाडसू; कळपपरमानं मी तठे मनुष्यनी वृध्दी करसू.
38 पवित्र यज्ञपशुना कळप, यरूशेलमना सणना कळप यापरमानं ओसाड नगर
मनुष्यना कळपघाई भरी जातीन; तवय त्यासले समजी की मी परमेश्वर शे.

✡ **36:26 36:26** यहेज्केल 11:20; २ करिंथ 3:3

# 37

## सुकेल हाडसना मैदान

1 परमेश्वरनं वरदहस्त मनावर ऊना, माले परमेश्वरनी आत्मानी स्फुर्ति व्हयीसनं
त्यानी उचली लिद अनी खोरामां आणी ठेवं, तठे हाडकस हाडकं व्हतात;
2 त्यानी माले त्यानामाईन चारीमेरतीन फिरावं तर दख, त्या खोरानी जमीनमां
बराच हाडं व्हतात; त्या सुकेल व्हतात.
3 मंग तो माले बोलना, मानवपुत्रा, हया हाडे सजीव व्हतीन का? मी बोलनू,
प्रभु परमेश्वरा, हाई तुलेच माहीत.
4 तवय तो माले बोलना, "या हाडसना ईषयी संदेश दिसनं त्यासले सांग, सुखा
हाडसवन, परमेश्वरना आयका.
5 प्रभु परमेश्वर हया हाडेसले सांगस, दखा, मी तुमनामां स्वास घालसं मनजे
तुमी सजीव वशात.
6 मी तुमले मास लावसू, तुमनावर मास चढी, तुमले कातडीघाई झाकसू; तुमले
स्वास घालसू; मनजे तुमी सजीव वशात, अनी तुमले समजी की मी परमेश्वर शे.
7 माले आज्ञा व्हयनी त्यापरमानं मी संदेश दिदा; मी संदेश दि राहींनतु तवय
आवाज व्हयना; अनी दखा, भुकंप व्हयीसनं हाडसले हाड जोडाई गयात.
8 मंग मी दख तवय त्यानावर स्नायू वनात, मास चढनं, कातडीनी त्याले झाक,
पन त्यासनामां स्वास नहीं व्हतं.
9 तवय तो माले बोलना, वाराले संदेश देय, मानवपुत्रा, वाराले संदेश सांग की
प्रभु परमेश्वर सांगस, हे वारा, तु चारी दिशातीन ये अनी या मारलेसवर फुंकर घाल
मनजे त्या सजीव व्हतीन.
10 माले आज्ञा व्हयेल परमानं मी संदेश दिदू, तवय त्यासले स्वास यिसनं सजीव
व्हयनात अनी भलता मोठा सैन्य आपला पायवर उभा राहीनात.
11 ✡तवय तो माले बोलना, हया हाडे म्हनजे बठा इस्राएल घराणं शे; दख, त्या
सांगतसं, आमना हाडे सुखी जायेल शेतस; आमनी आशा नष्ट व्हयी जायेल शे.
आमना पुरा नाश व्हयी जायेल शे.
12 म्हनीसनं संदेश दिसनं त्यासले सांग, प्रभु परमेश्वर सांगस, मना लोकेसवन,
दखा, मी तुमन्या कबरा उघाडसू, तुमले तुमना कबरासमाईन बाहेर काढीसनं इस्राएल
देशमां आणसू.

---

✡ **37:11 37:11** प्रकटीकरण 11:11

13 मना लोकेसवन, मी तुमन्या कबरा उघाडीसनं तुमले बाहेर काढसू तवय तुमले
समजी की मी परमेश्वर शे.
14 मी तुमनामां मना आत्मा घालसू, तुमी सजीव वशात अनी मी तुमले तुमना
देशमां बसाडसू; तवय मी परमेश्वर हाई बोलनू अनी मी तशे करं हाई तुमले समजी,
आशे परमेश्वर सांगस."

## यहुदा अनी इस्राएल एक राज्य

15 परमेश्वरनं वचन माले परत प्राप्त व्हयनं की,
16 "मानवपुत्रा," "तु लाकुडना एक ढलपा लिसनं त्यानावर, हाऊ यहुदा अनी
त्यानासंगे इस्राएल वंश यानं, आशे लिख; लाकूडना दुसरा एक ढलपा लिसनं
त्यानावर, हाऊ योसेफनं मनजे एफ्राईम अनी त्याना संगेना बठा इस्राएल घराणं
यासना ढलपा, आशे लिख."
17 त्या ढलपा येरायेरले जोडीसनं त्यासना एक ढलपा तयार कर; तुना हातमां
एकजीव व्हतीन आशे कर.
18 मंग हाई ढलपासना अर्थ काय शे हाई तु आमले सांगसी ना, आशे तुना भाऊ
तुले ईचारतीन,
19 तवय त्यासले सांग, प्रभु परमेश्वर सांगस, एफ्राईमना हातमा योसेफना ढलपा
अनी त्याना संगे इस्राएलना वंशसले यासले लिसनं यहुदाना ढलपासले जोडीसनं
त्यासना एक ढलपा मी करसू, मनजे त्या मना हातमां एकजीव व्हतीन.
20 अनी ज्या ढलपासवर तु लिखशी त्या तु त्यासना डोयासमोर आपला हातमां
धर.
21 तु त्यासले सांग, प्रभु परमेश्वर सांगस, दखा, इस्राएलना वंश ज्या राष्ट्रसमां
जायेल शेतस तठेन मी त्यासले काढीसनं अनी चारीमेरतीन गोया करीसन त्यासले
स्वदेशमां आणसू.
22 मी हाई देशमां, इस्राएलना पर्वतवर त्यासना एक राष्ट्र बनाडसू, त्या बठासवर
एकच राजा राज्य करी; त्या यानामोरे येगळा राष्ट्र राहावावूत नही; यानामोरे त्या
विभक्त व्हयीसनं दोन राष्ट्रे व्हवातू नहीत;
23 त्या आपल्या मुर्तीसघाई, आपल्या तिरस्करणीय वस्तुसघाई अनी आपला
कोनताच पापघाई त्या ईटाळावूत नही, त्यासनी आपल्या, ज्या सर्वा निवास्थानमां
पाप करात त्या बठासमाईन त्यासले सोडीसनं मी त्यासले शुध्द करसू; मनजे त्या
मना लोके अनी मी त्यासना देव व्हसू.

24 ✡मना सेवक दावीद त्यासना राजा व्हयी, त्या बठासना एकच मेंढपाय राही;
त्या मना निर्णयपरमानं चालतीन अनी मना नियम पायीसनं त्यापरमानं वागतीन.
25 जो देश मना सेवक याकोब याले मी दिद् अनी जठे तुमना पुर्वज राहेत तठे
त्या वस्ती करतीन, तठे त्या अनी त्यासनं पोऱ्या सोरे सर्वकाय वस्ती करतीन; मना
सेवक दावीद त्यासनावर सर्वकाय अधिपती व्हयी.
26 आजुन मी त्यासनासंगे शांतीना करार करसू, तो करार सर्वकायना व्हयी,
मी त्यासले बसाडसू, त्यासनी संख्या वाढावसू, अनी सर्वकाय राही आशे मन
पवित्रस्थान तयार करसू.
27 ✡मना निवासमंडप त्यासनावर राही; मी त्यासना देव अनी त्या मना लोके
व्हतीन.
28 मना पवित्रस्थान त्यासनामां सर्वकाय राही, तवय राष्ट्रसले समजी की
इस्राएलले पवित्र करनारा मी परमेश्वर शे.

# 38

गोगनीबारामां भविष्य
1 परमेश्वरनं वचन माले प्राप्त व्हयनं की,
2 ✡ "मानवपुत्रा," "मागोग देशमासला गोग, जे रोश, मेशेख अनी तुबाल यासना
अधिपती, त्यानाकडे आपलं तोडं करीसनं त्यानाईरोधमां संदेश देये;
3 त्यासले सांग प्रभु परमेश्वर सांगस, दखा, आरे, गोगा, रोश, मेशेख अनी तुबाल
यासना अधिपती, मी तुमनाईरोधमां शे.
4 मी तुले पयाले लावसू; तुना जबडामां गय टोचीसनं तुले बाहेर काढसू; तुना
बठा सैन्य, घोडा अनी स्वार यासले बाहेर काढसू, सर्वाजन सुंदर कपडा घालेल,
कवच अनी ढाल धारन करेल, तलवार परजनारा यासना मोठा समुह शे.
5 त्यासनासंगे ढाल अनी शिरस्राण धारन करेल पारस, कूश अनी पुट,
6 गोमर अनी त्याना सेनासमुह, उत्तरकडला तोगार्मानं घराणं अनी त्यासना बठा
सेनासमुह, तशेच बराच जातना लोके यासले तुनासंगे बाहेर काढसू.
7 तु अनी तुना पक्षकडे जमा व्हयेल बठा समुह आशे तुमी तयार व्हा, तयार
व्हय, त्यासना नायक व्हयं.

✡ **37:24 37:24** यहेज्केल 34:24 ✡ **37:27 37:27** २ करिंथ 6:16; प्रकटीकरण 21:3
✡ **38:2 38:2** प्रकटीकरण 20:8

8 बराच दिन सरावर तुना समाचार लेवामां यि, शेवटना वरीसले जो देश
तलवारपाईन वाची अनी ज्या देशमां बराच राष्ट्रसमाईन जमा करेल लोके परत परत
उद्‌ध्वस्त व्हनारा इस्राएलना पर्वतवर वस्ती करतीन, त्या देशवर तु चढाई करशी;
तरीबी त्या लोकेसले राष्ट्रमाईन बाहेर आणीसनं त्या बठा निर्भय राहातीन.
9 तु तुफाननामायक चाली जाशी; भुमीले ढग झाकतसं तशा तु व्हशी; तु तुना
बठा सेनासमुह अनी तुनासंगे बराच राष्ट्रसना लोके, आशे तुमी यिशात.

10 प्रभु परमेश्वर सांगस, त्या दिन आशे व्हयी की तुना मनमां कल्पना येतीन
अनी तु दुष्ट योजनानी युक्ती करशी.
11 तु सांगशी, ज्या प्रदेशमासला गावसले तटबंदी नही त्यासवर मी चढाई करसु,
ज्या आरामशीर निर्भय राही राहीना शेतस, अनी ज्यासले कोनताच कोट नहीं,
अडसर, वेशी वगैरे काही नही त्यासवर मी चाली जासु.
12 लोकेसनी मालमत्ता हिसकावाकरता अनी लुटालुट कराकरता; ज्या ओसाड
ठिकानले परत वस्ती व्हयेल शे त्यासनावर मना हात चालाले पाहिजे, अनी
येगयेगळा राष्ट्रसमाईन जमा व्हयेल ज्या लोकेसना गुरेढोरे अनी मालमत्ता लेयेल शे
अनी ज्या पृथ्वीना मधला भागमां राहातसं त्यासनावर हात चालाले पाहीजे म्हनीसनं
मी चाली जासु.
13 शबा, ददान अनी तार्शीश आठेना व्यापारी अनी त्यासना बठा तरून सिंह तुले
म्हनतीन, तु लुटालुट कराले येयल शे का? तु मालमत्ता हिसकावाकरता आपला
सेनासमुह जमाडेल शे का? सोने रूपे लयी जावाले पाहिजे, गुरेढोरे अनी माल लयी
जावाले पाहिजे अनी मोठी लुट कराले पाहीजे म्हनीसनं तु येयल शे का?

14 म्हनीसनं हे मानवपुत्रा, संदेश दिसनं गोगाले सांग, प्रभु परमेश्वर सांगस, जवय
मना लोके इस्राएल निर्भय वस्ती करतीन तवय तुले हाई कयायु नही का?
15 तु आपला ठिकानवरतीन यिशी; उत्तरकडला दुर दुरना देशमाईन अस्वारूढ
व्हयेल मोठा लोकेसा समुदाय, मोठा दयभार, तु संगे लिसन यिशी.
16 ढगघाई देश झाकास तशे तु मना लोके इस्राएल यासनावर चाल करी यिशी;
हे गोगा, शेवटना दिनमां आशे घडी की मी राष्ट्रसनादेखत तुनाकडतीन मनी पवित्रता
प्रकट करसु; तवय राष्ट्रसनी माले वयखाले पाहिजे म्हनीसनं मी तुले मना देशवर
आणसु.
17 प्रभु परमेश्वर सांगस, मना सेवक ज्या इस्राएलना संदेष्टा त्यासनाकडतीन
पुर्वकायले ज्या ईषयी मी बोलेल व्हतु अनी त्या कायमां बराच वरीस त्यासनी ज्या

ईषयी आशे संदेश दिदा व्हता की मी तुले त्यासनावर चाल कराले आणसू, तो तुच
शे ना?

### गोगले परमेश्वरना दंड

18 प्रभु परमेश्वर सांगस, गोग इस्राएल देशवर चाल करी त्या दिन आशे व्हयी
की मन्या नाकपुडया संतापमां फुरफरतीन.
19 कारन मी ईर्ष्यातीन क्रोधाग्नीघाई तप्त व्हयीसनं बोलेल शे की खरच त्या दिन
इस्राएल देशमां मोठा भुमीकंप व्हयी;
20 समुद्रमासाल मासा, आकासमासाल चिडा, जंगलमासला जनावर, जमीनवर
रांगनारा बठा पशू अनी जमीनवर राहानारा बठा माणसे मनासमोर थरथर कापतीन;
पर्वत नष्ट व्हतीन, कडा खचतीन, परतेक कोट कोसळीसनं जमीनदोस्त व्हयी.
21 प्रभु परमेश्वर सांगस, मना बठा पर्वतसकडे त्यानाईरोधमां तलावर बलावसू;
परतेकनी तलवार आपला भाऊवर चाली.
22 मरी अनी रक्तपात यासघाई मी त्यासनासंगे वाद मांडसू; त्यासनावर, त्याना
सैनिकवर पाऊस, मोठया गारा, आग अनी गंधक यानी वृष्टी मी त्यासनासंगे जो
लोकसमुदाय शे त्यासवर धोधो करसू.
23 हाई परकारं मी आपली महीमा अनी पवित्रता प्रकट करसू, अनी बराच
राष्ट्रसले प्रत्यक्ष वयख व्हयी; तवय त्यासले समजी की मी परमेश्वर शे.

# 39

### गोगनी हार

1 "हे मानवपुत्रा," गोगानाईरोधमां संदेश दिसनं सांग, प्रभु परमेश्वर सांगस, हे
गोगा, रोश, मेशेख अनी तुबाल यासना अधिपती, दखा, मी तुमनाईरोधमां शे;
2 मी तुले फिरावसू, तुले लि जासू, उत्तरकडला बराच दुरना परदेशमां तुले येवाले
लावसू; तुले इस्राएलना पर्वतकडे आणसू,
3 मी तुना डावा हातमासला धनुष्य उडाई दिसु; तुना उजवा हातमासला बाण
खाल पाडी दिसू.
4 तु इस्राएलना पर्वतवर पडशी; तु, तुना बठा सेनासमुह अनी तुनासंगेना लोकेसना
समुह, हया तुमी बठा पडशात; मी तुमले नाना परकारना हिंस्र चिडासले अनी
वनपशुसले भक्ष दिसू.
5 उघडा मैदानमां तु पडशी; कारन मी हाई बोलेल शे; आशे प्रभु परमेश्वर सांगस,

6 मी मागोगमां अनी व्दिपमां निर्भय राहानारा लोकेसमां आग धाडसू; तवय
त्यासले समजी की मी परमेश्वर शे.
7 मी आपला इस्राएल लोकेसमां मना पवित्र नाव प्रकट करसू; यानामोरे आपला
पवित्र नावनी अप्रतिष्ठा व्हवू देवावू नही; तवय मी परमेश्वर शे, इस्राएलना पवित्र
प्रभु शे आशे राष्ट्रसले समजी यि.
8 दखा, हाई प्राप्त व्हयी राहीना शे; घडी यि राहीना शे; मी सांग व्हतं तो हाई
दिन शे; आशे प्रभु परमेश्वर सांगस.
9 तवय इस्राएलनी नगरमासला रहिवासी बाहेर निघीसनं ढाली अनी कवच,
धनुष्य अनी बाण, गदा अनी भाला, या बठा शस्रासले आग लायीसनं जायी
टाकतीन; त्यासना त्यासले सात वरीस सरपन व्हयी.
10 त्या जंगलमाईन लाकडे आणावूत नही, जंगलमासला लाकडे तोडावूत नही,
तर हया हत्यार त्या जायतीन; त्यासले ज्यासनी लुट त्यासले त्या लुटतीन अनी
त्यासले ज्यासनी त्यासनं हिसकावं त्यासले त्या हिसकावतीन आशे प्रभु परमेश्वर
सांगस.

## गोगले मुठमाटी

11 त्या दिन आशे व्हयी की समुद्रना पुर्वले ज्या प्रवाशासना खोरा त्या गोगाले
इस्राएल देशमां कब्रस्थान म्हनीसनं दिसु; त्या येनारा जानारासनी वाट आडवतीन;
तठे गोग अनी त्याना बठा लोकसमुह यासले बुंजतीन; अनी त्याले हमोन-गोग
(गोगना लोकसमुदाय) यानं खोरं आशे म्हनतीन.
12 देश शुध्द कराकरता इस्राएल घराणं त्यासले सात महिना पुरत बसतीन.
